|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० अंक : १८ सोमवार दि. २५ एप्रिल २०२२ ते रविवार दि. ०१ मे २०२२ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## जावयाचा संसार मोडला सासऱ्याचा मुडदा पाडला

पुणे/क्राईम रिपोर्टर

कौटुंबिक वादाच्या कारणातून जावयाने सासऱ्यावर चाकूने वार करुन त्यांचा खून केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या घटनेनंतर जावयाने हातात रक्ताने माखलेला चाकू घेऊन पोलीस ठाणे गाठले. त्यानंतर खडकी पोलिसांना स्वत:च खुनाची कबूली दिली. अशोक गुलाब कुडले (३८, रा. खडकी बाजार) याने सासरे रमेश रामचंद्र उत्तरकर (६५, रा. आकाशदीप सोसायटी खडकी) यांचा चाकूने खून केला. खुनानंतर पोलिसांनी अशोक गुलाब ...पान ६ वर

## देवा-धर्माच्या नावाने राजकारणी भले कितीही छात्या बडवतील राष्ट्रपती राजवटीची स्वप्न बघणाऱ्यांना लोकच अद्दल घडवतील



मुंबई/वरिष्ठ प्रतिनिधी

**सत्ता गेल्यावर माणसे कशी पागल होतात आणि कसा थयथयाट करतात हे सध्या संपूर्ण महाराष्ट्र बघतोय. अनेक तारखा देऊनही महाविकास आघाडीचे सरकार कोसळत नाही हे पाहून भाजप नेत्यांनी आता महाराष्ट्रत अराजकता माजवून केंद्राला राष्ट्रपती राजवट लावायला भाग पडायचे अशी योजना आखली आहे आणि त्यासाठीच राज ठाकरे आणि राणा दांपत्या सारख्या लोकांच्या कमजोर खांद्यांवर बंदूक ठेऊन महाविकास आघाडीची शिकार करण्याचा प्रयत्न सुरु झालाय. अन्यथा राज ठाकरे आणि राणा दांपत्यांना महाराष्ट्रात विचारतोय कोण? पण अशा दगडांना धर्माच्या नावाने शेंदूर लावायचा आणि त्यांना बळ देऊन उभे करायचे. उद्या महाविकास आघाडी बरोबरच्या संघर्षात हे भाडोत्री सुपारीबाज मरतील, आपण मात्र नामनिराळे राहू असा भाजपचा बामणी कावा आहे. पण महाराष्ट्रातली जनता मूर्ख नाही! इथल्या जनतेने असे अनेक बामणी कावे उधळून लावले आहेत.**

भाजपा आणि मोदींना आता जनमानसात फारशी किमत राहिलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्रात भाजपचे स्वबळाचे सरकार कदापि येऊ शकत नाही. उलट असे शिखंडी उपद्व्याप करून भाजपच्या आहेत त्याही जागा जातील. कारण महाराष्ट्र हा दलित मुस्लिमांचा गड आहे. इथे राज ठाकरे सारख्या लोकांकडे महाराष्ट्रातील जनता टाईमपास म्हणून बघते, त्याला कुणीही गांभीर्याने घेत नाहीत. मुंबईत उत्तर भारतीयांची रोजी रोटी हिस्कावण्याचा प्रयत्न करणारा हा माणूस कुठल्या तोंडाने अयोध्येला निघाला आहे आणि हिंदुत्वाचा बुरखा घातला तरी तिथले लोक याला माफ करतील का? त्यामुळे आपण कोणाच्या खांद्यावर बंदूक ठेवतोय याचा तरी भाजपने विचार करावा. राहता राहिला सवाल राणा दांपत्यांचा तर त्यांना त्यांच्या मतदार संघात कवडीचीही किमत नाही. तर असे कमजोर लोक शिवसेनेचं काय करणार आहेत. पवारांच्या घरावर हल्ल्याचा प्लान आखणारा सदावर्ते असाच उड्या मारत होता आता त्याची काय अवस्था झालीय ते बघा! भाजपच्या सुपारीवर काम करणाऱ्या राज ठाकरे आणि राणा दांपत्याचे सुद्धा तेच होणार आहेत.

गेल्या अडीज वर्षांपासून महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आहे आणि त्यांचे व्यवस्थित चाललेले आहे. त्यामुळे कसेही करून हे सरकार पाडायचे असे भाजपातील बामणी ठरवले आहे पण त्यांना यश येत नव्हते. कोल्हापूरच्या निवडणुकीत आमचा पराभव झाला तर हिमालयात जाईन अशी प्रतिज्ञा करणारा चंदू दादा आता तोंड लपवित फिरतोय आता का नाही हिमालयात जात? मशिदीवरील भोंग्याचा राज ठाकरेला केंव्हापासून त्रास व्हायला लागला. पण लोकांना भडकवण्यासाठी असे बोलघेवडे लोक कामाचे असतात हे भाजपने हेरले होते म्हणून भाजपने त्यांना हाताशी धरले आणि त्यांच्या तोंडून मशिदीवरील भोंगे हटवण्याची मागणी केली आणि त्या मागणीला कुठे तरी हिंदूंचा सपोर्ट मिळावा म्हणून चक्क मारुतीरायाला वेठीस धरले. नायतर हनुमान चालीसाचा आणि राज ठाकरेचा काय संबंध! राज ठाकरे आजवर किती वेळा हनुमंताच्या देवळात गेलाय. कितीवेळा त्याने हनुमान चालीसा पठाण केलाय. पण इडीच्या एका नोटीसीने राजला हनुमंताच्या पायावर डोक ठेवायला लावले. पण भाजपवाल्यांच्या नादाने त्याला हनुमान पावणआर नाही आणि राजच्या हनुमान चालीसाने भाजपचीही सत्ता येणार नाही. उलट जाती धर्मामध्ये तेढ निर्माण होईल, ...पान ६ वर

## दारु पिऊन घरी येणे सहन नाही झाले दारुड्या मित्राला दगड घालून ठार केले



नाशिक/क्राईम रिपोर्टर

**काही लोक किती जरी दारुडे असले तरी दारूच्या नशेत रात्री अपरात्री कुणी घरी आलेले त्यांना चालत नाही. सतना तालुक्यातील पिंपळवाडी येथे राहणारे घमजी आणि हिरामण हे दोघे जिवलग मित्र होत. ते दोघे एकत्र बसून प्यायचे. असे असतानाही घमजी हर रात्री ११ वाजता दारूच्या नशेत हिरामण याच्या घरी गेल्याने हिरामण चिडला आणि त्याने आपल्या या मित्राच्या डोक्यात दगड घालून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी हिरामणला अटक केली आहे.**

घमजी माळी आणी हिरामण पवार हे दोघे मद्यपी मित्र होते. दोघे सोबतच मद्यप्राशन करण्यास बसत होते. दोघांना मद्याचे भारी व्यसन असल्यामुळे दोघांची दारुच्या अड्ड्यावर न चुकता भेट होत असे. दारु विक्रेत्याचे दोघे नियमीत ग्राहक होते. घमजी रंगनाथ माळी हा पन्नास वर्ष वयाचा इसम सटाणा तालुक्यातील पिंगळवाडी येथील मुळ रहिवासी होता. कामधंद्यानिमीत्त तो सटाणा शिवारातील मोरे नगर परिसरातील दर्शन जितेंद्र सोनवणे यांच्या शेतात मजूर म्हणून काम करत होता. पत्नीसह चार मुले व एक मुलगी असा त्याच्या संसाराचा डोलारा होता. सुमारे विस वर्षापासून तो आपल्या परिवारासह दर्शन सोनवणे यांच्या शेतात परिवारासह राहून मजुरी करत होता. मद्यपान करण्यासाठी घमजी हा शेतमालक दर्शन सोनवणे यांच्याकडून कित्येकदा पैसे मागून घेत असे. मद्यपान करण्यासाठी घराबाहेर गेला म्हणजे तो अनेकदा तीन ते चार दिवस घरी देखील येत नसे. त्याची ही सवय घरातील सदस्यांना अंगवळणी पडली होती. २ एप्रिल २०२२ रोजी घमजी याने नेहमीप्रमाणे दुपारी चार वाजेपर्यंत शेतात कामकाज केले. त्यानंतर तो पत्नीला म्हणाला की मी जरा बाजारात जावून येतो. बाजारात जाण्याच्या निमीत्ताने त्याला मद्यपान करण्यासाठी जायचे होते. त्यासाठी त्याने शेतमालक दर्शन जैन यांच्याकडून शंभर रुपये मागून घेतले होते. बाजारात जाण्याच्या बहाण्याने घरातून गेलेला घमजी मद्यपान केल्यानंतर चांगलाच मद्यधुंद झाला. मद्याच्या नशेतच रात्री अकराच्या सुमारास तो त्याचा मित्र हिरामण पवार याच्या घरी गेला. एवढ्या रात्री घमजी आपल्या घरी आल्याचे हिरामण यास आवडले नाही. मद्याच्या नशेत घमजी रात्रीच्या वेळी घरी आल्यामुळे हिरामणला मोठा राग आला. त्याने घमजीसोबत वाद घालत त्याला घरातून हाकलून लावले. ...पान २ वर

## जमिनीचा वाद खूपच विकोपाला गेला सुपारी देऊन चुलत भावाचा खून केला

ठाणे/रुपेश वाढे



मयत मंगेश

**ठाणे जिल्ह्याचे प्रचंड वेगाने औद्योगिकरण होत असल्याने इथे जमिनीला प्रचंड भाव आलेले आहेत. त्यामुळे जमिनीच्या वादातून या भागात काही लोकांच्या हत्याही झाल्या आहेत. असाच काहीसा प्रकार शिळ डायघर भागातील दहिसर मोरी वाक्लन गावात घडला. या ठिकाणी जमिनीच्या वादातून एका इसमाने आपल्याच चुलत भावाला ठार मारण्यासाठी ५० हजारांची सुपारी दिली आणि त्याचा गेम केला. या प्रकरणी पोलिसांनी सुपारी देणाऱ्या मुख्य सूत्रधारासह सर्व आरोपींना अटक केली आहे.**

जमिनीच्या वादातून एका तरुणाची त्याच्याचं चुलत भावाने सुपारी देऊन हत्या केली असल्याचा धक्कादायक प्रकार ठाण्यातील शिळ डायघर परिसरातील दहिसर मोरी वाकळण गावात घडला आहे. वडिलोपार्जित मालमत्तेच्या वाटणीवरून झालेल्या वादातून हा खून करण्यात आला असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी ठाण्यातील डायघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी ३ जणांना ताब्यात घेतले असून त्यातील २ जणांना अटक केली आहे तर एकाची चौकशी सुरू आहे. या प्रकरणात आणखी काही आरोपी असण्याची ...पान २ वर

## पैंसे कमविण्यासाठी तिने शॉर्टकट निवडला अश्लील चॅटिंगने दोघांना तुरुंगवास घडवला

सातारा/क्राईम रिपोर्टर

**आजकाल माणसाला कमी वेळात आणि फारशी मेहनत न करता पैसे हवे असतात आणि त्यातूनच अशा लोकांची पावले गुन्हेगारीकडे वळतात. जावली तालुक्यातील कुडाळ येथे राहणाऱ्या हेमंत आणि पूनम या मोरे दांपत्यालाही असेच पैसे कमवायचे होते म्हणून हेमंतने चक्क बायकोच्या सौंदर्याचा वापर करून तिचे फेसबुक अकाऊंट उघडले आणि त्यावरून ती सावज हेरून त्यांना आपल्या जाळ्यात ओढायची आणि त्यांच्याशी अश्लील चॅटिंग करून त्यांच्या कडून पैसे उकळायची तिचा हा धंदा चांगला चालला होता. पण एकाला तिने ब्लॅकमेल करून त्याच्याकडे आणखी पैशाची मागणी करताच त्याने सरळ पोलीस ठाणे गाठले आणि तिच्या विरुद्ध फिर्याद नोंदवतच पोलिसांनी सापळा रचून या बंटी-बबलीला ताब्यात घेतले.**



पूनम मोरे व हेमंत मोरे हे दोघे नवरा बायको काही ही कामधंदा न करता पैसे मिळविण्याच्या विचारात होते, नव्हे तर तसा त्याचा मानस होता. ते मुळचे वाई तालुक्यातील ओझर्डे येथील होते.पण सध्या ते दोघे जावली तालुक्यातील कुडाळ येथे राहत होते. या दोघाच्या लग्नाला कमीत कमी दहा वर्ष झाली होती.त्या दोघांचा संसार बऱ्यापैकी चालला होता. हेमंत हा देखील मिळेल ते काम करून कुंटूंबाचा गाडा ओढत होता. पण यातून त्याची गृहग्रहस्थी चालत नव्हती. त्यातच याची बायको पूनम हिला छान छोकी राहण्याची सवय लागलेली होती. तशी ती दिसायला ही सुंदर आणि देखणी असल्याने तिच्याकडे कशाचीच ही कमतरता नव्हती. ती सतत नवऱ्याच्या पाठीमागे अनेक डिमांड करत होती. तिची ती डिमांड पुर्ण करेपर्यंत हेमंतच्या नाकी नऊ येत होते. कमी पैशात तो तिची डिमांड पुर्ण करू शकत नव्हता. तशी त्या नवरा बायकोची पस्थिीती ही बेताचीच होती. काय केले म्हणजे आपल्याला जादा पैसे मिळतील याचा ते दोघे विचार करीत असताना त्याना एक आयडीया सुचली. कमी श्रमात जादा पैसे मिळविण्यासाठी त्याने आता पत्नी पूनमचा वापर करण्याचे ठरविले होते. अलिकडच्या काळात मोबाईल इंटरनेटच्या जमान्यात सहजा सहजी कोणाला ही कसेही फसविता येत असल्याने पूनमला पुढे करून पैसा मिळविण्याचा हेमंतने विचार ...पान २ वर

## दिराचे होते वाहिनीवर प्रेम पतीने केला पत्नीचाच गेम

जळगाव/क्राईम रिपोर्टर



पोलीस निरीक्षक

**आजकाल समाजात व्यभिचार इतका बोकाळला आहे कि काही लोक नात्यागोत्याचा सुद्धा विचार करीत नाही. मात्र नात्यातील अनैतिक संबंध बाहेरच्यांना कळून समाजात कुटुंबाची बेअब्रू होऊ नये म्हणून मग काही लोक कुठल्याही थराला जातात. जळगाव जिल्ह्यातील गाळण गावात राहणाऱ्या चेतन याचे लग्नानंतरही त्याच्या मोठ्या वाहिनीशी अनैतिक संबंध होते. या संबंधाना मनीषाने विरोध करताच सासरच्या लोकांनी तिची गळा दाबून हत्या केली आणि तिचा हृदय विकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याचा बनाव केला, पण पोलिसांनी त्यांचा हा बनाव हाणून पाडला आणि पतीसह सासू सासरे दीर आणि जाऊ यांना अटक केली.**

बंजारा जमातीचा रहिवास असलेल्या धुळे तालुक्यातील तांडा कुंडाणे या गावी जगन्नाथ पवार राहतात. त्यांची कन्या मनिषा लग्नायोग्य झाली होती. जळगाव जिल्ह्याच्या पाचोरा तालुक्यातील गाळण येथील दलेरसिंग या तरुणाचे स्थळ त्यांना मनिषासाठी योग्य वाटले. लवकरच दोन्ही पक्षाकडून बोलणी करुन मनिषा आणि दलेरसिंग यांचे लग्न समाजाच्या चालीरीतीनुसार लावून देण्यात आले. लग्न झाल्यानंतर मनिषा सासरी गाळण येथे राहण्यास ...पान २ वर

## शुल्लक कारणावरून सासरा चिडला रागाच्या भरात सुनेचा मुडदाच पाडला

ठाणे/एस.कुमार



मयत सीमा

**सून ही सुद्धा मुली सारखीच असते. मात्र काही सासऱ्यांचा सुनेबाबत गैरसमज असतो. काहींना सुनेशी जवळीक साधायची असते, तर काही सासऱ्यांना वाटत असते कि आपली सूनच मुलाचे कान भरून आपल्याशी वाईट वागत आहे. यामध्ये ज्या सुना बाहेरख्याली असतात त्या सासऱ्याशी जुळवून घेतात. पण ज्या संस्कारी असतात आणि ज्यांना आपला संसार आपल्या मनासारखा चालावा असे वाटत असते. त्या सासू-सासऱ्यांना जुमानत नाहीत, मग असे सासू-सासरे सुनेची बाहेर बदनामी करू लागतात आणि मग शुल्लक कारण सुद्धा मोठ्या वादाला कारणीभूत ठरून त्यात एखाद्याचा जीव जातो. ठाण्यातील राबोडीत सुनेने वेळेवर नास्ता दिला नाही म्हणून सासऱ्याने गोळ्या घालून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

'सून कधी मुलगी होऊ शकत नाही आणि सासू- सासरे कधी आई- वडील होऊ शकत नाही'. हा जरा संशोधनाचा विषय आहे . पण सुनेनी सासू-सासऱ्यांशी 'सासू- सासरे म्हणून आणि सासूने सुनेशी 'सून' म्हणून वागण्यापेक्षा एक माणूस म्हणून वागले तर खूप काही गोष्टी साध्य होतील. येणारी नवीन मुलगी नवीन अनुभव घेऊन येते, तेंव्हा एखादी गोष्ट आम्ही



वपोनि घाटेकर

'अशीच' करतो हा ठेका चालवण्यापेक्षा नाविन्य स्वीकारायला काय हरकत आहे? 'Change is the constant thing in the world' बदल हीच कायमस्वरूपी राहणारी गोष्ट आहे, त्यामुळे तो स्वीकारणेच सर्वांच्या हिताचे असते. कारण आज ना उद्या, तुमची इच्छा असो वा नसो तुमचे कुटुंब पुढे तीच चालवणार आहे! येणाऱ्या ...पान २ वर

## अश्लिल सिनेमातील नटी पत्नीच वाटली संशय येताच पतीने तिची गर्दन छाटली

बंगळुरू/क्राईम रिपोर्ट



आरोपी जहरी

**ब्ल्यू फिल्म बघून तशाच प्रकारच्या लैंगिक संबंधाची पत्नीकडे मागणी करणे हि एक विकृती आहे. कारण कोणतीही संस्कारी बाई अशा विकृतीला बळी पडणार नाही, पण काही पती अशा बाबतीत सतत पत्नीवर दबाव टाकून तिचे शोषण करीत असतात. बंगळूरू येथील जहरी पाशा नावाच्या इसमाला अशीच विकृती होती, पण त्याची पत्नी याबाबत त्याला मनमानी करू देत नव्हती. पण एके दिवशी एका अश्लील क्लिप मधील पोर्नस्टार सेम त्याच्या पत्नी सारखी दिसत होती. त्यामुळे ती आपली पत्नीच आहे आणि आपल्या मागे ती ब्ल्यू फिल्ममध्ये काम करते असा त्याला संशय आला आणि याच संशयातून त्याने तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

बंगळुरू शहरातील रामनगर भागात जहीर पाशा हा पत्नी (रेश्मा) काल्पनिक नांव हिच्या सोबत राहत होता. त्याच्या लग्नाला कमीत कमी १५ वर्ष झाली होती. त्याना पाच मुले ही होती.त्याचा संसार सुखा समाधानाने चालला होता. त्यातच अलिकडे जहीर पाशाला पॉर्न फिल्म पाहण्याचे वेड लागले होती. त्याची पत्नी रेश्मा ही वयाच्या ३५शीत ही सेक्सी आणि मादक दिसत होती. ...पान ६ वर

## वेडाचा झटका येताच तिचा तोल गेला मनोरुग्ण मुलीने बापाचाच खून केला

गोवा/क्राईम रिपोर्टर



मयत कार्डोस

**मनोरुग्ण माणूस हा कुटुंबासाठी खूपच धोकादायक असतो. कारण त्याला वेडाचा झटका आला कि त्याच्या हातून काय घडेल याचा नेम नसतो. गोव्यातील आंबोली गावात राहणाऱ्या मारीयानी हिच्या बाबतीत सुद्धा असेच घडले. पतीने घटस्फोट देऊन सोडलेल्या मारीयानी हिच्या डोक्यावर परिणाम झाला होता. त्यामुळे वेडाचे झटके आले कि ती कोणावरही हल्ले करायची. असाच एके दिवशी तिने औषध घेतले नाही म्हणून वडील तिच्यावर चिडले. त्यामुळे तिला वेडाचा झटका आला आणि तिने सरळ बापावर हल्ला करून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी तिला ताब्यात घेऊन तिची मनोरुग्णालयात रवानगी केली आहे.**

मडगाव जवळील सासष्टी तालुक्यातील बांदर-आंबेली येथे फिदेरीस कार्डोस हे आपल्या पत्नी पावलीना आणि मुलगी मारियानी याच्या सोबत राहयला आहेत. कार्डोस परिवार हे तसे मध्यमवर्गीय कुंटूब होते.ते सहसा कोणाच्या अध्यात मध्यात राहत नव्हते. त्याची मुलगी मारियानी हिचा विवाह त्यांनी गेल्या २० ते २२ वर्षापूर्वी आपल्याच समाजातील एका तरूणाशी लावून दिला होता. मारियानी ही दिसायला सुंदर आणि देखणी होती. तिचा हसरा चेहरा असल्याने ...पान ६ वर



18 TO 24 APRIL 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 24/04/2022 4:37 PM Page 1



पान १ वरून....

## दारू पिऊन घरी येणे सहन नाही...

दोघे मित्र वाद घालत घरापासून काही अंतरावर चालत गेले. दोघांतील वाद चांगलाच वाढला होता. रागाच्या भरात हिरामणने घमजीला शिवीगाळ करत मारहाण सुरु केली. भांडणात राग अनावर झाल्याने हिरामणने घमजीच्या डोक्यावर बाटलीने घाव घातला. आधीच मद्याच्या नशेत झिंगणारा घमजी बाटलीच्या एका घावात खाली कोसळला. तो खाली पडताच चिडलेल्या हिरामणने जमिनीवर पडलेला मोठा दगड उचलून घमजीच्या डोक्यावर टाकला. त्यामुळे घमजीचे डोके फुटले व त्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव सुरु झाला. रक्तस्त्राव झाल्यामुळे घमजी जागीच ठार झाला. घमजी ठार झाल्यानंतर हिरामण आपल्या घरी जावून पुन्हा झोपी गेला. घमजी यास मद्याचे व्यसन होते. घरातून बाहेर गेल्यावर तो अनेकदा दोन ते तिन दिवस घरी येत नसे. हा प्रकार त्याच्या घरातील सदस्यांना माहिती होता. त्यामुळे इकडे घमजीची हत्या झाल्याचे त्यांना माहीतीच नव्हते. तो मद्याची नशा उतरल्यावर काही दिवसांनी घरी येईल असे समजून सर्वजण त्याची वाट न बघता झोपी गेले होते. दुसरा दिवस उजाडला. सटाणा शहरातील कंधाणे फाट्यावर ३ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास हॉटेल गुरुकृपाच्या मागे असलेल्या मैदानात एका इसमाचा मृतदेह पडला असल्याची माहिती सटाणा पोलिसांना समजली. मयत घमजी हा पोलिसांसह सर्वांच्या दृष्टीने अनोळखी होता. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सर्वांसाठी अनोलखी असलेला घमजी रक्तबंबाळ अवस्थेत पडलेला होता. त्याच्या डोक्याचा चेंदामेंदा झाला होता, त्यामुळे त्याच्या डोक्यातून व कानातून मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाला होता. त्याच्या डोक्यावर, उजव्या कानाच्या वर तसेच डोक्याच्या पाठीमागे जबर मार लागून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झालेला होता. त्याच्या डोक्याजवळ एक मोठा दगड पडलेला होता. त्या दगडावर ठिकठिकाणी रक्ताचे डाग पडलेले होते. शिवाय बाटलीच्या काचादेखील पडलेल्या होत्या. सटाणा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुभाष अनमुलवार हे पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले होते. हा खूनाचा प्रकार असल्याचे त्यांच्या लक्षात आले. पोलिसांनी घटनास्थळ व मृतदेहाचा पंचनामा करुन मृतदेह शव विच्छेदनाकामी शासकीय रुग्णालयात रवाना केला. मृतदेहाची ओळख पटल्यानंतर पुढील तपास सोयीचा होणार होता. त्यासाठी पोलिसांनी मयताची ओळख पटवण्याचे काम हाती घेतले. तपासाअंती मयताचे नाव घमजी रंगनाथ माळी असल्याचे त्यांना समजले. मयताचे नाव आणि रहाण्याचे ठिकाण समजल्यानंतर पोलिसांनी त्याच्या परिवारातील सदस्यांसोबत संपर्क साधून सर्व सोपस्कार पूर्ण केले. त्यानंतर मृतदेह अंत्यसंस्कारासाठी त्यांच्या ताब्यात देण्यात आला. मयत घमजीची पत्नी कमलताई हिच्या फिर्यादीवनुसार अज्ञात इसमाविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा सटाणा पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. ८१/२२ भा.दं.वि. कलम ३०२ नुसार दाखल करण्यात आला. नाशिक ग्रामीण पोलिस दलाचे पोलीस अधीक्षक सचिन पाटील, उपअधीक्षक सुर्यवंशी यांनी घटनास्थळी भेट देत तपासकामी अधिकारी व कर्मचारी वर्गाला सुचना दिल्या. पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील व त्यांच्या पथकाला समांतर तपासाच्या सुचना देत तपासकामी रवाना केले. सटाणा पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्तपणे तपासाला सुरुवात केली. पोलीस निरीक्षक सुभाष अनमुलवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण पाटील, उपनिरीक्षक राहुल गवई, हवालदार कदम, जिभाऊ पवार, शिंदे, पोलीस नाईक अजय महाजन, अतुल आहेर, विजय वाघ, निरभवणे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, सहाय्यक उपनिरीक्षक ज्ञानेश्वर शिरोळे, विठ्ठल बागुल, संजय पाटील, हवालदार नामदेव खैरणार, भगवान निकम, बापू पारखे आदी पथक कामगिरीवर लागले. घमजी माळी याचे कोणाशी वैर होते का? याबाबत गोपनीय माहिती घेतली जात होती. या तपासात घटनास्थळापासून १५ फुट अंतरावर असणाऱ्या हिरामण नामदेव पवार याच्याकडे चौकशी करण्यात आली. त्याचे घर घटनास्थळापासून साधारण पंधरा फूट अंतरावर असतांना देखील तो आणि त्याच्या परिवारातील सदस्य पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे देत होते. त्यांच्या घरासमोर हत्येचा प्रकार घडलेला असतांना त्यांनी कोणाला काहीच कसे सांगितले नाही. त्यामुळे येथेच काहीतरी पाणी मुरत असल्याचा संशय पोलिसांना आला. त्यातच घमजी आणि हिरामण हे दोघे मित्र होते. ते मद्यपानासाठी एकत्रच जात येत होते हे पोलिसांना चौकशीत समजले होते. याशिवाय हिरामणच्या हालचालीही संशयास्पद दिसत होत्या. त्यामुळे पोलिसांचा त्याच्यावरील संशय बळावला. अखेरीस पोलिसांनी हिरामण नामदेव पवार याच्याकडे कसून चौकशी सुरु केली. पोलिसांनी त्याची कधी गोडीगुलाबीने तर कधी कसून चौकशी केल्यानंतर तो गोंधळला. अखेर त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली. त्याने दिलेल्या कबुलीनंतर त्याला अटक करण्यात आली.

## जमिनीचा वाद खूपच विकोपाला गेला...

शक्यता पोलिसांनी वर्तवली असून त्या दिशेने पोलिसांचा तपास सुरू आहे. वडिलोपर्जित मालमत्तेच्या वादातून चुलत भावाने आपल्या साथीदारांना ५० हजार रुपयांची सुपारी देऊन कट रचत हत्या केल्याचा प्रकार शिळ डायघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला आहे. शिळ डायघर पोलिसांनी या प्रकरणी शिताफीनं गुन्हा उघडकीस आणला आहे. ठाण्यातील शिळ डायघर येथील वाकळण गावातील २५ वर्षीय तरुण मंगेश मारुती पाटील हा कामानिमित्त घराबाहेर गेला. मात्र, तो घरी परतला नाही. मंगेश अचानक बेपत्ता झाल्यामुळे त्याच्या घरच्यांनी त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. शोध घेऊन हताश झाल्यानंतर मंगेशच्या नातेवाइकांनी १२ एप्रिल रोजी शिळ डायघर पोलिस ठाण्यात मंगेश बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. शीळ डायघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली डायघर पोलिसांनी तक्रार नोंद करत मंगेशचा शोध सुरू केला. यावेळी पोलिसांनी तांत्रिक यंत्रणांची मदत घेत तपासला सुरुवात केली. पोलिसांनी मंगेश पाटीलच्या मोबाईल क्रमांकाचे कॉल डिटेल्स प्राप्त केले. त्या कॉल डिटेल्समध्ये एका संशयित नंबरवरून मंगेशला अनेक फोन आल्याचे पोलिसांच्या निदर्शनात आले. पोलिसांचा संशय बळावला आणि पोलिसांनी त्या दिशेने तपास केला असता पोलिसांनी प्रवीण जगताप याला गाठले. सुरवातीला प्रवीण ने पोलिसांना उडवाउडवीची उत्तर दिली. मात्र, पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर त्याने मंगेशचा चुलत भाऊ अक्षय पाटील यांच्या सांगण्यावरून आपल्या साथीदारांच्या मदतीने मंगेशचा खून केला असल्याची कबुली पोलिसांना दिली. मंगेशला ठार मारण्यासाठी अक्षयने त्यांना ५० हजार रुपये देऊन सुपारी दिली असल्याचे देखील त्याने पोलिसांसमोर कबूल केले. या प्रकरणी पोलिसांनी प्रवीण जगताप आणि राहुल सूर्यवंशी या २ जणांना अटक केली असून सुपारी देणारा चुलत भाऊ आणि हत्येचा मुख्य सुत्रधार अक्षयला ताब्यात घेतले आहे. पोलीस अक्षयची कसून चौकशी करत आहेत. लवकरच त्याला देखील अटक करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. तर या प्रकरणात आणखी काही आरोपी असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली असून त्या दिशेने तपास सुरू असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त व्यंकट आंधळे यांनी दिली आहे. वडिलोपार्जित मालमत्तेसाठी मंगेश हा नेहमी अक्षयला आडकाठी करत असल्यामुळे त्याचा काटा काढण्यासाठी अक्षय पाटील याने आपल्या साथीदारांच्या मदतीने कट रचला. त्यानुसार आरोपी प्रवीण जगताप आणि राहुल सूर्यवंशी यांनी मंगेशला घराबाहेर गाठत त्याला चारचाकीतून उल्हासनगर येथे घेऊन गेले. तिथे त्याला दारू पाजली. त्यानंतर मद्यधुंद अवस्थेत असलेल्या मंगेशला आरोपी हे मुरबाड येथे घेऊन गेले आणि त्याचा गळा आवळून त्याच्या गळ्यावर चाकूने वार करून त्याची हत्या केली. पुरावा नष्ट करण्यासाठी आरोपींनी निर्जनस्थळी त्याचा मृतदेह जमिनीत पुरला असल्याचे पोलीस तपासात हे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी आरोपींच्या विरोधात ३०२, ३६४, २०१, १२० (ब) प्रमाणे गुन्हा नोंद केला असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त व्यंकट आंधळे यांनी दिली आहे.

## पैसे कमावण्यासाठी तिने शॉर्टकट निवडला...

केलेला होता. तसे त्याने तिला बोलून ही दाखविले. पैशासाठी तिची काहीही करण्याची तयारी असल्याने तिने ही या कामाला होकार दिला. त्याने तिला पैसे कसे मिळवायचे.कोणाला काय सांगायचे आणि एखादे सावज हेरून त्याला जाळ्यात कसे ओढायचे हे सगळे समजावून सांगितले होते. पैसे मिळविण्याचा त्यांनी शार्टकट फंडा शोधून काढला होता. त्यासाठी त्याने तिला एक अॅनड्राय ४ जी मोबाईल ही घेवून दिला. अलिकडे ती त्या मोबाईलवरून अनेकांशी संपर्क साधू लागली होती. तिने आपल्या मोबाईलमध्ये फेसबुक अंकाऊंट,व व्हॉटअप अंकाऊंट उघडले होते. अलिकडच्या काही दिवसात तिने आपल्या फेसबुकवरून अनेकांशी मैत्री जमविली होती. फेसबुकवरील प्रोप्राईल ही सेक्सी असे ठेवले होते. तिचा तो फोटो बघून अनेकजण तिच्याशी मैत्री करायला सहजच तयार होत होते. तिने फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली की तिची मैत्री स्विकारायला अनेक तरूण धडपडत होते. नेमके हेच तिने हेरले होते. ती आता फेसबुक आणि व्हॉटअॅपवरून अनेकांशी अश्लिल चॅटिंग ही करीत होती. ती अनेक मित्राशी अश्लिल चॅटिंग करू लागल्याने तिच्या मित्रांच्या संख्येत ही वाढ झालेली होती. पूनम मोरे ही तशी अनेकांना चालू वाटत होती. त्यामुळे अनेकजण तिच्याशी मैत्री करायला ही उत्सुक होते. फेसबुकवरून आणि व्हॉटअॅपवरून ती संवाद साधताना आपण घटस्फोटीत आणि तरूण आहोत आपल्याला नवऱ्याने फसविले आहे मला आता एका साथीदाराची गरज आहे असे भासवत होती. योग्य जोडीदार मिळाला की मी त्याच्याशी सहजीवनची परत नव्याने सुरूवात करेन असे सांगत होती. प्रत्यक्षात ती विवाहित असून ती नवऱ्याबरोबर राहत असल्याचे कोणला माहित नव्हते. त्यामुळे तिच्या गोड बोलण्याला लोक भुलत होते. जितेंद्र सोपान जाधव हा बोपेगाव येथील तरूण तिच्या मोहक बोलण्याला फसला होता. तो ही तिच्याशी व्हॉटअपवरून अश्लिल चॅटिंग करू लागला होता.त्या चॅटिंगमधून ती त्याच्याशी सेक्स करायला तयार आहे असे त्याला वाटत होते. म्हणून तो ही तिच्या नाजूक बोलण्यात अडकून भलतीकडेच भरकटत चालला होता.तिने त्याला आपले नाव पूनम शंकर घाडगे असे सांगितलेले होते. त्या दोघांची प्रत्यक्षात भेट नव्हतीच. व्हॉटअपवरून चुम्मा चाटी चाललेली होती. बोलता बोलता तिने त्याला आपल्याला तीन लाख रूपयाची गरज आहे मला तू देशील का? त्याला ती प्रियेसीसारखीच वाटत असल्याने त्याने तिला पैशाची मदत्त म्हणून २ लाख ८९ हजार रूपये हे आपल्या बॅंकेतील आरटीजीएस द्वारे तिच्या बॅंक खात्यावर पाठविले.पैसे मिळताच तिने आपले व्हॉट्सअॅप व मोबाईल नंबर बंद करून त्याच्याशी संपर्क तोडून टाकला. त्यात काही महिने असेच निघून गेले त्यानंतर तिने सटालेवाडी येथील एका तरूणाशी असाच फेसबुकवरून संपर्क साधला.त्याच्याशी ही अश्लिल बोलत मैत्री केली त्याला ही लग्न करतो म्हणून लग्नाचे अमिष दाखविले.त्याचेकडून ही तिने जवळपास १ लाख रूपये गुगल पे वरून घेतले. त्यानंतर त्याला ही तिने असाच चुना लावला.अशाप्रकारे तिने अन्य दोघा तिघाजणांच्या कडून लाखोच्या घरात पैसे उकळले. या सगळ्या प्रकारामध्ये तिचा नवरा हेमंत मोरे हा पडदयाआडून काम करीत होता. प्रत्याक्षात तो पत्नी पूनमला दुसऱ्याबरोबर सेक्स करण्याची ऑफर सुचवायचा आणि त्याचेकडून पैसे कसे उकाळायचे हे सांगत होता. बोपेगाव येथील जिंद्र जाधव हा शिवशक्ती नागरी सहकारी पत संस्थेत काम करीत असल्याचे तिला माहित होते.अगोदरच तिने त्याचेकडून २ लाख ८९ हजार रूपये उकळले होते.त्यानंतर तिने परत त्याला गाठून मी तुझ्याशी लग्न करायला तयार आहे मला आणखीन पैसे दे अशी मागणी केली. सुरूवातीला ती ज्या मोबाईलवरून त्याच्याशी अश्लिल चॅटिंग करीत होती तो नंबर तिने परत चालू केलेला होता आता ती त्याचा वापर करून जितेंद्र जाधव याला धमकावू पाहत होती. ती त्याला वेगवेगळ्या ठिकाणी भेटायला बोलवत होती. तिने त्याला धनश्री हॉटेल, शहाबाग, आधार हॉस्पिटल येथे भेटायला बोलवले होते. ती परत त्याच्याकडे पैसे मागत होती. ती त्याला धमकावत जीवे मारण्याची धमकी ही देवू लागली होती. अजून दोन लाख रूपये दे नाही तर तू माझ्याशी व्हॉटअपवरून केलेले अश्लिला चॅटिंग तुझ्या घरच्या लोकांना आणि तू ज्या संस्थेत नोकरी करतोस त्या ठिकाणी तुझ्या मित्रांना दाखवून तुझी बदनामी करेन अशी धमकी दिली. तिच्या या धमकीला घाबरून अखेर जितेंद्र जाधव याने वाई पोलीस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली. वाई पोलीस या घटनेचा तपास करीत असताना सोशल मिडीयावरील त्या नंबराचे मेसेज त्यांनी चेक केले असता तो नंबर पूनम हेमंत मोरे ही माहिला वापरत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. मोबाईल कॉलच्या डिटेक्शनवरून पोलीसांनी पूनम मोरेचा पत्ता शोधून काढून पोलीसांनी तिला ताब्यात घेतले.तिच्याकडे पोलीस या घटनेची चौकशी करीत असताना तिने या कामात आपला नवरा हेमंत मोरे हा ही मदत करीत असल्याची माहिती देवून त्याच्या सांगण्यावरूनच आपण हे काम करीत असल्याची माहिती पोलीसांना दिली. तिने अनेकांना आपली ओळख ही पूनम शंकर घाडगे व पूनम विजय कदम अशी सांगितलेली होती. तिचे खरे नांव हे पूनम हेमंत मोरे असे होते. आता पर्यत या नवरा बायकोने आतापर्यत जवळपास पाच सहा जणांना पाच ते सहा रूपयाचा गंडा घातला होता.जितेंद्र जाधव याने केलेल्या तक्रारीवरून पोलीसांनी पूनम हेमंत मोरे (वय २८) व तिचा नवरा हेमंत विजय मोरे (वय ३१) याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्याना पोलीसांनी कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने त्याना २० एप्रिल २०२२ पर्यतची पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान त्यांनी आपला गुन्हा मान्य केला होता. या घटनेचा तपास जिल्हा पोलीस प्रमुख अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधिक्षक अजितकुमार बोऱ्हाडे,उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे याच्या मार्गदर्शनाखाली पो.निरी.बाळासाहेब भरणे,सपोनि.रविंद्र तेलतुबंडे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विजय शिर्के, महिला पोलीस नाईक सोनाली माने, पो.कॉ.किरण निंबाळकर, श्रावण राठोड,अमित गोळे,प्रसाद दुदस्कर यांनी केला. हल्ली शॉर्टकटने पैसा मिळविण्यासाठी अनेकजण आपल्या पत्नीचा ही वापर करतात त्यातून ते तिला गैरमार्गाला लावत असतात हेच या घटनेवरून दिसून येते. बाई म्हटले की अनेकजण भुलतात तिच्याशी सेक्स करायला तयार असतात पर प्रत्यक्षात ती कोणाच्याच सहजा सहजी हाताला लागत नसते.

## दिराचे होते वाहिनीवर प्रेम...

आली. सुरुवातीला काही दिवस तिच्यासाठी चांगले गेले. लग्नाला सहा महिने उलटून गेले. आपल्या आपण सुखात आहोत असे मनिषाने माहेरी सांगितले होते. त्यामुळे तिच्या माहेरचे निर्धास्त होते. सहा महिन्यानंतर मनिषा जसजशी सासरी रुळत गेली तशा काही गोष्टी तिला खटकू लागल्या. तिचा नवरा तिच्यासोबत लडीवाळपणे रहाण्याऐवजी आपल्या मोठ्या वहिनीसोबत जास्त लगट करत असल्याचे तिला समजून आले. सुरुवातीला तिने त्याकडे दुर्लक्षच केले. एके दिवशी मात्र मनिषाला एक आगळेवेगळे दृश्य बघण्यास मिळाले. ती नकळतपणे आपल्या मोठ्या जावेच्या बेडरुममधे गेली. तेव्हा तिला तिची जाऊ आणि तिचा पती चेतन नको त्या अवस्थेत दिसून आले. ते दोघे कामक्रिडा करत असतांना तिला दिसले. तिच्या पायाखालची वाळूच सरकली. ते दृश्य बघून ती हबकली होती. तिने तेथून काढता पाय घेतला आणि आपल्या खोलीत येऊन ढसाढसा रडली. तिचे ते अचानक रडणे ऐकून घरातील सर्व जण चक्रावून गेले. ते तिला रडण्याचे कारण विचारु लागले. मला माहेरची आठवण येते असे ती म्हणू लागली. तेव्हा तिच्या सासरच्या लोकांनी तिला काही दिवसांसाठी माहेरी पाठवले. मनिषा अचानक माहेरी आल्याने तिच्या माहेरच्या लोकांना धकाच बसला. तिला विश्वासात घेवून तिच्या येण्याचे कारण विचारले असता तिने रडत रडत आपल्या नवऱ्याचे कारनामे त्यांना सांगितले. ते ऐकून माहेरचे लोक धास्तावले. त्यांना धक्का बसला होता. पण त्यांनी आपल्या मनाची समजूत काढत मनिषाला समजावून सांगितले. तुझा गैरसमज झाला असावा. तुझा तरणाबांड नवरा तुझ्या जावेसोबत कामक्रिडा कसा करेल? असे म्हणत त्यांनी तिची समजूत काढली. 'तू पतीबद्दल संशय घेवू नकोस. उगाच त्याची ही गोष्ट सांगून आयुष्याचं नुकसान करुन घेशील. नवरा चुकत असल्यास त्याला विश्वासात घेऊन त्याची चुक पदरात घे असे सांगून तिची समजून काढण्यात आली आणि तिला पुन्हा सासरी पाठवण्यात आले. खरे तर यामुळे मनिषाची कोंडी झाली होती. माहेरच्यांनी तिच्या पतीचीच बाजू घेतल्यामुळे तिला काहीच बोलता आले नाही. पण एके दिवशी ही कोंडी फुटली आणि तिने नवऱ्याला याबद्दल विचारले असता तो उसळून तिला म्हणाला माझ्या आणि वहिणीच्या संदर्भात बोलण्याची तुझी हिंमतच कशी झाली. असे म्हणत चेतनने तिला कानफटात लगावली. यापुढे आमच्या संबंधाबाबत चकार शब्द काढायचा नाही, नाहीतर जन्माची अद्दल घडवेन असे म्हणत तो खोलीतून बाहेर आला. खरे तर चेन आणि त्याच्या वहिणीच्या अनैतिक संबंधाबद्दल त्याच्या घरच्यांना माहिती होते. पण चेतनपुढे त्यांचे काही चालत नव्हते. ते सर्व जण चेतनचे मिंधे होते. घराण्याची अब्रू चव्हाट्यावर यायला नको म्हणून सर्व जण मूग गिळून गप्प होते. मनिषालाही हे प्रकरण समजल्याने त्यांनी मनिषाला सहानुभूती दाखवली आणि शांत राहण्याचा सल्ला दिला. मोठ्या वहिनीसमोर चेतनचं काहीच चालत नव्हते. मोठी वहिणी घरातील सर्वांना दाबून टाकते. तिचा शब्द घरात प्रमाण आहे. तेंव्हा तु सुद्धा जास्त त्रास घेवू नको. आहे तसं राहू दे असा सल्ला मनिषाला सर्वांनी दिला. यावेळी ही बाब मोठ्या वहिनीला समजल्यानंतर ती चेकाळली. तिने मनिषाचे केस पकडत दम दिला. चेतन हा माझा आवडता दिर आहे. त्याच्यासाठी मी काहीही करेन. तो सुद्धा मी सांगेल तसेच वागतो. जर तु आगाऊपणा केलास तर तुला सरळ ढगातच पाठवेन असा सज्जड दमच तिला दिला. एके दिवशी माहेरी आल्यानंतर मनिषाने आपल्या वहिनीसमोर सत्य सांगितले. त्याठिकाणी मी कशी राहू? असे म्हणत ती ढसाढसा रडली तिचं दुःख ऐकून वहिनीही सद्गदीत झाली. तिने आपल्या नणंदेची कर्मकहाणी आपल्या नव-याला म्हणजे मनिषाच्या भावाला कथन केली. पण यावेळीदेखील त्याने तिला संयमाने राहण्यास सांगितले. तेव्हा समजूतदार मनिषाने संयमाने राहण्याचा निर्णय घेत ती सासरी परतली. दरम्यान तिला पती चेतनपासून गोंडस पुत्ररत्न झाले. आपल्याला बाळ झालय आता तरी नवरा बदलेल असा तिचा समज होता. मात्र तसे काही झाले नाही. त्यामुळे मनिषा अधिकच अस्वस्थ झाली. शेवटी ती लग्नाची बायको असल्याने सर्व प्रकारची बंधने झुगारुन मनिषाने रणचंडिकेचे रुप धारण केले. तिने चेतन आणि मोठ्या जावेला जाब विचारला. मांजरासारखी घाबरट असलेल्या मनिषाने जाब विचारताच चेतन सैतान झाला. त्याने दारामागे ठेवलेली काठी हातात घेत मनिषाला बेदम झोडपून काढले. काठीचे दोन-तीन दणके मनिषाच्या डोक्यात बसल्याने तिचे डोके फुटून मोठी जखम झाली. उपचारार्थ तिला दवाखान्यात नेले. तिथे तिच्या डोक्याला सहा टाके घालावे लागले. या घटनेनंतर मनिषा धास्तावली होती. वेळप्रसंगी पती आणि जेठाणी आपला मुडदा पाडायला कमी करणार नाहीत याची कल्पना तिला आली होती. तिने एके दिवशी चेतनसमोर काही दिवसांसाठी माहेरी जाण्याची परवानगी मागितली. ती त्याने दिली. माहेरी तिने काही दिवस काढले आणि पुन्हा सासरी आली. माहेरी सांगून काही उपयोग नाही हे मनिषा समजून चुकली होती. त्यामुळे मनिषा सावधगिरी बाळगत सर्वांसोबत अंतर ठेवून वागत होती. एके दिवशी घरकाम केल्यानंतर ती थकून गेली होती. तिला झोप येत असल्याने तिने आपले बेडरुम गाठले आणि ती बिछान्यावर आडवी झाली. काही वेळातच तिला गाढ झोप लागली.. ते पाहून तिचा लहान दीर चक्क तिच्या शेजारी येवून झोपला. तिला ही गोष्ट काही पटली नाही. तिने रणचंडिकेचे रुप धारण करत लहान दीराच्या कंबरड्यात लाथ घातली, तो लांब जावून आदळला. तिचे हे रूप पाहन तोही घाबरला आणि त्याने तेथून पळ काढला. आतापर्यंत तिने सगळे सहन केले होते. पण आता तिला ही गोष्ट सहन झाली नाही. तसे सरळ माहेरचा रस्ता धरला. आपल्या तान्हुल्यासह ती माहेरी आली. तिने आता पुन्हा त्या दलदलीत न जाण्याचा निर्णय घेतला होता. तेव्हा तिच्या भावाने आणि वहिनीने तिला धीर दिला. तिच्यापाठीमागे उभे रहाण्याचा निर्णय घेतला. एव्हाना मनिषाच्या सासरी लहान दीराचा प्रताप समजला होता. आधीच चेतन आणि त्याच्या वहिनीचे अनैतिक संबंध तिला कळले होते. त्यात दीराने केलेला प्रताप समजल्याने तिच्या सासरचे लोकही धास्तावले. आता आपल्या घराण्याची अब्रू ती चव्हाट्यावर आणेल म्हणून त्यांनी सावध पवित्रा घेण्याचा निर्णय घेतला. तिच्याशी गोड बोलण्यास सुरुवात केली. तिचे मन वळवून सासरी आणण्याचा त्यांनी निर्णय घेतला. त्यासाठी चेतनने आपल्या आई-वडीलांना राजी केले आणि तिला पुन्हा घरी आणण्यास मनिषाच्या गावी पाठवले. तेही मनिषाच्या माहेरी आले आणि त्यांनी तिची आणि तिचे आई-वडील, भाऊ यांची समजूत काढून तिला सासरी येण्यास गळ घातली. झालेल्या घटनांवर पडदा टाक आणि पुन्हा घरात ये. तुला त्रास होणार नाही असे सांगितल्याने मनिषा पुन्हा आपल्या सासरी आली. थोडे दिवस सर्व काही चांगलं चाललं होते. पण चेतन आणि त्याच्या मोठ्या वहिनीचे कारनामे काही थांबले नव्हते. मनिषाला हे समजल्यानंतर तिनेही पोलीस तक्रार करण्याची धमकी दिली. आता मात्र चेतन आणि त्याच्या वहिनीचे धाबे दणाणले. त्यादिवशी त्यांनी मनिषाला दमात घेण्याचा प्रयत्न केला. आम्ही कायमचे संबंध तोडू असेही म्हटले. मध्यरात्रीपर्यंत हा वाद घरात चालू होता. पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास चेतनच्या मोठ्या भावाचा ज्ञानेश्वरला फोन आला. मनिषाला हृदयविकाराचा झटका आल्याचे त्याला सांगण्यात आले होते. त्यात ती मरण पावली असा निरोप मिळाल्यानंतर ज्ञानेश्वरला यात काहीतरी काळेबेरे असल्याचे जाणवले. त्याने पुन्हा फोन लावून खात्री करून घेण्याचा प्रयत्न केला. पुन्हा तसेच सांगण्यात आले. तेव्हा त्याने चेतनच्या मोठ्या भावाच्या मेहुण्याला फोन करून माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्याने सांगितले की झोपेत मनिषा खाटेवरून पडली आणि तिच्या डोक्याला जबर मार लागल्याने ती मरण पावली असे त्याने सांगितले. तेव्हा मात्र ज्ञानेश्वरने पाचोरा पोलीस स्टेशन गाठले. तेथे जावून मनिषाच्या छळाबाबतची इत्यंभूत माहिती देवून तो मनिषाच्या सासरी गाळण येथे पोहोचला. मनिषाचा मृतदेह घरीच होता. त्याने त्याची पहाणी केली असता तिच्या गळ्यावर दोरीचे वळ होते. शिवाय सर्वांगावर मारहाणीच्या खुणा होत्या. त्याची शंका खरी ठरली होती. पाचोरा पोलीस स्टेशनला त्याने फिर्याद दाखल केली. त्यानुसार मनिषा चेतन राठोड हिच्या खूनप्रकरणी पती चेतन दलेरसिंग राठोड, जाऊ सयाबाई जयसिंग राठोड, दीर जयसिंग दलेरसिंग राठोड आणि लहान दीर भगवान दलेरसिंग राठोड या चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस निरीक्षक किसनराव नजनपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश चौबे करत आहेत.

## शुल्लक कारणावरून सासरा चिडला...

सुनेलाही काही गोष्टींची जाणीव व्हायला वेळ लागू शकतो. प्रत्येक गोष्टीला, नात्याला स्थिर व्हायला एक वेळ द्यावा लागतो. काहींना बोलल्याशिवाय काही गोष्टी कळत नसतील, तर संवादासारखे माध्यम नाही. पण त्यात कुठेही एकमेकांची उणी-दुणी न काढता आपले मत व्यक्त करणे एवढाच उद्देश असू द्यावा, बळजबरी नको. आपल्या मते एखादा चुकतोय ह्याचा अर्थ तो चुकीचाच आहे हे ठरवायचा हक्क आपल्याला नाही. आपण गोड भाषेत सुचविण्याचे काम करू शकतो त्याउपर प्रत्येकालाच व्यक्ती-स्वातंत्र्य आहे ह्याची जाणीव ठेवावी. मात्र तसं होत नाही .यातूनच अर्थाचा अनर्थ होतो आणि खुनासारख्या भयंकर घटनाचा जन्म होतो. सुनेने न्याहारी दिली नाही या रागातून ७६ वर्षीय सासऱ्याने सुनेची परवानाधारक रिव्हालवर मधून गोळी झाडून हत्या केल्याची घटना ठाणे येथील राबोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. त्या गुन्ह्याची ही माहिती ठाणे येथील ऋतू पार्क येथील विहंग शांतीवन या इमारतीत काशिनाथ पाटील (वय ७६) हें त्यांच्या कुटुंबियांसोबत राहतात.ते बिल्डर आहेत. शिवाय ते एका संघटनेचे उपाध्यक्ष आहेत. ठाण्यात ते बांधकाम व्यवसायिक म्हणून सर्वानाच परिचित आहेत. त्यांना दोन विवाहित मुलगे-सुना-नातवंडे आहेत. मात्र काशिनाथ पाटील हे त्याच्या दोन्ही सुनांना सतत टोमणे मारत असत. घरातील लोक आणि मित्र परिवारांमध्ये सुनांची तक्रार करत असे. आपल्याला सुनांकडून चहा, नास्ता व जेवण मिळत नसल्याची ते तक्रार करत असत. पाटील याच्या या सवयीमुळे त्याच्या घरच्या लोकांनी त्याच्याशी बोलणं बंद केलं होतं. गुरुवारी सकाळी त्याची मोठी सून सीमा पाटील (वय ४२) यांनी काशिनाथ पाटील यांना चहा दिला. मात्र नास्ता दिला नाही म्हणून पाटील यांना राग आला. तू मला चहा दिल्यावर नाश्ता का नाही दिला? असा सवाल त्यांनी सुनेला केला. त्यानंतर सूनेची आणि त्याची शाब्दिक चकमक उडाली. त्यामुळे संतापलेल्या पाटील यांनी आपल्या परवाना धारक बंदुकीतून सून सीमा पाटील यांच्यावर दि .१४ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजता गोळी झाडली. तशीच ती जमिनीवर कोसळली. बंदुकीच्या गोळीबाराच्या आवाजाने घरातील सर्व धावत बाहेर आले तेव्हा सीमा पाटील ही रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळली होती. तिला तात्काळ जवळील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. गोळी पोटात लागल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव सुरू होता. डॉक्टरांनी सीमा पाटील यांना वाचविण्याचे शर्थीने प्रयत्न केले. मात्र यात यश आले नाही शेवटी रात्री सीमा पाटील (वय ४२) यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. या घटनेची माहिती राबोळी पोलीस ठाण्याचे संतोष घाटेकर यांना मिळताच ते घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून प्रेत पोस्टमोर्टमसाठी रवाना केले. या प्रकरणी राबोळी पोलीस ठाण्यात मृत सीमाचे सासरे काशिनाथ पाटील यांच्या विरोधात भारतीय हत्यार कायद्यासह ३०२ नुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. ठाण्याचे पोलीस आयुक्त जयजीत सिंग ,अपर पोलीस आयुक्त अनिल कुंभारे,पोलीस उपायुक्त ए.एम.अंबुरे, सहा पोलीस आयुक्त श्रीमती सोनाली ढोले व वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष घाटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा तपास सुरू झाला. इकडे सुनेवर गोळी झाडून सासरे काशिनाथ पाटील फरार झाला होता.त्याच्या शोधासाठी ठाणे आणि राबोडी पोलिसांनी दोन विशेष पथक स्थापन करण्यात आले. गुरुवार सकाळपासून ते शनिवारी संध्याकाळपर्यंत तो गायब होता. ठाण्यातील मुंब्रा आणि कौसा परिसरातील अनेक भागात तो दोन दिवस लपत फिरत होता. तो दिवसभर ठाणे एसटी स्टॅंडजवळ फिरायचा आणि रात्री रिक्षात झोपायचा. दोन दिवस त्याची ही दिनचर्या सुरू होती. पण पोलीस आपल्या मागावर असल्याची कुणकुण लागताच तो स्वत: दिनांक १६ रोजी राबोली पोलीस ठाण्यात हजर झाला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष घाटेकर यांनी काशिनाथ पाटील यांची कसून चौकशी केली तेव्हा गुन्ह्याचा खरा प्रकार समोर आला. गोळीबार करण्यापूर्वी एक दिवस आधी पाटील यांच्या घरात भांडण झाले होते. यावेळी त्याने घरातील सदस्यांवर रिव्हॉल्वर रोखली होती. त्यानंतर कुटुंबीयांनी त्याच्याशी बोलणं बंद केलं होतं. त्याच्या कुटुंबीयांनी या प्रकरणाची तक्रार केली असती तर आम्ही काही करू शकलो असतो. पण दुसऱ्याच दिवशी नाश्ता न मिळाल्याने त्याने वेब्ले स्कॉट .३२ बोर रिव्हॉल्वरमधून मोठी सुन सीमा पाटील यांच्यावर गोळी झाडली. यात ती मरण पावली. पोलिसांनी काशीनाथ पाटील याला अटक केली. पोलिसांनी पाटील यांच्या घराची झाडाझडती घेतली. यावेळी पोलिसांना त्याच्या कपाटात काही काडतुसांसहीत १२ बोरची आणखी एक बंदूक सापडली. मात्र बिल्डरकडे लायसन्स आहे. त्याने त्याचे लायसन्स दाखवलं आहे. तपासात पाच जिवंत काडतुसे मिळाली आहे. त्यातील तीन काडतुसे रिव्हॉल्वरमध्ये सापडली आहेत. त्यातील एका काडतूस गोळीबार करताना वापरलं आहे. कपाटात आणखी तीन काडतुसे मिळाली आहेत.या घटनेचा पुढील तपास सुरू असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष घाटेकर यांनी सांगितले.

## भाऊंचे उद्यानासमोर ५०० किलो केळी वाटप

### जळगावमध्ये जैन इरिगेशनतर्फे जागतिक केळी दिन साजरा

**जळगाव/प्रतिनिधी**

जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. व जैन फार्मफ्रेश फूड्स लि. यांच्यातर्फे भाऊंचे उद्यानाजवळ जागतिक केळी दिन साजरा करण्यात आला. केळीचे आरोग्यदृष्टीने असलेले महत्त्व यावर विशेष चर्चा करण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्याहस्ते ५०० किलो केळी वाटप करून 'दररोज दोन केळी खा आणि निरोगी रहा' हा आरोग्याचा मंत्र देण्यात आला. भाऊंच्या उद्यानासमोर झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी जैन इरिगेशन सिस्टिम्स लि.चे आंतरराष्ट्रीय केळीतज्ज्ञ के. बी. पाटील, जळगाव केळी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. संजीव पाटील, केळी संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. गणेश देशमूख, जैन फार्मफ्रेश फूड्सचे किशोर रवाळे, सुदाम पाटील, एम. एन. महाजन, डॉ.विलास महाजन, सुरेश पाटील, दिनू चौधरी, सुनील लोढा, डॉ. प्रभाकर पाटील, डॉ. जे. आर. महाजन, मोहन राठोड, मोहन पी. चौधरी, मिलींद पाटील, संजय फराटे, भास्कर काळे, अलका शिरसाट, प्रतिभा भोळे, शंकुतला ठोंबरे, वासंती फासे, उषा इखनकर, सुरेखा वाणी, रेखा पाटील, आशा नाईक, स्मिता शुक्ल, छाया पाटील, मीनाताई शिरसाट, राजपूतताई पाटील, पुष्पा पाटील, सकूनसिंग ठाकूर, नीलिमा भंगाळे उपस्थित होते. जळगाव केळी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ.संजीव पाटील, केळी संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ.गणेश देशमूख यांच्याहस्ते केळी




वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. सुरवातीला केळीचे महत्त्व के. बी. पाटील यांनी सांगितले. केळीची खाद्यसंस्कृती, केळीपासून बनणाऱ्या पदार्थांची माहिती दिली तसेच जागतिक केळी दिनाबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. जागतिक केळी दिन २०१७ पासून सर्वप्रथम युरोपीयन देशांमध्ये साजरा केला जात आहे.

केळी दिवस साजरा करण्यामागील भूमिका अशी होती की, केळीमधील पोषकतत्त्वाचा विचार केल्यास सफरचंदापेक्षाही पाचपट जास्त पोषणमूल्य त्यात आहे. केळी फळाबद्दल असलेले समजगैरसमज दूर केले पाहिजे. अतिशय सुरिक्षित असलेल्या केळीला नैसर्गिकरित्या संरक्षण आहे. केळीचा प्रचार-प्रसार व्हावा सर्वसामान्यापर्यंत या फळांविषयी माहिती मिळावी यासाठी जागतिक केळी दिवस साजरा केला जातो. केळीमध्ये पॉटेशिअम, फॉस्फरस, आर्यन, व्हीटॅमन बी-६, कॅल्शिअम असते. श्रम करणाऱ्यांना, खेळाडूंना स्फूर्ती देण्याचे काम केळी करते. कुपोषण दूर करण्यासाठी केळी ची महत्त्वाची असून त्याचे सेवन केले पाहिजे. विकसीत देशांमध्ये ३० ते ३५ किलो दर डोई केळी खाल्ली जाते तर भारतात मात्र १२ किलो प्रति व्यक्ती केळी वर्षाला सेवन केली जाते. केळी हे गरिबांचे फळ असून ते बहुगूणी आहे. केळीबद्दल आपल्याला पुर्ण ज्ञान नसल्याने पिवळी धमक केळी ही कार्बायीडमध्ये पिकवलेली असते असा गैरसमज आहे. मात्र पिवळी धम्मक केळी म्हणजे शास्त्रोक्त पद्धतीने पिकवलेली केली हे जगभरात समीकरण आहे.अमेरिका युरोप जपान मिडल ईस्ट अशा सर्वच देशात केळी इथीलिन गॅस वापरून पिकवली जाते. जी केळी पोषक मानली जाते आपल्या कडे उत्तरप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र यासह संपूर्ण भारतात रायपनिंग चेंबरमध्येच केळी पिकवली जाते ही वस्तूस्थिती आजची आहे. पिवळीधमक केळी म्हणजे शास्त्रीय पद्धतीने पिकवली जाते. जागतिकस्तरावर केळीला अन्नघटकांपैकी महत्त्वाचे मानले जाते. प्रवासामध्ये सहज उपलब्ध होणारे आणि खाता येणारे सुरक्षित असे फळ आहे. जागतिक केळी दिनानिमित्त सकाळी नाश्ताला कचोरी, समोसा फास्ट फूड खाण्यापेक्षा दररोज दोन केळी खावी जेणे करून संभाव्य आजारांना दूर ठेवता येईल असा संकल्प करू या, असे आवाहन के. बी. पाटील यांनी केले. केळी पिकाच्या विकासासाठी गेल्या तीस वर्षापासून जैन इरिगेशन संशोधनात्मक कार्य करीत आहे. जैन इरिगेशनच्या पायाभूत केळीच्या विकासाच्या कार्यामुळे देशातून केळी ची उत्पादकता तीन पटीने वाढली तर कालावधी निम्मे झाला. निर्यातक्षम गुणवत्तेचे ग्रँड नैन टिश्युकल्चर म्हणजे देशातील केळी उत्पादकांना दिलेली एक अनोखी भेट आहे. ठिबक व फर्टीगेशन मुळे केळीची गुणवत्ता कमालीची सुधारली आहे.

त्यामुळे आज आपल्याकडे केळीची मोठी निर्यात होत आहे. बागायदारांच्या पाठिशी भक्कमपणे उभे राहण्यासाठी केळीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने जागतिक केळी दिन साजरा केल्याचेही के. बी. पाटील म्हणाले. भाऊंच्या उद्यानामध्ये आलेल्या नागरिकांनी सकाळी साजरा झालेल्या केळी दिनामध्ये उत्फूर्त सहभाग घेतला. यामध्ये महिलांचा लक्षणीय सहभाग होता.

## भिवंडीत हेल्मेट, सीटबेल्ट नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या वाहन चालकांसाठी वाहतूक पोलिसांची अभिनव जनजागृती मोहीम



**भिवंडी/अभिजित हिरे**

नव्या वाहतूक नियमन कायद्या नुसार दुचाकी चालकाने हेल्मेट न घातल्यास अथवा कार चालकाने सीटबेल्ट न लावल्यास भरमसाठ दंड आकारणी करण्याचा फतवा काढला. तरी सुध्दा वाहन चालक सर्रास पणे या नियमां कडे दुर्लक्ष करून वाहन चालक रस्त्यावर वावरताना दिसतात.

या वाहन चालकांवर सरसकट दंड आकारणी करण्या पूर्वी वाहन चालकांमध्ये जनजागृती करणे गरजेचे असल्याने पोलीस उपायुक्त बाळासाहेब पाटील यांनी वाहन चालकां वर दंडात्मक कारवाई करण्यापूर्वी वाहन चालकां मध्ये जनजागृती घडवून आणणे गरजेचे असल्याने सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर खैरनार यांच्या मार्गदर्शनाखाली कोनगाव वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीश गोडे यांच्या नेतृत्वाखाली मुंबई नाशिक महामार्गा वरील नेहमी वाहतूक वर्दळ असलेल्या राजनोली नाका या ठिकाणी वाहतूक पोलिसांनी हेल्मेट व सीटबेल्ट न लावलेल्या वाहन चालकां मध्ये आगळीवेगळी जनजागृती केली आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक विकास भिंगारदिवे व वाहतूक पोलिसांनी राजनोली नाका येथे पकडलेल्या वाहन चालकांच्या हाती एक फलक देऊन त्यावरील नियम व हेल्मेट व सीटबेल्ट न घातल्याने होणारे अपघात याची माहिती देऊन न थांबता त्याच वाहन चालकांच्या हाती तो फलक देऊन दुसऱ्या वाहन चालकास समजाविण्याची जबाबदारी देऊन जनजागृती करीत होते. वाहतूक पोलीस पकडल्या नंतर दंडात्मक कारवाई न करता जनजागृती करून सोडून देत असल्याने त्याचे कुतूहल अनेक वाहन चालकांच्या चेहऱ्यावर दिसून आले हे विशेष.

## वाड्यातील मुख्य रस्त्याच्या दुतर्फा असलेले अतिक्रमण हटविण्याची मागणी



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा शहरातील खंडेश्वरी नाका ते परळी नाका दरम्यान रस्त्याच्या दुतर्फा फेरीवाले, टपरीधारक व हाथगाडी वाल्यांनी अतिक्रमण केल्यामुळे वाहतूक कोंडी होऊन पादचारी, नागरिक व विध्यार्थ्यांना त्रास होत असल्याने. असे अतिक्रमण हटविण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने वाड्याचे तहसीलदार डॉ.उद्धव कदम व वाडा नगरपंचायतीला निवेदन देऊन हे अतिक्रमण लवकरात लवकर हटविण्याची मागणी केली आहे. अतिक्रमण हटवले नाही तर आंदोलन करणार असल्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेविका सुचिता पाटील, माजी सभापती व महिला अध्यक्षा मृणाली नडगे, आमदार दौलत दरोडा यांचे स्विय सहायक रोहिदास शेलार, विक्रमगड विधानसभा अध्यक्ष विराज पाटील, वाडा शहराध्यक्ष सुजित पाटील, प्रमूख पदाधिकारी कांती म्हसकर, नंदू वेखंडे, प्रकाश भानुशाली व इतर पदाधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

## आंतरराज्य गुन्हेगारांकडून पाच घरफोड्या उघडकीस



**सोलापूर/प्रतिनिधी**

एका आंतरराज्य सराईत गुन्हेगाराला सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली त्याच्याकडून पाच घरफोड्या उघडकीस आणून दागिन्यांसह दोन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यल्लप्पा उर्फ खल्ल्या अद्रक शिंदे (४०) अटक केलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. मारोळी येथे चोरट्यांनी फिर्यादी संपता लक्ष्मण पांढरे यांचे व त्यांचे शेजारी मारुती यशवंत शिंदे या दोघांच्या बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश सुमारे ९१ हजार ८०० रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास केली होती. याबाबत मंगळवेढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही घरफोडी करणारा आरोपी सध्या पंढरपूर शहरात राहात असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार पथकाने तेथे जाऊन त्यास ताब्यात घेऊन तपास केला असता मारोळी, लक्ष्मीदहिवडी, सलगर बुद्रुक व तेलगाव अशा पाच ठिकाणी घरफोडी केल्याचे सांगितले. त्याच्याकडून २४ ग्रॅम सोन्याचे दागिने व १२३ चांदीची नाणी, १४२० ग्रॅम नाणी असा एकूण २ लाख २ हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप, मंगळवेढा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजित माने यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे, सहाय्यक फौजदार खाजा मुजावर, पोलीस अंमलदार नारायण गोलेकर आदींनी केली आहे.

## लातुर तालुक्यातील तांदुळवाडी सोसायटी बिनविरोध

### आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते नूतन संचालकांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर तालुक्यातील मौजे तांदुळवाडी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या संचालकपदाची निवडणुक बिनविरोध झाली असून या निवडणुकीत नव्याने निवडण्यात आलेल्या संचालकांचा भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांनी सत्कार करुन त्यांना शुभेच्छा दिल्या. तांदूळवाडी सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेल्या संचालकात भागवत श्रीरंग सोट, नागनाथ विठ्ठल कोद्रे, दगडू महादू सोट, समाधान जगन्नाथ पवार, कुंडलिक सोपान सोट, मुकिंदा निवृत्ती गजेंद्र, मिराबाई देविदास गिरी, विशाल भागवतराव सोट, अजय धनराज कोद्रे, शिवकन्या भागवतराव सोट, रत्नाबाई बाळासाहेब सोट, गणपती मुरलीधर पांचाळ, पांडूरंग खंडू गायकवाड असे एकूण १३ जण बिनविरोध निवडूण आले आहेत. या सर्वांचा आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी नूतन संचालकाच्या वतीने भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष भागवत सोट यांनी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांचा सत्कार केला. यावेळी भाजपाचे गोपाळ पाटील काटगाव, श्रीराम कोद्रे, प्रशांत सोट, बालाजी पांचाळ, गोविंद पवार, सुरज पवार, स्वप्नील पवार, प्रिती गिरी, कौशल्या गजेंद्र, शाम पवार, धनराज कोद्रे यांच्यासह तांदूळवाडी येथील ग्रामस्थ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चला करुया संकल्प निरोगी महाराष्ट्राचा -उपमुख्यमंत्री अजित पवार

### जागतिक आरोग्य दिनानिमित्त फिट महाराष्ट्र उपक्रमाला सुरुवात

**मुंबई/प्रतिनिधी**

आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब करुन निरोगी महाराष्ट्राचा संकल्प करुया, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी येथे केले. राज्य शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई महानगरपालिका आणि मेडस्केप इंडिया यांच्यावतीने संकल्प निरोगी महाराष्ट्राचा (फिट महाराष्ट्र) उपक्रमाला आज सुरुवात करण्यात आली. त्यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हे आवाहन केले.

यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे, वैद्यकीय शिक्षण आणि सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. जागतिक आरोग्य दिनानिमित्त गेटवे ऑफ इंडिया येथे झालेल्या या कार्यक्रमात संकल्प निरोगी महाराष्ट्राचा उपक्रमाच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. उपमुख्यमंत्री




अजित पवार म्हणाले की, महाराष्ट्राने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली कोरोना कालावधीत अतिशय चांगले काम केले. मात्र अद्यापही आपल्याला आरोग्यासाठी पायाभूत सुविधा बळकट करायच्या आहेत, त्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. आरोग्याचा आणि विकासाचा एकमेकांशी संबंध आहे. कारण आरोग्यदायी व्यक्ती राज्य आणि देशाच्या विकासासाठी भरीव योगदान देऊ शकते. आपण कोरोनाच्या दोन लाटांवर मात केली. त्या काळातील स्वच्छतेच्या सवयी काळजीपूर्वक जपल्या पाहिजेत, असे आवाहन त्यांनी केले. बैठ्या जीवनशैलीमुळे आरोग्य समस्या उद्धवत आहेत. यासाठी नियमित व्यायाम, सकस आहार घेतला पाहिजे. तणावमुक्त जगण्यासाठीही विशेष प्रयत्न करायला हवेत. शरीराबरोबरच मनाचे आरोग्य जपण्यासाठीही विशेष प्रयत्न करायला हवेत, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे म्हणाले की, महाराष्ट्र कोरोनाच्या संकटावर मात करून पुढे आला आहे. आता आपण निरोगी महाराष्ट्राचा संकल्प करीत आहोत. यासाठी सर्व नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. नागरिकांच्या जोरावरच आपण कोरोना विरोधातील लढाई जिंकली आहे. त्यामुळे फिट महाराष्ट्र संकल्पना नागरिकांच्या जोरावरच साध्य होऊ शकेल, असे सांगितले. यावेळी आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ प्रदीप व्यास, प्रधान सचिव निलीमा करकेट्टा, आरोग्य आयुक्त डॉ. एन. रामास्वामी, आरोग्य सेवा संचालक डॉ साधना तायडे, उपसंचालक डॉ. विजय कंदेवाड, सहाय्यक संचालक डॉ. पद्मजा जोगेवार, उपसंचालक डॉ कैलास बाविस्कर, सहाय्यक संचालक डॉ. संजीव जाधव आदी उपस्थित होते.

## थोडक्यात वृत्तांत

### जवाहर नवोदय विद्यालयामध्ये प्रवेशासाठी ३० एप्रिल रोजी परीक्षा

लातूर : जवाहर नवोदय विद्यालय, लातूर येथील इयत्ता सहावीच्या वर्गासाठी लेखी परिक्षा ३० एप्रिल २०२२ राजी होणार आहे. ही परीक्षा जिल्ह्यातील ३६ केंद्रावर होणार असल्याचे प्राचार्य जी. रमेश राव यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे. ही परीक्षा लेखी स्वरूपाची असून ज्यांनी या परिक्षेसाठी ऑनलाईन अर्ज कलेले आहेत. त्यांचे परीक्षा प्रवेशपत्र www.navodaya.gov.in या संकेतस्थाळावर उपलब्ध झाले असून परिक्षेच्यावेळी या प्रवेशपत्राची प्रिंट घेवून येणे आवश्यक आहे. या प्रवेशपत्रावर विद्यार्थी पाचवी इयत्तेत शिकत असलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकाचा सही शिक्का घेणे आवश्यक आहे. सदर प्रवेशपत्र विद्यार्थीनी परीक्षेला बसत असताना पर्यवेक्षकाकडे जमा करणे आवश्यक आहे. या परीक्षेस विद्यार्थी, त्यांचे पालक व ते शिकत असलेल्या शाळेतील शिक्षक मुख्याध्यापकांनी याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. याबाबत अधिक माहितीसाठी प्रवेश परीक्षा प्रभारी बी.डी.शेख मो.नं.९८१७८३४९३०, व्हि.एच.खिल्लारे मोबाईल नं.९८६०५६८८४० यांच्या भ्रमणध्वणी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य जी. रमेश राव यांनी केले आहे.

### शंकरराव पाटील यांचे निधन



देवणी: येथील सेवानिवृत्त सहशिक्षक शंकरराव गुंडेराव पाटील वय ९८ वर्षे यांचे मंगळवार दि.१९ एप्रिल रोजी रात्री दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवार दि.२० एप्रिल रोजी दुपारी देव नदी तीरावरील पाटील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सुन, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. ते देवणी पंचायत समितीचे माजी उपसभापती प्राचार्य यशवंतराव पाटील यांचे वडील होते.

### सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन

लातूर : १ मे रोजी संपूर्ण महाराष्ट्रभर महाराष्ट्र दिन साजरा करण्यात येत आहे. या पार्श्र्वभूमीवर साजरा होणा-या महाराष्ट्र दिनानिमित्त सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती सर्वसामान्यांना मिळावी व त्याची व्याप्ती वाढावी, यासाठी कार्यक्रमांचे आयोजन केले असल्याचे, सहायक आयुक्त समाजकल्याण लातूर यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे. जिल्ह्यात शासनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो त्या ठिकाणी सामाजिक न्याय विभागाचा स्टॉल उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती पुस्तीका, माहितीपत्रके देण्यात येणार आहेत. या ठिकाणी सहाय्य आयुक्त, समाज कल्याण लातूर या कार्यालयातील कर्मचा-यांकडून सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. सामाजिक न्याय विभागाच्या वतीने समाज कल्याण आयुक्तालय, दिव्यांग आयुक्तालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण केंद्र (बार्टी), विभागांतर्गत कार्यरत महामंडळे या सर्वांची माहिती देणाऱ्या माहितीपत्रके सर्व ग्रामपंचायत, पंचायत समित्या, नगरपालिका, महानगरपालिका येथे वाटपासाठी पाठविण्यात येणार आहेत. ग्रामीण भागात जेथे शासकीय झेंडावंदनाचा कार्यक्रम होतो, त्याठिकाणी ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, मुख्य अधिकारी इत्यादी यांनी झेंडावंदनाच्या कार्यक्रमानंतर सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचे संक्षिप्त वाचन करतील. तसेच मुख्य शासकीय कार्यक्रमात पालकमंत्री सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची फलनिष्पत्ती बाबत संबोधित करतील.

### पाणी पुरवठा सुरळीत करा -शैलेश गोजमगुंडे

लातूर : गेल्या आठवड्यापासून लातूर शहरात दुषीत पाणी पुरवठा होत आहे. शिवाय पाणी नियमीत वेळेवर येत नाही. या पार्श्र्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या शिष्टमंडळाने पाणी पुरवठा विभागाच्या प्रभारी उपायुक्त मयुरा शिंदेकर यांची भेट घेतली. सध्याचा कडक उन्हाळा आणि रमजान महिन्याच्या पार्श्र्वभूमीवर सद्यस्थितीत होत असलेल्या पाणी पुरवठ्यातील प्रशासनाच्या हयगयीमुळे नागरीकांच्या जीवितास हानी पोचु शकते. शिवाय महानगरपालिकेच्या वतीने लातूरला केला जाणारा पाणीपुरवठा आधीच ८ दिवसाला होतो. मात्र सद्यस्थितीत काही भागात तो १२ ते १४ दिवसांनी होत आहे. ही स्थिती येत्या २ दिवसात बदलली नाही तर शहरातील जनतेचा जनक्षोभ उसळेल. त्याला सर्वस्वी मनपा प्रशासनच जबाबदार असेल. असे लेखी निवेदनाद्वारे व प्रत्यक्ष चर्चेच्या माध्यमातून भाजपाच्या शिष्टमंडळाने प्रशासनास सांगितले आहे. या शिष्टमंडळात गटनेते शैलेश गोजमगुंडे यांच्यासह शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, ॲड. दिपक मठपती, मंगेश बिराजदार, अजीत पाटील कव्हेकर, शैलेश स्वामी, सुनील मलवाड, संगीत रंदाळे, रागिणी यादव, देवा साळुंके, शोभाताई पाटील, शितल मालु आदींचा समावेश होता.

### कोकण विभगात ४ हजार ९१० पेक्षा अधिक एसटी कर्मचारी संप सोडून कामावर हजर

नवी मुंबई : कोकण विभगातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि पालघर या चार जिल्ह्यांतील आगारांत मिळून ४ हजार ९१० पेक्षा अधिक कर्मचारी संप सोडून कामावर हजर झाले आहेत. ५० टक्क्याहून अधिक एस.टी. वाहतूक सुरु झाली आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन अर्थात एस.टी. महामंडळाने दिली. २८ ऑक्टोबर २०२१पासून राज्यातील जवळपास ९२ हजार एस.टी. कर्मचाऱ्यांनी संप पुकारला होता. संपामुळे राज्यातील एस.टी. सेवा ठप्प झाली होती. दि. ८ एप्रिल २०२२ ते १८ एप्रिल २०२२ या कालावधीत कोकण विभागाच्या ठाणे जिल्ह्यातील आगारांत १ हजार ४२५, रायगड जिल्ह्यातील आगारांत १ हजार ६४४, रत्निागरी जिल्ह्यातील आगारांत १ हजार १२५ आणि पालघर जिल्ह्यातील आगारांत ७१६ कर्मचारी संपसोडून कमावर हजर झाले आहेत. कोकणात लवकरच शंभर टक्के एस.टी. वाहतूक सुरु होईल, असे आगार प्रमुखांकडून सांगण्यात आले आहे.

# फालतु नौटंकी...!

सद्या धर्माच्या नावाने महाराष्ट्रात जे काही सुरू आहे त्याचा जर वेळीच बंदोबस्त केला नाही, तर या पुरोगामी महाराष्ट्राचा पाकिस्तान व्हायला वेळ लागणार नाही. कोण कुठले राणा दांपत्य मुंबईत येऊन हनुमान चालीसा पठण करण्याच्या नावाखाली नौटंकी करतात आणि सरकार त्यांची नौटंकी सहन करते हे काही बरोबर नाही. देव धर्म हा माणसाच्या हृदयात, घरात आणि मंदिरात सुरक्षित असतो, त्याला रस्त्यावर आणून त्याची किंमत कमी करणाऱ्यांना अक्कल कधी येणार कुणास ठाऊक? या राज्यात ज्या काही समस्या निर्माण झाल्या आहेत त्या मातोश्रीवर हनुमान चालीसा पठण केल्याने दूर होतील असा जो रवी राणा आणि त्याच्या पत्नीचा दावा आहे तो अत्यंत बालिश आहे. तसे जर असते तर महाराष्ट्रातला प्रत्येक समस्याग्रस्त माणूस मातोश्रीवर गेला असता आणि तिथे जाऊन त्याने आपल्या समस्या निवारणासाठी हनुमान चालीसा पठण केला असता. वास्तविक अशा बालिश प्रवृत्तीच्या लोकांचे लोकसभा आणि विधानसभेतील सदसत्व रद्द करायला हवे. कारण असे लोक लोकप्रतिनिधी बनण्याच्या लायकीचे नाहीत. या लोकांना जर हनुमान चालीसा पाठणाच करायचा होता, तर त्यांच्या मतदार संघात अनेक हनुमान मंदिरे आहेत तिथे जाऊन हनुमान चालीसा पठण करायला हवा होता. एखाद्याच्या घरात जाऊन हनुमान चालीसा पठण करण्याचा बालिशपणा कशासाठी? कारण त्यांच्या या बालिशपणा मुले बिचाऱ्या पोलिसांवर विनाकारण दबाव आलाय. कारण राणा दांपत्य मातोश्रीवर हनुमान चालीसा पठण करायला येणार म्हणून शिवसेना कार्यकर्ते संतापले आहेत आणि ते मातोश्रीवर तसेच खरं येथील राणा दांपत्याच्या घरा बाहेर ठाण मांडून बसले आहेत आणि त्यांना आवरताना पोलिसांच्या नाकी दम येतोय. आणि हे सर्व त्या मूर्ख राणा दांपत्यांमुळे घडले आहे. त्यामुळे पोलिसांनी त्यांना तात्काळ ताब्यात घेऊन त्यांना पुन्हा अमरावतीला पाठवायला हवे होते. पण पोलिसांना तसे सरकारकडून आदेश मिळत नसल्याने पोलीस हतबल आहेत. पण त्यामुळे मुंबईची कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आली आहे. मुंबईकरांना विनाकारण त्रास होत आहे. मुंबईकरांनी हा त्रास का सहन करावा? कोण आहेत हे राणा दांपत्य? त्यांना जे काही करायचे असेल ते त्यांनी त्यांच्या मतदार संघात जाऊन करावे मुंबईत येऊन ही फालतू नौटंकी कशासाठी? अर्थात हे जे काही सुरू आहे त्याच्या मागे त्यांचा बोलवता धनी वेगळाच आहे. नायतर राणा दांपत्य येवढे धाडस नाही. ज्या लोकांची सत्ता गेली आहे ते सध्या व्याकूळ आहेत त्यांना पुन्हा सत्ता हवी आहे आणि त्यासाठी ही सर्व नाटके चालली आहेत. दुसऱ्याचा खांद्यावर बंदूक ठेऊन महा विकास आघाडी आणि खास करून शिवसेनेवर निशाणा साधला जातोय. अर्थात या घाणेरड्या राजकारणाशी मुंबईतील सर्वसामान्य लोकांना काहीच घेणेदेणे नाही. पण अशा घाणेरड्या राजकारणामुळे मुंबईसारख्या संवेदनशील शहराची कायदा आणि सुव्यवस्था मात्र धोक्यात येत आहे. आणि शांततेने जगू इच्छिणारा मुंबईकर माणसाचे अशा फालतू गोष्टींमुळे जिने हराम झाले आहे. अर्थात राणा दांपत्याचे शिवसेना किंवा पोलीस जे काही करायचे ते करतील, पण मुंबईकरांना जर नाहक त्रास झाला. तर मुंबईकर याना आणि यांचे जे कुणी बोलावते धनी आहेत त्यांना सोडणार नाहीत. राज ठाकरे यांनी मशिदींवरील भोंग्याचा विषय उकरून कडल आणि हनुमान चालिसला अच्छे दिन आले, ज्याने कधी हनुमंताच्या देवळाकडे ढुंकूनही पाहिले नव्हते ते आज हनुमान चालीसा पठाण करायला निघालेत. रवी राणा सांगतोय की शेतकऱ्यांचे प्रश्न सुटावेत, महाराष्ट्रावरील संकटे दूर व्हावीत म्हणून त्याला मातोश्रीवर हनुमान चालीसा म्हणायचं आहे. पण महाराष्ट्रातल्या शेतकरी इथला कष्टकरी यांच्याबद्दल या पूर्वी रवी राणा इतका कधी भौक झाला नव्हता. महाराष्ट्रात ४० हजार कर्जबाजारी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यातील ७० टक्के आत्महत्या रवी रणाच्या विदर्भात झाल्या आहेत. त्यात त्याच्या बायकोच्या अमरावती लोकसभा मतदार संघातील तसेच रवी रानाच्या बडनेरा मतदार संघातील शेतकऱ्यांचा सुद्धा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे, त्यांच्यासाठी यापूर्वी कधी राणा दांपत्याने हनुमान चालीसा पठण केले नाही किंवा आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या विधवांना कधी चार पैशाची मदत केली नाही. पण भाजपचा त्यांना टेकू मिळताच त्यांनी शिवसेनेशी पंगा घ्यायला सुरुवात केली. पण शिवसेना भाजपच्या संघर्षात यांची अवस्था किड्या मुंग्यांसारखी होणार आहे. कधी कुठे आणि कसे चिरडले जातील याचा त्यांना पत्ताही लागणार नाही. एसटी कामगारांनी असाच अतिरेक करून पवारांच्या घरावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. आज काय त्यांची अवस्था झालीय ते तरी बघा! त्यामुळे कोणाच्या तरी चिथावणी वरून मुख्यमंत्र्यांच्या निवास स्थानी हनुमान चालीसा पठणाचा हट्ट धरायचा आणि शिवसेनेच्या रोषाला कारणीभूत व्हायचे हे बरोबर नाही. कारण उद्या जर शिवसैनिकांनी यांना फटकावले, तर भाजपवाले सोडवायला येणार नाहीत. याची तरी त्यांना अक्कल असायला हवी होती. त्यांच्या मतदार संघात येवढे प्रश्न असताना नको तो विषय घेऊन काहीतरी बालिशपणा करायचा हे आता पुरे झाले. कारण संपूर्ण महाराष्ट्र बघतोय या लोकांचे नाटक! आणि महाराष्ट्राला ही अशी नाटके नवी नाहीत. मोठ्या मुश्किलीने मिळालेली आमदारकी आणि खासदारकी टिकवून लोकांचे प्रश्न सोडवायचे सोडून कोणाच्या तरी सांगण्यावरून नको ते धाडस करायचे आणि नंतर पश्चात्ताप करायचा हे काही बरोबर नाही. हनुमंताने आता तरी याना मुंबईतून घरी आपल्या मुला-बाळांमध्ये जाण्याची बुधी द्यावी अन्यथा यांचे काही खरे नाही असेच दिसतेय.

# 'आधार कार्ड'च्या प्रक्रियेवर कॅगचे ताशेरे!

आधार कार्ड हा एक अतिशय महत्त्वाचा दस्तावेज आहे. युनिक आयडी क्रमांक असलेले आधार कार्ड देशातील सर्व नागरिकांना यूआयडिएआयद्वारे जारी केले जाते. यात बायोमेट्रिकसह तुमच्याशी संबंधित अनेक माहिती असते. यूआयडिएआय ही देशातील सर्व रहिवाशांना आधारकार्ड जारी करण्यासाठी २०१६ मध्ये स्थापन केलेलं प्राधिकरण आहे. ३१ ऑक्टोबर २०२१ पर्यंत १३१,६८ कोटी आधार क्रमांक जारी केले आहेत. आधार कार्डाशिवाय सरकारी योजना आणि बँकिंग सुविधांचा लाभ घेता येत नाही. यासोबतच आधार कार्डचा वापर ओळखपत्र म्हणूनही केला जात आहे. मात्र या आधारकार्ड संदर्भात सर्वसामान्य जनतेच्या मनात अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नांचा कानोसा घेत कॅगने ऑडिट रिपोर्टमध्ये प्रश्न उपस्थित केले आहेत. कॅगने यूआयडिएआयच्या वतीने आधार कार्ड बनवण्याच्या प्रक्रियेवर ताशेरे ओढले आहेत.

**डेटा स्टोरेज धोरण नाही**

कॅगने १०८ पानांच्या अहवालात म्हटले आहे की, अनेक प्रकरणात अनेक वर्षांनंतरही आधार कार्डधारकांचा डेटा त्यांच्या आधार क्रमांकाशी जुळला नाही. त्याचबरोबर नागरिकांच्या गोपनीयतेला धोका आणि डेटा संकलनासाठी यंत्रणेचा अभाव असे मुद्दे उपस्थित केले आहेत. कॅगने आपल्या अहवालात त्रुटींसाठी जबाबदार घटक शोधण्यासाठी यंत्रणा नसल्याबद्दलही टीका केली आहे. यूआयडिएआय कदाचित जगातील सर्वात मोठ्या बायोमेट्रिक डेटाबेसपैकी एक असेल, पण डेटा संग्रहित करण्यासाठी कोणतीही विशेष प्रणाली नसल्याचं आधोरेखित केलं. यूआयडिएआयने अपूर्ण माहिती आणि खराब दर्जाचे बायोमेट्रिक्स असलेले आधार क्रमांक जारी केले आहेत. यूआयडिएआय याची कोणतीही जबाबदारी घेत नाही आणि बायोमेट्रिक्स अपडेट करण्याची जबाबदारी नागरिकांच्या खांद्यावर टाकते, तसेच त्यासाठी शुल्क आकारते. आधार प्रणालीमध्ये योग्य कागदपत्रांचा अभाव असल्याचेही कॅगचे म्हणणे आहे. त्यामुळे एकाच व्यक्तीच्या नावाने डुप्लिकेट आधार कार्ड किंवा अनेक आधार कार्ड जारी केल्याची प्रकरणेही निदर्शनास आली आहेत. दुसरीकडे, नोव्हेंबर २०१९ पर्यंत ४.७५ लाख आधार रद्द करावे लागले कारण वेगवेगळ्या लोकांचे बायोमेट्रिक तपशील एकसारखे झाले होते.

**नागरिकांची गोपनीयता धोक्यात**

कॅगने असेही म्हटले आहे की, यूआयडिएआय ने हे देखील विचारात घेतले नाही की एजन्सी किंवा कंपन्यांद्वारे प्रमाणपत्रासाठी वापरले जाणारे अर्ज लोकांची वैयक्तिक माहिती संग्रहित करण्यास सक्षम आहे की नाही? जर नसेल तर लोकांच्या वैयक्तिक माहितीला मोठा धोका आहे.

**प्रत्येक आधार कार्डधारक भारताचा नागरिक आहे का?**

यूआयडिएआय अर्जदाराकडे कोणती कागदपत्रे नियमांद्वारे निर्दिष्ट केलेल्या वेळेसाठी भारतात वास्तव्यास आहे किंवा नाही याची पुष्टी करत नाही. त्याचबरोबर देशात राहणारे सर्व आधारधारक हे भारताचे रहिवासी आहेत याचीही खात्री नाही.

**अनेक आधारकार्ड लोकांकडे पोहोचलेच नाहीत**

यूआयडिएआयकडे पुरेशी टपाल व्यवस्था नसल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात आधार कार्ड प्राप्तकर्त्यापर्यंत पोहोचू शकले नाहीत आणि ते सरकारकडे परत गेले.

**कठोर नियमांची गरज**

बायोमेट्रिक सेवा देणाऱ्यांसाठी कठोर नियम बनवावेत, असे कॅगने सुचवले आहे. चुकांसाठी या एजन्सींवर दंडाची कडक तरतूद करण्याचीही गरज आहे. त्याचबरोबर यूआयडीएआयला त्यांच्या तंत्रज्ञानाचा आढावा घेण्याचेही सूचित करण्यात आले आहे. जेणेकरून लोकांना होणाऱ्या त्रासापासून वाचवता येईल.

**मुलांच्या आधार कार्डावर प्रश्न**

मुलांसाठी जारी करण्यात आलेल्या आधार कार्डबाबत कॅगने म्हटले आहे की, ही कार्डे पालकांच्या बायोमेट्रिक ओळखपत्रातून बनवली जातात. येथे नवीन काहीही घडत नाही. त्यामुळे, हा आधार कायद्याच्या तत्त्वाशी सुसंगत नाही. यूआयडिएआयने देखील बाल आधारसाठी ३१० कोटी रुपये अनावश्यक खर्च केले आहेत. यासोबतच २०२०-२१ साठी अतिरिक्त २८८ कोटी रुपयांची तरतूद आहे, ज्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. कॅगच्या म्हणण्यानुसार, यूआयडिएआयला पाच वर्षाखालील मुलांसाठी आधारसाठी दुसरा पर्याय पाहण्याची गरज आहे.

# साहित्यिकांनी नैतिक मुल्यांशी निष्ठा राखणारे लेखन करावे - भारत सासणे



समाजातील भ्रमवादी व विभाजनवादी प्रवृत्तीचा सामना करणारे व कोणत्याही अमीषाला बळी न पडता समाजाला मार्गदर्शन होईल व लोकांच्या नैतिक विचाराला चालना मिळेल असे नैतिक मानवी मुल्यांशी निष्ठा राखणारे लेखन मोठ्या प्रमाणात साहित्याकांनी करायला हवे असे प्रतिपादन ९५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक भारत सासणे यांनी आज येथे केले.अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन जेष्ठ साहित्यिक भारत ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली आजपासून २४ एप्रिल, २०२२ या कालावधीत भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर साहित्य नगरी, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी अध्यक्षीय समारोपाप्रसंगी ते बोलत होते. या साहित्य संमलनाचे उद्घाटन खासदार शरद पवार यांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर राज्याचे उद्योग तथा मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई, सार्वनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, वैद्यकीय व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री अमित देशमुख, पर्यवारण राज्यमंत्री संजय बनसोडे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ निलमताई गोऱ्हे, आमदार विक्रम काळे, आ.अमर राजूरकर, आ.बाबासाहेब पाटील, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते दामोदर मावजो, मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कौतिकराव ढाले-पाटील, जेष्ठ साहित्यिक जर्नादन वाघमारे,जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, मनपा आयुक्त अमन मित्तल यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.अलीकडच्या काळात मनोरंजनपर आणि बुद्धिरंजनपर साहित्याची मोठ्या प्रमाणावर निर्मिती होत असताना आजच्या मराठी साहित्यामधून सामान्य माणसाचा चेहरा हरवून गेला आहे. मराठी बालसाहित्यातून अद्भुतरस हद्दपार केला आहे. आजच्या मराठी साहित्याला सर्वसामान्य माणसाच्या जगण्याबाबत काहीएक करूणा वाटते काय, हा जुनाच प्रश्र्न आहे. या प्रश्नाला अजूनही नकारार्थी उत्तर द्यावे लागत आहे. सत्याचा आग्रह धरणे, सत्याचा उच्चार करणे हे जसे आज गरजेचे आहे त्याचप्रमाणे सत्य निर्भयपणे सांगितले गेले पाहिजे हीदेखील काळाची गरज असल्याची भावना भारत सासणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केली. यावेळी त्यांनी आपल्या भाषणात साहित्याचा मोठा आवाका, त्यापुढील आवाहने याबाबत आग्रही भूमिका मांडली.निझाम आणि रझाकारांच्या जुलमी राजवटीत मराठी अस्मिता टिकवून ठेवणारे उदगीर ह्या शहराचा तुम्हा-आम्हाला अभिमान आहे. ४० वे मराठवाडा साहित्य संमेलन देखील ह्याच नगरीत झाले होते. मराठवाडा हा मराठी भाषा, संस्कृती आणि साहित्याचा आधारवड आहे असे कौतिकराव ठाले पाटील अभिमानाने सांगतात असे सांगून मराठवाडा साहित्य परिषदेची स्थापना १९४३ साली झाली तरी त्यापुर्वी पासून मराठवाड्यात साहित्य चळवळ मराठवाडयात सुरू होती.


डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मराठी वाङ्मय विभाग सुरू झाल्यावर अनेक साहित्यिक घडले. ज्येष्ठ समिक्षक प्रा. वा.ल.कुलकर्णी, डॉ.यू.म.पठाण, अनंत भालेराव, डॉ. सुधीर रसाळ, डॉ.गो.मा.पवार, डॉ.गंगाधर पानतावणे , नरहर कुरूंदकर, फ.मु.शिंदे, डॉ श्रीपाल सबनीस, डॉ. जनार्दन वाघमारे, लक्ष्मीकांत तांबोळी, दासू वैद्य, कादंबरीकार नरेंद्र नाईक अशा अनेक नामवंत साहित्यिकांनी मराठवाड्यात वाङ्मयीन चळवळ पुढे नेली असल्याचे खा. शरद पवार यांनी सांगितले. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अशोक चव्हाण म्हणाले की, मराठी भाषेचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. मराठी भाषेला जागृत करुन पुढे घेवून जाण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. १७ सप्टेंबर २०२२ मुक्तीसंग्राम अमृत महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. मराठवाड्याला अतिशय एकोप्याने साहित्य, संस्कृती, धोरण,निर्णय याबाबत एकत्र येवून काम करण्याचे आवाहन केले. राज्याचे उद्योग तथा मराठी भाषा विभाग मंत्री सुभाष देसाई म्हणाले की, साहित्य हे एक असं अंग आहे की, त्यापासून आपण वेगळे होवू शकत नाही. आपला मानबिंदू घेवून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुढे घेवून जात आहे. मराठी भाषा ही देशात दुसऱ्या, जगातील दहाव्या क्रमांकावर बोलली जाणारी भाषा असून देशातील १२ कोटी लोकं मराठी भाषा बोलणारे आहेत, तर ३ कोटी भारतीय विविध परदेशात मराठी भाषा बोलणारे नागरिक आहेत. गोवा, गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यात मराठी भाषा बोलली जाते. त्यामुळे राज्या बाहेरही साहित्य संमेलन भरवावेत असे आवाहन अखिल भारतीय मराठी महामंडळाला केले. राज्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे हे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्न करीत आहेत. पुस्तकांचं गांव ही संकल्पना येत्या काळात सर्व राज्यात राबविली जाणार आहे.जिल्ह्यातील गावांनी पुस्तकाचं गाव या संकल्पनेसाठी पुढाकार घ्यावा. राज्यातील कोण्यात्याही शाळेला मराठी भाषेला डावलता येणार नाही, त्यासाठी कायदा लागू करण्यात आलेला आहे. तसेच मनपा, नगर परिषदा, प्राधिकरणात मराठी भाषेचा वापर झाला पाहीजे. कोणताही नियम कायदा हा लोकसहभागातून व्हावा लागतो. मराठी भाषा ही परावलंबी नाही हेही त्यांनी सांगितले. मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचं काम प्रगतीपथावर आहे.

मराठी भाषा ही ध्यास व श्र्वास आहे. मराठी भाषा अधिक सुलभ होणार आहे. प्रत्येक जिल्हयात मराठी भाषा भवन बांधण्याचा निर्णय लवकरच घेण्यात येणार असल्याचेही मराठी भाषा विभाग मंत्री सुभाष देसाई यांनी सांगितले. साहित्य संमेलनात जे विचार मांडले जातात त्याची शासन पातळीवर दखल घेतली जाते असे सांगून साहित्य चळवळ अधिक प्रमाणात रुजवण्याची गरज विशद करून ग्रंथ चळवळीला आणखी भरीव पाठबळ देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन राज्याचे वैद्यकीय शिक्षण तथा सांस्कृतिक कार्यमंत्री अमित देशमुख यांनी केले. राज्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे हे मराठी भाषेबाबत आग्रही असून मराठी भाषेच्या संवर्धनासाठी त्यांचे प्रयत्न आहेत.मुंबई येथे मोठ्या दिमाखाने मराठी भाषा भवन उभं राहत आहे, त्यातून मराठीला अधिक अनुकूल दिवस येणार असल्याची भावना अमित देशमुख यांनी यावेळी बोलून दाखविली. ज्ञानपीठ विजेते दामोदर मावजो म्हणाले की, गोवा-महाराष्ट्र यांचं नांत खुप जूनं आहे. महाराष्ट्राला संताची भूमी म्हणून गौरवशाली परंपरा लाभली आहे. भारतीय साहित्यात मराठी भाषा दालनात वैभव आहे.माणसांनी विविध भाषेचे ज्ञान घेतल्याने माणूस प्रगल्भ बनत असतो. त्यामुळे आपल्या बोलीभाषेत लिखाण करणे व बोली भाषेवर प्रेम करणं नैसर्गिकच आहे अशी भावना त्यांनी व्यक्त केली. माजी केंद्रीय मंत्री शिवराज पाटील म्हणाले की, साहित्य येत्या काळात डिजीटल स्वरुपात आपल्यापर्यंत निर्माण करुन साहित्य अजरामर राहणार आहे. इतर भाषेतील ग्रंथही मराठी भाषेत भाषांतर करुन आपल्या पर्यंत पोहचल्यातर मराठी भाषा प्रगल्भ होणार असल्याचे मत माझी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांनी व्यक्त केले. ५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी साहित्य संमेलन ज्या उदगीर शहरात भरले त्याची ऐतिहासिक, सांस्कृतिक महती सांगून प्राचीन काळापासून या नगरीने सामाजिक ऐक्याचा व बंधुभावाचा आदर्श घालून दिला त्यामुळे या नगरीत होणारे साहित्य संमेलन ऐतिहासिक होत असल्याची भावनां त्यांनी व्यक्त केली. संजय बनसोडे यांनी साहित्य संमेलनात आलेल्या सर्व साहित्यिकांचे स्वागत करून तीन दिवस साहित्यिक मेजवानीचा आनंद घेण्याचे आवाहन केले. साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर यांनी साहित्य संमेलन घेण्यामागची भूमिका सांगून अखिल भारतीय साहित्य महामंडळाने हे साहित्य संमेलन मध्ये घेण्याची संधी दिल्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# महिला सक्षमीकरणामध्ये लातूर महापालिकेची उत्तुंग भरारी -महापौर विक्रांत गोजमगुंडे

**लातूर/प्रतिनिधी**

पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील नागरिकांना शासनाच्या योजने अंतर्गत विविध घटकांतर्गत लाभ देण्यात आलेला आहे. दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानच्या माध्यमातून महिला बचत गट, वस्ती स्तर संघ. शहर स्तर संघ. वैयक्तिक कर्ज, समूह कर्ज , बचत गटांना कर्ज, नागरी बेघर निवारा, फेरीवाले यांना सहाय करण्यात येत आहे. लातूर शहरामधील विविध भागातील महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी निर्माण होण्याच्या दृष्टीने व महिलांना केंद्रबिंदू मानून लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मोठ्या प्रमाणात कर्ज वितरीत करण्यात आले आहे, अशी माहिती महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी दिली. या अभियानाच्या माध्यमातून लातूर शहरात किमान १० महिलांचा एक बचत गट असे एकूण १११० महिलांचे बचत गट तयार करण्यात आलेले असून त्यात सुमारे १२५०० महिला सहभागी आहेत. बचत गटाची स्थापना झालेपासून ३ महिने पूर्ण झालेल्या बचत गटांना १००००/- रु प्रती गट बिनव्याजी फिरता निधी दिला जातो यात मनपाने जवळपास एकूण ८०० बचत गटांना रुपये ८०.०० लक्ष फिरता निधी वितरीत केलेला आहे. किमान १० बचत गट मिळून वस्ती स्तर संघाची स्थापना केली जाते लातूर शहरामध्ये असे एकूण ४६ वस्ती स्तर संघ तयार करण्यात आलेले आहेत व




शहरामधील स्थापन केलेल्या सर्व वस्ती स्तर संघाचे मिळून दोन शहर स्तर संघ तयार करण्यात आलेले आहेत या वस्ती स्तर संघ व शहर स्तर संघ यांची नोंदणी मा. धर्मादाय आयुक्त कार्यालय येथे केले जाते. स्थापित झालेल्या वस्ती स्तर संघाना किमान सहा महिने पूर्ण झाल्यानंतर रु ५००००/- प्रती वस्ती स्तर संघ बिनव्याजी फिरता निधी दिला जातो यात मनपाने एकूण ४२ वस्ती स्तर संघांना रुपये २१.०० लक्ष फिरता निधी वितरीत केलेला आहे. वैयक्तिक कर्ज घटकामध्ये जवळपास ७०२ लाभार्थ्यांना बँकेकडून वार्षिक ७% व्याज दराने एकूण रु. ७ कोटी १५ लक्ष ५१ हजार कर्ज मिळवून दिलेले आहे. पण प्रामुख्याने ४० नागरिकांना ऑटो रिक्षा मिळवून देऊन त्यांना रोजगार मिळाला असून हे विशेष नोंद घेण्याजोगे आहे. तर सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये २८१ महिला बचत गटांना सहा कोटी त्रेसष्ट लक्ष कर्ज वाटप करण्यात आलेले आहे. या कर्ज वाटपामध्ये लातूर महानगरपालिका ही राज्यातील महानगरपालिकामध्ये प्रथम क्रमांकावर आहे. त्याचप्रमाणे शहरातील २९०० फेरीवाले यांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून त्यापैकी १७०० फेरीवाले यांना स्मार्ट ओळखपत्र व व्यावसायिक प्रमाणपत्र देणारी राज्यातील पहिली महानगरपालिका आहे. तसेच पी एम स्वानिधी योजने अंतर्गत २८८१ फेरीवाले यांना प्रति फेरीवाले यांना रु.१००००/- एकूण रुपये दोन कोटी ८८ लक्ष कर्ज वाटप करण्यात आलेले आहे.

या कर्ज वाटपामध्ये लातूर महानगरपालिका ही राज्यातील महानगरपालिकामध्ये ३ रा क्रमांक आहे. त्याचप्रमाणे शहरातील जे बेघर जसे की, बसस्थानक, रेल्वे स्टेशन, मंदिरे, उंच इमारत, पूल, रस्त्याच्या कडेला आसरा घेऊन राहणारे अशा अनाथ , अपंग, वृद्ध महिला, पुरुष व बालके यांचेसाठी १०० व्यक्ती राहतील अशा नागरी बेघर निवाऱ्याचा बांधकाम प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. सदर अभियानाचा लाभ शहरातील दारिद्र्य रेषेखालील गरीब नागरिकांना योग्य रीतीने व्हावा यासाठी पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मनपाचे सर्व पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत असे महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी सांगितले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

25 APRIL TO 01 MAY 2022 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 24/04/2022 4:39 PM Page 1



# ९५व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा थाटात

**उदगीर/शकिल मनियार**

आजकाल ठराविक विचारधारेला पोषक साहित्यनिर्मितीवर काही घटक भर देत आहेत. यातून देशात एका विशिष्ट विचारधारेचा प्रोपगंडा केला जात आहे. ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. मुळातच प्रचार साहित्य निर्मिती ही निरंकुशतेला निमंत्रण देते आणि अराजकता ओढवते. यासाठी साहित्यिक आणि साहित्य रसिकांनी डोळ्यात तेल घालून जागृत राहावे, असे आवाहन माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी केले. येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या प्रांगणात ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन शरद पवार यांच्या हस्ते शुक्रवार २२ एप्रिल रोजी झाले, त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे, ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त दामोदर मावजो, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, संमेलनाचे कार्याध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, पालकमंत्री अमित विलासराव देशमुख, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, उद्योगमंत्री सुभाष देसाई, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा राज्यमंत्री संजय बनसोडे, प्रमुख कार्यवाह रामचंद्र तिरुके, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष कौतिकराव ठाले-पाटील, श्रीमती उषा तांबे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी, मनोहरराव म्हैसाळकर




आदी उपस्थित होते. साहित्यिकांनी कोणत्याही विचारधारेला बांधील नसावे. कारण अशा बांधिलकीतून मतप्रणाली तयार होते. ती बुद्धीभेद करणारी, ध्रुवीकरण करणारी, विषारी स्वरूपाची आणि राष्ट्रहिताला बाधा आणणारी असू शकते. समान अंतरावर राहून त्याकडे त्रयस्थप्रमाणे पाहावयास हवे. राज्यकर्ते मतप्रचार थेट करीत नाहीत. त्यांनी साहित्य अथवा माध्यमाची कमकुवत अंगे न्याहाळली आहेत. प्रसारमाध्यमांच्या बाबतीत त्यांनी अत्यंत हुशारीने कॉर्पोरेट जगाची मदत घेऊन मतप्रचार राबविणे सुरू केले आहे. कवितांची पुस्तके आज कमी होत चालली आहेत, अशी खंत पवार यांनी यावेळी व्यक्त केली. काव्यसंग्रह निर्मिती प्रकाशनाच्या अर्थकारणाचे गणित जुळत नसल्याने हे घडत असावे, असे मला वाटते. नव तंत्रज्ञान आणि बदललेल्या सवयी, परभाषेचे आक्रमण, मनोरंजनाच्या साधनाची रेलचेल, मराठी शिक्षणाकडे कमी होत चाललेला ओढा यामुळे ग्रंथ प्रकाशन संस्थांची आर्थिक परिस्थितीही खालावत चालली आहे, हे चित्र बदलणे गरजेचे असल्याचे शरद पवार यांनी सांगितले. यावेळी त्यांनी आपल्या स्वर्गीय आवाजाने संपूर्ण जगाला मंत्रमुग्ध करणाऱ्या, संगीत विश्वात अजरामर झालेल्या स्वरसम्राज्ञी लतादीदींचे नाव संमेलननगरीस दिले याबद्दल मी संयोजकांचे आभार मानतो. लतादीदींनी आपल्या अमृतमय कंठाद्वारे कोट्यवधी रसिकांना मंत्रमुग्ध केले. साहित्यविश्वाने याच ऋणानुबंधातून लतादीदींना दिलेली ही एक सार्थ आदरांजली आहे असे मी मानतो, असेही ते म्हणाले.

**पाच वर्षात एकदा तरी महिला अध्यक्षा व्हाव्यात**

साहित्यविश्वातही राजकारणाचा शिरकाव झाला आहे. याचा अत्याधिक तोटा महिला साहित्यिकांना संभवतो. महामंडळाने निवडणूक पद्धतीत एखादे महिला समावेशक धोरण आणले तर त्याचे मी प्रथम स्वागत करेन. महामंडळाच्या घटनेत सुधारणा करून संमेलनाच्या अध्यक्षपदी दर पाच वर्षातून किमान एकदा तरी महिलाध्यक्ष नियुक्त व्हाव्यात, अशी तरतूद असावी, असे पवार म्हणाले.

**संशोधनात्मक लेखनाची वानवा**

साहित्यात संशोधनात्मक लिखाणाची वानवा आज जाणवते. संशोधनात्मक लिहिले जात असेल. परंतु ते वाचकांपर्यंत पोहोचत नसावे. विशेषत: ऐतिहासिक लिखाणात सखोल संशोधन व अभ्यास आवश्यक असतो. इतिहासकाराने सबळ पुराव्याधारे न लिहिता ऐकीव व तार्कीक माहिती आधारे लिहिणे हा मोठा प्रमाद आहे. तो दीर्घकालीन वाद-विवादांना जन्म देतो. असे लेखन वेळीच रोखले पाहिजे.

**संशोधनाचा विषय संशोधनक्षम द्यावा**

विद्यापीठांनी मराठीत पीएच डी साठी विषय देताना तो संशोधनक्षम द्यावा, केवळ संकलनक्षम देऊ नये. सखोल संशोधनानंतर झालेले साहित्य माहितीचे नवे भांडार ठरू शकते, अशी अपेक्षा पवार यांनी व्यक्त केली.

**सत्तेचा माज चढला की, निर्बंध लादले जातात**

सत्तेचा माज चढला की निर्बंध लादले जातात. अशावेळी साहित्यिक गप्प का बसतात, असा सवाल उपस्थित करतानाच आज साहित्यिकांमध्येही चिअर लीडर्स तयार झाले आहेत. ते सत्ताधाऱ्यांच्या प्रत्येक कृतीला गुमान प्रोत्साहन देतात. यातून एकाधिकारशाही बळकट करताना फॅसिझमला खतपाणी मिळते, अशी खंत ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कादंबरीकार दामोदर मावजो यांनी यावेळी बोलून दाखवली. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दा उपस्थित करत पुस्तकावरील बंदी रास्त होती का, काश्मीर फाईल्स चित्रपटात एकतर्फी चित्रण दाखवले, अर्धसत्य आहे असे काहींचे म्हणणे आहे, असे सांगतानाच त्यांनी साहित्य प्रफुल्लित ठेवायचे असेल तर अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेवले पाहिजे, असे म्हटले.

## थोडक्यात वृत्तांत

### ३० एप्रिल रोजी लातुरात टॅलेंट लातूर स्पर्धेचे आयोजन

लातूर : लातूर शहरासह जिल्ह्यातील कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे या उद्देशाने भीम फेस्टिव्हल अंतर्गत फ्री व्हॉईस ग्रुप लातूरच्या वतीने ३० रोजी भव्य अशी लातूर टॅलेंट स्पर्धा आयोजित करण्यात आली असून यामध्ये गीत गायन, नृत्य, वक्तृत्व, जादुगरी, मिमिक्री, कॉमेडी असे विविध कला प्रकार स्पर्धकास सादरीकरण करण्याची संधी दिली जाणार आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून लातूर येथील फ्री व्हॉईस ग्रुपच्या वतीने लातुरात भीम फेस्टिव्हलच्या माध्यमातून मॅरेथॉन स्पर्धा, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, रमजान निमित्त मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टी असे विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले, या फेस्टिव्हल चाच भाग म्हणून येत्या शनिवार ३० रोजी शहरातील दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहात लातूर टॅलेंट ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. लातूर शहरासह जिल्ह्यातील कलाकारांना व्यासपीठ मिळवून देणे हा उद्देश असून सर्धेत गीत गायन, नृत्य, चित्रकला, रांगोळी, निबंध स्पर्धा घेण्यात येणार आहेत तर यावेळी स्पर्धक मिमिक्री, स्टँडिंग कॉमेडी हे कला प्रकार सादर करू शकतात, यामध्ये सर्वसामान्य आणि बालगट असे दोन गट तयार करण्यात आले असून प्रथम येणाऱ्या स्पर्धकास अनुक्रमे ७ व ५ हजार तर द्वितीय ५ व ३ आणि तृतीय क्रमांक मिळविणाऱ्यास ३ व २ हजार रुपये रोख मानचिन्ह, प्रमाणपत्र असे बक्षिसे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत,तर रांगोळी, चित्रकला, निबंध स्पर्धेतील विजेत्यांना प्रत्येकी एक हजार रुपये असे बक्षीस दिले जाईल, स्पर्धेत प्रवेशासाठी माफक फिस आकारणी केली जाणार आहे, स्पर्धेस पात्र ठरण्या अगोदर २८ रोजी ऑडिशन व ३० रोजी सकाळी१० वाजता शहरातील दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहात प्रत्यक्ष स्पर्धा सुरू होणार आहेत. लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### विनायकराव पाटील यांच्या हस्ते राम जन्मोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार

अहमदपूर : प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी रामनवमी च्या निमित्ताने अहमदपूर शहरात रामजन्मोउत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. सदरील राम जन्मोत्सव समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार रायगड मित्र परिवाराच्या पुढाकाराने भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला. सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमा बरोबर जातीय सलोखा राखत हजारो रामभक्ताच्यां उपस्थितीत अहमदपूर शहरातील मुख्य रस्त्यावरून भव्य दिव्य विराट अशी श्रीरामाच्या प्रतिमेची शोभा यात्रा काढण्यात आली होती. अहमदपूर शहरात सदरील रामजन्मोत्सव भुतोन भविष्यती असा साजरा केल्या बद्दल संयोजन समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार येथील संत चुडामणी मंदिरात माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या हस्ते करून रामभक्त तरुणांनाचा उत्साहा वाढविण्याचे काम रायगड मित्र परिवाराच्या पुढाकाराने करण्यात आला. यावेळी सेवा निवृत्त मुख्याध्यापक देवेंद्र देवणिकर, जुगलकिशोर शर्मा, श्रीकांत भूतडा, नरहरि शिंदे, भरत शिरूरकर, अशोक हालसे, नरहरी माळी, बापूराव शिरूरकर, गोविंदराव गिरी, डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी, मकरंद जोशी, जयभाऊ भूतड़ा,राजू कंधारकर, विनोद भूतडा, अँड.किशोर कोरे, गणेश हालसे, यशवंत देशमुख, अँड. निखिल कासनाळे, कमलाकर सांगविकर, पप्पू सांगविकर, सूरज भूतड़ा, हरीश नाईकवाडे, प्रमोद शिंदे,बाळासाहेब गंगापुरे, सुदर्शन हालसे, सुभाष हालसे, दीपक हालसे यांच्या सह रायगड मित्र परिवार सदस्य व रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राजमाता जिजामाता विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी मोफत फाऊंडेशन कोर्स

लातूर : सुतमिल रोडवरील शिवनगरात असलेल्या राजमाता जिजामाता विद्यालयात इयत्ता ८ वी, ९ वी व १० वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांची पूर्व तयारी व्हावी यासाठी 'कोटा पॅटर्न'च्या धर्तीवर मोफत 'नीट', 'आयआयटी' व 'जेईई' फाऊंडेशन कोर्सची सुरुवात करण्यात आली असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे प्रमुख प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केले आहे. राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात नेहमीच विद्यार्थ्यांसाठी विविध विधायक व लाभदायक उपक्रम राबविले जातात. याचाच एक भाग म्हणून आता इयत्ता ८वी, ९वी व १० वीच्या विद्यार्थ्यांची मेडिकल व इंजिनिअरिंगची पूर्व तयारी करण्यासाठी 'कोटा पॅटर्न'च्या धर्तीवर मोफत 'नीट', 'आयआयटी' व 'जेईई' फाऊंडेशन कोर्सची सुरुवात करण्यात आली आहे. दररोज सकाळी ७.३० ते १२.३० या वेळेत हे वर्ग सुरु आहेत. आठवड्यातील तीन दिवस स्टेट बोर्ड आणि तीन दिवस सी.बी.एस.सी. आणि एन. सी. ई. आर.टी. विज्ञान व गणित विषयाचा अभ्यासक्रम शिकविला जाणार आहे तर दर रविवारी परीक्षा घेतली जाणार आहे. यासाठी राजीव मुंढे, पांडुरंग कुलकर्णी, शोभा कांबळे, सुनीता जवळे आदी तज्ज्ञ शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. अशा प्रकारचा जिल्ह्यातील या शाळेचा हा पहिलाच उपक्रम असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केले आहे.

# वाडा आगारातील बस सेवा पूर्ववत सुरु




**वाडा/प्रतिनिधी**

एस.टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी मागील पाच महिने संप पुकारला होता. त्या संपला पूर्णविराम लागला असून वाडा आगाराच्या २३४ पैकी १७६ कर्मचारी कामावर हजर झाल्याने २८ बस नागरिकांच्या सेवेत रुजू झाल्या आहेत. वाडा आगाराच्या स्वारगेट, पुणे, पंढरपूर, ठाणे, कल्याण, पालघर अशा लांब पल्ल्याच्या बस सुरू केल्या आहेत. एस.टी. ची सेवा पूर्ववत सुरू झाल्याने नागरिक व विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. संपादरम्यान इंधनदारवाढ झाल्याने खाजगी वाहतूक दारांनीही भाडे वाढ केल्याने सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले होते .वेळप्रसंगी दहा ते पंधरा किलोमीटरचा प्रवास अनेकांनी पायी चालत पार केल्याचेही निदर्शनास आले होते. मात्र आता एस.टी. सेवा पूर्ववत सुरू झाल्याने ग्रामीण भागातील नागरिक व विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. ग्रामीणच्या ७ बस चालू आहेत. तर लवकरच ग्रामीण भागातील फेऱ्या सुद्धा वाढवणार असून विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्याचा प्रयत्न असल्याची माहिती वाडा आगाराचे व्यवस्थापक मधुकर धांगडा यांनी दिली.

# शांतीनगर पोलिसांनी वाहन चोरीसह घरफोडीच्या ११ गुन्ह्याची उकल

**१२ लाखांचा मुद्देमालासह ३ बोलेरो टेम्पो, ४ दुचाकी जप्त**

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरात वाढत्या वाहन चोरीच्या व घरफोडीच्या घटनांनी नागरीक त्रस्त होते. तर गुन्हेगारांचा शोध लागत नसल्याने पोलीस हतबल होते. असे असताना शांतीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांच्या नेतृत्वा खालील विविध पोलीस पथकांनी गुप्त बतमीदारांच्या माध्यमातून माग काढत एकूण ८ आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. त्यांनी केलेल्या ११ गुन्ह्याची उकल करीत तब्बल १२ लाख ८८ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळविले आहे .या मध्ये ३ बोलेरो टेम्पो, ४ दुचाकी, कपड्याचे तागे, घड्याळ असा मुद्देमाल आढळून आला आहे अशी माहिती पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांनी दिली आहे. शांतीनगर पोलिसांनी विविध गुन्ह्याचा तपास करताना पो उपनिरीक्षक रवींद्र पाटील यांना मिळालेल्या माहिती नुसार चव्हाण कॉलनी येथून बिलाल अहमद सलीम अन्सारी यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने शांतीनगर व



कोनगाव येथून चोरी केलेल्या प्रत्येकी दोन अशा चार दुचाकी चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिली आहे. आरोपीच्या ताब्यातुन १ लाख ३० हजार किमतीच्या ४ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. तर घरफोडीच्या गुन्ह्यात अशफाक अली अन्सारी व परवेज मोहम्मद शहा या दोघा जणांना ताब्यात घेत त्यांच्या जवळून ५४ हजार २५० रुपयांची घड्याळे जप्त केली. तर घरफोडीच्या दुसऱ्या गुन्ह्यात खालिद अब्दुल खान, फैयाज शेख, पिंटूकुमार केशरवाणी अशा तिघांच्या मुसक्या आवळून कापडाचे तागे, धाग्याचे कोम चोरीतील तब्बल ६ लाख ४८ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. दुसऱ्या एका वाहन चोरीच्या गुन्ह्यात शहानवाज हुसेन, आरिफ नूर शेख धुळे यांच्या ताब्यातून ४ लाख ५५ हजार रुपये किमतीचे ३ बोलेरो टेम्पो जप्त करण्यात यश मिळविले आहे. या सर्व ११ गुन्ह्यात घड्याळ, कापडाचे तागे, दुचाकी व बोलेरो टेम्पो असा एकूण १२ लाख ८८ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळविले आहे.

# सोलापूर जिल्ह्यामध्ये खताचा साठा केल्यास दुकानदारांवर कारवाई करण्याचे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांचे निर्देश

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांना खरीप हंगामामध्ये कोणत्याही खताची कमतरता भासणार नाही, याची दक्षता संबंधितांनी घ्यावी. खत दुकानदार किंवा वितरकांनी शेतकऱ्यांना नियमित खते उपलब्ध करून द्यावीत. डीएपी आणि युरिया खताचा साठा केल्याचे आढळल्यास दुकानदारांवर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा संनियंत्रण समितीच्या बैठकीत मिलिंद शंभरकर बोलत होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे, कृषी विकास अधिकारी विवेक कुंभार यांच्यासह विविध खत कंपनी, बियाणे उत्पादक कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी शंभरकर यांनी सांगितले की, जिल्ह्यात खरीप पिकाचे क्षेत्र वाढत आहे. यामुळे बी-बियाणे आणि खतांची मागणी वाढत आहे. शेतकऱ्यांना मागणीप्रमाणे खते आणि बियाणे उपलब्ध करून देणे हे आपले कर्तव्य आहे. शासनाच्या दराप्रमाणे ई-पॉश मशिनवर खताची विक्री करावी. कंपन्यांनी खताचा साठा किती, कधी येणार, याची आगावू माहिती कृषी विभागाला देणे बंधनकारक आहे. खते-बियाणे



कंपन्यांनी कृषी विभागाशी समन्वय ठेवून आपला खतांचा साठा इतर राज्यात, जिल्ह्यात जाणार नाही, याबाबत खबरदारी घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. येणाऱ्या खरीप हंगामासाठी युरिया कमी पडणार नाही, याची दक्षता आतापासूनच घ्या. पावसाळ्यापूर्वी आगावू मागणी नोंदवून खते कमी पडणार नाहीत, याचे नियोजन करा. वितरण व्यवस्था सुधारा, खतांच्या पुरवठा, दर्जा आणि किंमतीवरही लक्ष ठेवण्याच्या सूचना त्यांनी केल्या. सोयाबीन, सूर्यफूल बियाणांची मागणी वाढणार असल्याने याचेही नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे यांनी सांगितले की, रब्बीबरोबर खरिपाचे क्षेत्रही वाढले असल्याने खते आणि बियाणे मोठ्या प्रमाणात लागणार आहेत. शेतकऱ्यांना बायो फर्टिलायझर, नॅनो युरिया याबाबत माहिती द्यायला हवी. कोणत्यावेळी कसे खत द्यावे, जमिनीतून द्यावे की स्प्रेद्वारे द्यावे, याची माहिती शेतकऱ्यांना होण्यासाठी मेळावे घेण्यात येणार आहेत. यंदा २१ एप्रिल २०२२ अखेर खरीप हंगामासाठी २ लाख ९१ हजार ९०० मेट्रीक टन खतांची मागणी केली होती. २ लाख ३३ हजार २७० मेट्रीक टन मंजूर झाले होते. ६१ हजार ८२३ मेट्रीक टन साठा शिल्लक असल्याची माहिती कृषी विकास अधिकारी विवेक कुंभार यांनी दिली. शिवाय खते-बियाणांची तपासणी करण्यासाठी तालुकानिहाय आणि जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# वाड्यात ओबीसी संघर्ष समितीची बैठक संपन्न




**वाडा/प्रतिनिधी**

ओबीसी समाजाच्या हक्काच्या मागण्यांसाठी २९ मार्च रोजी पालघर येथे जिल्हास्तरीय महामोर्चाचे आयोजन केले आहे. त्या अनुषंगाने वाड्यातील पेटारे हॉल येथे गुरुवारी (दि. २१) बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी पालघर जिल्हा ओबीसी संघर्ष समितीचे पालघर जिल्हा अध्यक्ष राजीव (नाना) पाटील यांनी ओबीसी समाज बांधवांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी कुणबीसेना प्रमुख विश्वनाथ पाटील, महिला आर्थिक विकास मंडळाच्या अध्यक्षा ज्योती ठाकरे, वाडा तालुका संघर्ष समिती अध्यक्ष संदीप पवार, पत्रकार शरद पाटील, भाजपचे तालुका अध्यक्ष मंगेश पाटील, वाडा तालुका ओबीसी सुकाणू समिती अध्यक्ष गोविंद पाटील, पालघर जिल्हा ओबीसी संघर्ष समिती, कार्याध्यक्ष भालचंद्र ठाकरे, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, माजी आमदार रुपेश म्हात्रे आदी मान्यवरांनी उपस्थितांना संबोधित करत २९ तारखेच्या मोर्च्यात लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

# जात प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेबाबत जनजागृती ऑनलाईन वेबिनारचे आयोजन

**पालघर/प्रतिनिधी**

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागावर्ग व विशेष मागाप्रवर्ग या जातीच्या विद्यार्थाना इयत्ता ११ व १२ वी विज्ञान शाखेत शिकत असलेल्या सर्व विद्यार्थाचे जात प्रमाणपत्र वैधता तपासणी करिता संबंधीत शैक्षणीक संस्था कडे अर्ज करण्याची अंतिम मुदत दिनांक ३० नोव्हेंबर पर्यत निश्चित करण्यात आलेली आहे. त्याकरिता विद्यार्थानी Web Site - https://bartievalidity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) ऑनलाईन अर्ज केल्या नंतर १ महिन्यांच्या आत शैक्षणिक संस्था मार्फत ऑफलाईन (Hard Copy) अर्ज १ जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, कार्यालय पालघर कडे सादर करणे आवश्यक आहे. याकरिता प्रत्येक शैक्षणिक संस्थेने नोडल ऑफिसरची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्या नोडल ऑफिसरने विद्यार्थाना मार्गदर्शन करुन त्यांचे ऑफलाईन (Offline) अर्ज समिती कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयाचे नोडल ऑफिसर यांनी अर्ज जमा न करता विद्यार्थाना जात-पडताळणी कार्यालयास अर्ज जमा करण्याकरिता विद्यार्थाना पाठविले जात आहे, असे निदर्शनास आले आहे. या पुढे शैक्षणिक संस्थानीच विद्यार्थाचे जात पडताळणी अर्ज समितीकडे सादर करणे आवश्यक राहील. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पालघर द्वारे सदर प्रकियेची सर्वसामान्य नागरीकांना, अर्जदार, महाविद्यालयातील प्राचार्य व महाविद्यालयाचे नोडल अधिकारी यांना माहिती व्हावी या दृष्टीकोनातून दिनांक २६ एप्रिल रोजी दुपारी ०३:०० वाजता वेबिनारचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर वेबिनारमध्ये सहभाग घेण्यास इच्छूक असलेल्या सर्व नागरिकांनी Google Meet द्वारे http://meet.google.com/dhr-zctd-vgq या लिंक वर वेबिनारमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन सुनिता मते, सदस्य सचिव, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पालघर यांनी केले आहे.

# सोलापूर शहर पोलीस आयुक्त हरीश बैजल यांनी घेतले समर्थांचे दर्शन

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूरचे शहर पोलीस आयुक्त हरिष बैजल यांनी नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी त्यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला.

यावेळी त्यांनी येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात श्री स्वामी समर्थांच्या १४४व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त आयोजित धर्मसंकीर्तन महोत्सवातील सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या प्रवचन सेवेचाही लाभ घेतला. त्यांच्या समवेत ज्येष्ठ विधिज्ञ धनंजय माने, अक्कलकोटचे डीवायएसपी राजेंद्रसिंग गौर, अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी आदींसह मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल



गवंडी, शिवशरण अचलेर, व्यंकटेश पुजारी, गिरीश पवार, विपुल जाधव, रवी मलवे, मनोज जाधव, सागर गोंडाळ आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.

25 APRIL TO 01 MAY 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 24/04/2022 4:39 PM Page 1



पान १ वरून...

## देवा-धर्माच्या नावाने राजकारणी भले...

दंगली भडकतील आणि भाजपला तेच हवे आहे. पण या दंगलीत सामान्य माणूस भरडला जाणार, मारला जाणार त्याचे काय? राहता राहिला सवाल राणा दांपत्याचा तर त्यांचे शुक्रवारपासून जे नाटक सुरु आहे त्याचा संपूर्ण महाराष्ट्राने धिक्कार केलाय. रवी राणा म्हणतो महाराष्ट्रावर शनी आहे. उद्धव ठाकरे सत्तेवर आल्यापासून शेतकऱ्यांची हालत खराब झालीय. महाराष्ट्रावर संकटे येत आहेत म्हणून मातोश्रीवर जाऊन आम्हाला हनुमान चालीसा म्हणायचा आहे. आता काय म्हणावे या मूर्ख माणसाला. हनुमान चालीसा वाचून जर महाराष्ट्रावरची संकटे दूर झाली असती तर रामभक्त भाजपवाले अजून पर्यंत का गप्प बसले? महाराष्ट्रावरची संकटे दूर करण्यासठी त्यांनी का नाही हनुमान चालीसा वाचला आणि हनुमान चालीसा वाचायचंच आहे तर अमरावती मधली मारुती मंदिरे ओस पडली आहेत का? तिथे जाऊन वाचना! शेवटी हनुमान एकच आहे. अमरावतीत वेगळा आणि मातोश्रीवर वेगळा आहे का? हनुमंताच्या नावाने महाराष्ट्रात येवून दंगली घडवण्याचे कारस्थान करायचे आणि इथली शांतता बिघडवायची हे कदापि चालणार नाही. कारण या महाराष्ट्रात जाती धर्माच्या पलीकडे पाहणारे लोकही आहेत आणि ते जर चिडले तर सुपारीबाजांचे काय होईल याची ते कल्पनाही करू शकणार नाहीत. नवनीत राणाला हा साऊथ इंडियन सिनेमा वाटला कि काय? तिथल्या सिनेमात मांड्या दाखवून काय मिळाले नाही म्हणून इथे सती सावित्रीचा आव आणून मी किती हिंदुत्ववादी आहे ते दाखवण्याचा प्रयत्न करतेय, पण तो कदापि यशस्वी होणार नाही. आणि महाराष्ट्रात हिंदुत्वाच्या मुद्यावर हिंदुची माथी भडकवून दंगली घडविण्याचा आणि त्या दंगलींचे भांडवल करून महा विकास आघाडीचे सरकार पाडण्याचा प्रयत्न कदापि यशस्वी होणार नाही.

## जावयाचा संसार मोडला...

कुडले याला ताब्यात घेतले. त्याला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुडले हा उतरकर यांचा जावई आहे. २०१९ पासून कुडले आणि त्याच्या पत्नीमध्ये कौटुंबिक कारणातून वाद सुरू होते. तेव्हापासून पती-पत्नी वेगळे राहत आहेत. कुडले त्याच्या आईसोबत, तर त्याची पत्नी वडिलांकडे राहते. दोघांना एक मुलगा आणि एक मुलगी अशी दोन मुले आहेत. तर उत्तरकर यांची दोन दुकाने असून त्यांनी दोन्ही दुकाने भाड्याने दिली आहेत. तर कुडले हा वडापावची गाडी चालवतो. दरम्यान, त्यांच्यातील कौटुंबिक वाद न्यायप्रविष्ठ आहे. कुडले हा उत्तरकर यांना पत्नीला नांदायला पाठवा, असे सातत्याने सांगत होता. तर उत्तरकर हे घटस्फोट घेण्याबाबत आग्रही होते. याच प्रकरणाबाबत बुधवारी न्यायलयात तारीख होती, अशी माहिती पोलिसांनी दिली. न्यायालयात तारखेला हजर राहिल्यानंतर कुडले आणि उत्तरकर यांच्यात वाद झाला.दरम्यान, उत्तरकर सायंकाळी साडे सात वाजता त्यांच्या कपड्याच्या दुकानात बसले होते. त्यावेळी कुडले याने तेथे येऊन त्यांच्यावर चाकूने वार केले. त्यामध्ये उत्तरकर हे गंभीर जखमी झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर कुडले चाकू हातात घेऊन स्वतः खडकी पोलीस ठाण्यात हजर झाला. त्याने या घटनेची खडकी पोलिसांना दिली.

## अश्लिल सिनेमातील नटी पत्नीच वाटली...

दिवसभर रिक्षा फिरवून रात्री दारू पिऊन घरी आला की त्याला पत्नी सोबत पॉर्न फिल्मसारखे सेक्स करण्याची इच्छा होत होती. त्याची दोन मुले मोठी झाली होती. तर तीन मुले ही अजून लहान होती. तरी ही त्यांना सर्व काही समजत होते. नवरा बायकोची झोपण्याची रूम वेगळी असल्याने त्याना मुलांचा काही अडसर वाटत नव्हता. बेडवरच्या खेळात जहीर पाशा जर कमी पडत होता तरी ही तो रेशमासोबत पॉर्न सारखे सेक्स करून आपली लैंगिक भावना भागवू इच्छित होता. ती बिचारी सरळ मार्गी शांत स्वभावाची होती. सेक्स करताना त्याने एकदा दोनदा रेशमाला पॉर्न फिल्म दाखविली होती. त्यावेळी त्याने या प्रमाणे आपण करूया का असे विचारले देखील होते. पण त्यातील किळसवाणी प्रकार बघून त्याप्रमाणे सेक्स करायला तिने त्याला नकार दिलेला होता. नवरा आहे म्हणून तिने त्याला मला असले काही सहन होत नाही असे प्रामाणीकपणे सांगितलेले होते.याचा नेमका अर्थ जहीरने वेगळाच काढला होता. रेशमाची मादक सेक्सी जवानी आपल्या माघारी कुणी तरी उपभोगत असेल म्हणून ती आपल्याला सेक्स संबंधात प्रतिसाद देत नाही असे त्याला वाटत होते. त्यातच तो दारू पिऊन आला की रेशमाच्या चरित्र्यावर संशय घेवून तिचे कोणाबरोबर तरी लैंगिक संबंध आहेत असे म्हणून तो तिला मारहाण करीत असे. या सगळया प्रकाराने त्याची मुले भयभयीत होत होती.आपल्याला पत्नी पॉर्न फिल्मसारखे सेक्स करू देत नाही याचा त्याला राग येत तिचे कुठेतरी बाहेर अनैतिक संबंध आहेत असा संशय त्याच्या मनात येत होता. या कारणातून तो दारू पिऊन आला की रेशमाबरोबर भांडण काढून तिला शिव्या देत मारहाण करीत होता.या मारहाणीमध्ये त्याचे खरे दुखणे हे वेगळेच होते.त्याला पत्नीकडून पॉर्न फिल्मसारखा सेक्स पाहिजे होता. तसे ती त्याला करू देत नव्हती.तो तिला मारहाण करीत असताना तो का मारहाण करीत आहे हे ती भांडण सोडावयला आलेल्या लोकांना सांगू शकत नव्हती. अलिकडे तर त्याला पॉर्न पाहण्याचे इतके व्यसन जडले होते की तो वेळ मिळाला की मोबाईल काढून पॉर्न फिल्म पाहत असायचा. ती फिल्म पाहत असताना नजरेसमोर तो आपल्या पत्नीला आणून आपण तसे सेक्स करीत आहोत याचे स्वप्न रंगावयचा. कधी कधी आपल्या पॅन्टेतील बाबुरावला दाबून आपली पॅन्ट घाण करीत होता.त्याची ही सवय आणि विकृती रेश्माने पाहिली होती. ती त्याला तसे करू नका म्हणून समजावून सांगत होती. पण तो तिचे काही एक ऐकत नव्हता. आपली लैंगिक इच्छा पुर्ण आपली पत्नी करीत नाही याचा त्याला राग येत होता. मागे एकदा ते दोघे पाहुण्याच्या लग्नाला कोलार येथे गेले असताना लग्नानाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर तो बाहेर एका कोपऱ्यात मोबाईलमध्ये पॉर्न फिल्म पाहत असल्याचे त्याच्या पत्नीने पाहिले होते.त्यावेळी तिने त्याला या ठिकाणी तरी अशी लैंगिक विकृती करू नका असे बजावले होते. त्यावेळी त्याने तू तर मला करू देत नाहीस कमीत कमी यातील चित्रे पाहून तरी मी माझे समाधान करू दे असे म्हणाला होता. या कारणातून तेथे नवरा बायकोत जोरदार भांडण झाले होते.त्यावेळी त्या भांडणात त्याने रेशमाला जबर मारहाण केली होती.त्यावेळी तिला रुग्णालयात उपचारासाठी दाखल करावे लागले होते. तेथे हजर असणाऱ्या जहीरच्या सासु सासऱ्यांनी ही रेशमाला मारहाण करू नकोस असे सांगितले होते. त्यांनी त्याला सरळ मार्गी राहण्याचा सल्ला दिलेला होता. तरीही त्याची पॉर्न पाहण्याची विकृती काही कमी होत नव्हती. त्याला पॉर्न फिल्म पाहून मुठ मारण्याची सवय जडल्याने तो त्यावरच आपले समाधान मानत होता.एकदा असेच तो एकांतात पॉर्न फिल्म पाहत असताना त्या फिल्ममधील ती महिला त्याला आपली पत्नी रेशमा सारखी दिसत होती. तो ती फिल्म एकाग्रतेने पाहू लागला होता.ती फिल्म पाहत असताना ती महिला त्याला रेशमाच वाटत होती.तो ती फिल्म परत परत पाहत होता. त्यातील महिला ही दुसरी तिसरी कुणी नसून आपली बायकोच असल्याची त्याची खात्री पटली. त्याला तसा भास होत होता.ती रेश्मा नव्हती दुसरीच महिला होती. पण त्याला ती आपली बायकोच असल्याचे दिसू लागले होते. सेक्स करताना पॉर्न फिल्मसारखा सेक्स करू देत नाही आणि येथे तर ती दुसऱ्याबरोबर पॉर्न फिल्ममध्ये पाहिजे तसे सेक्स करीत आहे. आपल्या पत्नीने पॉर्न फिल्ममध्ये काम केल्याचे बघून तो चवताळलाच होता. आता ही फिल्म लिक झाली तर आपली इज्जत अब्रु काही राहणार नाही असा विचार त्याने मनात केला.खरे तर त्या फिल्ममध्ये त्याची पत्नी रेश्मा ही नव्हतीच. पण त्याला तसा भास झाल्याने पत्नीने पॉर्न फिल्ममध्ये काम केल्याचे वाटू लागले होते.त्याने ती फिल्म पुर्ण बघितल्यावर तो घरी आला. शांत डोक्याने तो विचार करीत असताना त्याची बाहेर गेलेली रेश्मा ही परत आली.घरात दोन लहान मुले होती.त्याच्या समोरच तो तिच्याबरोबर भांडण काढू लागला. तू पॉर्न फिल्ममध्ये काम करतेस आणि मला तसे तू करू देत नाहीस असे म्हणून तो तिला मारहाण करू लागला होता. ती ही रागाच्या भरात त्याचेवर तोंड सुख घेवून त्याला वाटेल तसे ती बडबडत होती. तो तिला मोबाईलमधील ती फिल्म दाखवित होता. तिला ती तसली फिल्म बघण्याची इच्छा नव्हती.परंतू नवऱ्याने आक्षेप घेतल्याने ती बघु लागली होती.त्या फिल्ममधील महिला ही सेम टू सेम तिच्यासारखेच दिसत होती. तिने नवऱ्याला याबाबत समजावून सांगितले ही खरे पण ते तो मान्य करायला तयार नव्हता.उलट तो तिला म्हणत होता. ती महिला दुसरी तिसरी कुणी नाही तर ती तुच आहेस. त्याच्या मनाची खात्री झाली होती की त्याच्या पत्नीने पॉर्न फिल्ममध्ये काम केले आहे याचा राग मनात धरून तो तिला मारहाण करीत असताना ती ही त्याला घाण घाण शिव्या देवून त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवीत होती. दोघांचे कडाक्याचे भांडण चालले होते.त्याला ही राग अनावर झाला होता. तो ही तिला अर्वाच्च भाषेत शिवया देत होता. दोघे ही एकमेकांना मारहाण करीत होते. ती त्याचे अंगावर येत असताना त्याने आपल्या कडील चाकूने तिच्या पोटात जबर वार केले. तर त्याच चाकूने तिचा गळा ही चिरला. त्यासरशी ती रक्ताच्या थारोळ्यात निपचिप गार पडली. आपल्या हातून पत्नीचा खून झाला आहे हे लक्षात येताच तो भानावर आला. या प्रकाराने मुले ही भांबवली होती. ती पळतच घराबाहेर गेली आणि जवलच राहत असलेल्या आपल्या आजोबाकडे जावून घडलेली सगळी हकीकत त्याना सांगितली. काही तरी विपरीत घडले असल्याचा संशय रेश्माचे वडिल गौस पाशा यांना आला. त्यांनी तातडीने आपल्या दोन्ही नातवंडासोबत रेश्माचे घर गाठले असता घरात रक्तताच्या थारोळ्यात त्याची मुलगी रेश्मा पडली असल्याचे त्याना दिसले बाजुलाच हताश होऊन रेश्माचा नवरा जहीर पाशा हा बसला होता. शेजारी ही जमा झाले होते. मुलांचा ही अक्रोश चालू होता. या घटनेची माहिती गौस पाशा यांनी रामनगर पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांनी या घटनेची माहिती गौस पाशा याचेकडून घेवून ही घटना कोणत्या कारणातून कुणी आणि कशासाठी केली याची माहिती घेतली होती. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रूग्णालयात पाठवून दिला. या घटनेती संशयीत आरोपी जहीर पाशा याला पोलीसांनी ताब्यात घेवून त्याचेकडे या घटनेची चौकशी पोलीसांनी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्याने आपल्या गुन्हयाची कबुली दिल्याने पोलीसांनी गौस पाशा याच्या फिर्यादीवरून रेश्मा पाशा (वय ३५) हिच्या खून प्रकरणी जहीर पाशा (वय ४२) याच्या विरोधात आयपीसी कलम ३०२, प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी जेलमध्ये केली.या घटनेचा पुढील तापस रामनगरचे एसपी संतोष बाबु यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

## वेडाचा झटका येताच तिचा तोल गेला...

ती कोणाशी ही मनमोकळेपणाने बोलत होती. याचा वेगळा अर्थ तिच्या नवऱ्याने काढला होता. तो तिच्यावर संशय घेत असल्याने नवरा बायकोत नेहमी या विषयावरून भांडणे होऊ लागली होती. या भांडणाचा परिणाम मारियानी हिच्यावर झाला होता. तिच्या डोक्यात तो विषय बसला असल्याने ती त्यावेळेपासून थोडशी वेडयासारखे करीत होती. याचा व्हायचा तोच परिणाम झाला. तिच्या नवऱ्याने तिच्या मनोरुग्णतेचा विषय पुढे करून तिच्याशी घटस्फोट घेतला होता.त्यामुळे गेल्या २०-२२ वर्षापासून मारियानी ही बांदरा आंबेली येथील आपल्या आई वडिलाकडे राहू लागली होती. ती नवऱ्याला सोडून राहत असल्याने तिच्या डोक्यावर ही परिणाम झालेला होता. त्यामुळे ती घरात आणि बाहेर ही पिसाळल्यागत करीत होती. त्यामुळे तिच्या वागण्याचा परिणाम हा तिच्या आई वडिलावर होत होता. ते बिचारे ही वयोवृध्द झाले होते. तरी ही ते तिला मानसिक अजारातून बरे करण्यासाठी धडपडत होते. तिचे वडिल फिदेरीस कार्डोस यांनी तिच्यासाठी कर्नाटकातील शिमोगा येथून आयुर्वेदिक औषध चालू केले होते.सकाळ संध्याकाळ ते तिला नेहमी औषधाचा डोस घेण्यासाठी तगादा लावत होते.कधी कधी मारियानी ही औषधे घ्यायला टाळाटाळ करीत होती. तरी ही तिचे आई वडिल हे तिला ती औषधे जबरदस्तीने घ्यायला लावत होते. मारियानी ही काही आता लहान नव्हती. वयाची ५०शी तिने ओलांडली होती.या वयात तिच्या आई वडिलांनी तिला समजावून सांगणे चुकींचे होते. पण तिच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. ती वेडयासारखे करते हे समजून घेवून तिचे आई वडिल उलट तिची योग्य ती खबरदारी घेत सेवा करीत होते. ते तिला यातून बरे करण्यासाठी धडफडत होते.पण ती काही बरे होत नव्हती. नवरा बायकोच्या भांडणाचा विपरीत परिणाम तिच्या डोक्यावर झाला होता. तिला वेडयाचे झटके आल्यागत होत होते. आई वडिलांनी तिला औषघे घेण्याची जबरदस्ती केली की ती त्यांनाच माराहाण करायला जात होती. हातात काय सापडले त्या वस्तूने अथवा जवळचा दगड घेवून ती त्याना मारहाण करायची. तिच्या घरच्या लोकांची ही अवस्था होती तर मग बाहेरच्या लोकांची काय परिस्थिती होणार हे न विचारलेले बरे. मुलगी आपली आहे. ती मनोरुग्ण आहे म्हणून तिचे आई वडिल तिची काळजी करीत होते. ती मात्र या सर्व जगापासून अनभिज्ञ असल्यासारखे वागत होती. या वयात तिच्या आई वडिलांना तिला वेडयाचे झटके आले की दवाखान्याला नेई पर्यत पुरे वाट होत होती. तिच्या औषध पाण्याचा खर्च ही बराच वाढलेला होता. त्यामुळे तिची व्यवस्था करे पर्यत त्याची ही नाके नऊ होत होती. तरी ही मुलगी म्हणून ते तिचा सांभाळ करीत होते. ती लवकर बरी व्हावी यासाठी तिला वेळेवर औषध पाणी देणे, तिची स्वच्छता ठेवणे आदी कामे तिचे आई वडिल करीत असत. ती वेडयासारखे करते म्हणून तिला कुठे ही ते बाहेर पाठवत ही नव्हते. ती मात्र घरी राहून लोकांच्या अंगावर मारायला धावून जाणे, वेडेवाकडे अंगविक्षेप करणे आदी प्रकार करीत होती. तिच्या मनाची चिडचिड होत होती. त्यातच गेल्या चार पाच महिन्यापासून तिने औषध पाणी घेणे ही बंद केले होते. त्यामुळे ती जास्तच तापट आणि रागीट बनली होती. कुणी काही बोलले की ती त्याचे अंगावर मारायला जात होती. त्यामुळे सहसा कुणी तिला डिवचत नव्हते. तिच्या आईला तिची काळजी जास्त होती. म्हणून ती तिला औषधे वेळेवर घेण्यासाठी जबरदस्ती करीत होती. याचा राग मरियानी हिला येत होता. ती आईवर खेकसत, मला तू औषधासाठी जास्त आग्रह करू नको असे सांगत होती.त्यातच शनिवार ता.१६ एप्रिल रोजी तिची आई पावलीना यांनी तिला जबरदस्तीने औषध घेणेसाठी तगादा लावला होता. त्यावेळी मारियानी हिने आईला जबर मारहाण केली होती.कसे बसे तिच्या वृध्द आईने तिच्या तावडीतून आपली सुटका करून घेतली होती. त्यावेळी वडिल फिदेरीस यांनी बायको पावलीना हिला मेहुणी कडे राहण्यास पाठवून दिले.रागाच्या भरात त्यावेळी त्यांनी मुलगी मारियानी हिला ही चांगले चार शब्द सुनावले होते. तिने त्याचे बोल फक्त ऐकून घेतले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी म्हणजे रविवार दि.१७ रोजी सकाळी रात्रीचे सगळे विसरून वडिल फिदेरीस यांनी तिला औषधे घेण्यासाठी ओरडले होते. ते तिला मारायला ही गेले होते. आगोदरच तिला वेडयाचे झटके येत असल्याने ती ही गप्प बसली नाही वडिल ओरडत असताना आणि मारायला येत असताना तिने बाजुलाच पडलेला लाकडी दांडका उचलला आणि वडिल फिदेरीस याच्या पायावर आणि डोक्यावर जोरात हाणला. अगोदरच ते वयोवृध्द होते. लेकीने लाकडी दांडक्याने केलेल्या मारहाणीत ते जागीच बेशुध्द होऊन पडले. त्याच्या तोंडाला आणि पायाला जबर मार लागला होता. त्यातच त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शेजाऱ्याना समजताच आरडा ओरडा करीत घटनास्थळी आले. लोक धावत पळत येत असल्याचे बघून मारियानी घाबरली होती. तिने केस मोकळे सोडले होते. तिच्या अंगात भुताटकी संचारल्यासारखे ती करीत होती.लोक तिला पकडण्यासाठी पुढे येत असताना ती लोकांना भिती दाखवत पळून जावू लागली.तिने त्यावेळी वेडयाच्या भरात आपल्या अंगावरील संपुर्ण वस्त्रे काढून टाकली होती. त्याच अवस्थेत ती पळून नदीकडे गेली. नदीत उडी मारून विवस्त्रपणे ती पाण्यात जावून बसली. लोक काठावर उभे राहून तिला ओरडत होते. तर जे काही लोक घटनास्थळी होते. त्यांनी तिच्या वडिलांची नाडी तपासून बघितली. त्याचा श्वासोश्वास चालू नसल्याने जवळच्या डॉक्टरांना बोलावून त्याची तपासणी केली असता त्या डॉक्टरांनी त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले. या घटनेची माहिती लगेच कुंकळ्ळी पोलीसांना देण्यात आली. मनोरूग्ण मुलीने बापाला मारहाणीत मारून टाकल्याचे समजताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. पो.निरी सचिन पन्हाळकर यांनी घटनास्थळी भेट देवून घटनेची माहिती घेतली होती. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून देवून या घटनेची माहिती मयत फिदेरीस कार्डोस याच्या पत्नी पावलीन यांना दिली. त्याही या घटनेची माहिती मिळताच बहिणीच्या घराकडुन लागेच परतल्या होत्या. तर इकडे पोलीसांच्या एका पथकाने नदीच्या पात्रातून मरियानीला बाहेर काढून ताब्यात घेतले होते. या घटनेची फिर्याद मयत फिदेरीस याच्या पत्नी पावलीना यांनी दाखल केली. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी फिदेरीस कार्डोस (वय ७६) याच्या मृत्यू प्रकरणी त्याची मुलगी मारियांनी कार्डोस (वय ५०) हिच्या विरूध्द भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. ती मनोरुग्ण असल्याने पोलीसांनी तिची वैदयकीय तपासणी सरकारी रुग्णालयात करून घेवून तिला मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने तिची रवानगी मनोरुग्ण हॉस्पिटलमध्ये केली. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरी.सचिन पन्हाळकर हे करीत आहेत.

पान ८ वरून...

## कारवाईची आश्वासन दिल्यानंतर ...

झालेले आहेत. परतू घरकुल एकाचे नावे मंजूर आहेत त्या घरकुल मध्ये लाभार्थी राहत नाही वेगळे लोक राहतात यांची चौकशी व्हावी. ए.एम.नेलुरे साहेब यांची अक्कलकोट तालुक्यात ग्रामसेवक म्हणून नियुक्ती झाल्या पासून त्यांनी केलेल्या प्रतेक ग्रामपंचायत मधील १ ते ३३ विषयाची व शासना कडून आलेल्या प्रतेक योजनेसाठी आलेला निधी,१) ग्रामनिधी २) पाणीपुरवठा निधी ३) दलित वस्ती निधी ४) जनसुविधा निधी ५) नागरी सुविधा निधी ६) तीर्थक्षेत्र विकास निधी ७) १४ वा वित्त आयोग निधी ८) १५ वा वित्त आयोग निधी, यासर्व योजनेचे झालेल्या कामकाजाची दर्जा, गुणवता व बिलआदा केलेलीची कॅश बुक्क, व्हाचार बुक्क, स्टाफ बुकची तपासणी, केल्यास झालेल्या कामाची मुल्यांकन व ग्रामसभा, माषिक सभा मध्ये प्रोसिडींग लिहलेली व प्रतेक वर्षी ग्रामपंचायतची ऑडीट रिपोर्ट या सर्व बाबीचा तपासणी, करण्यात यावी. यामध्ये मोठ्याप्रमाणात अनियमितता, गैरकारभार, गैरव्यवहार, भ्रष्टाचार झालेला आढून येईल यांची चौकशी करण्यात यावी ए.एम.नेलुरे ग्रामसेवक साहेब यांनी शासन सेवेत रुजू होताना त्यांची जंगम व सावर मालमत्त किती होती. आता सध्या जंगम व सावर मालमत्त किती आहे. आपल्याकडे मत्ता व दायित्वे यांची वर्षीक विवरणे सादर केलेलीची चौकशी करण्यात यावी. वरील सर्व तक्रारीचा आपल्या विभागाकडून सक्षम प्रधिकरणा मार्फत तात्काळ संखोल चौकशी करून आपल्या अधिकाराचा वापर करून भारतीय संविधानाच्या अनुच्धेद ३११ अनुसार व महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम-२०१६/प्र.क्र.२५३/पंरा-३ बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,फोर्ट,मुंबई, ४००००१ दि.०४ जानेवारी २०१७, वाचा-शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम-२०१३/प्र.क्र.१३७/पंरा-३ दि.१२ जून, २०१३ संदर्भिय शासन परिपत्रकातील अनुक्रमांक १ अन्वये तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावी. अशा प्रकारचा निवेदन दि.२२/११/२०२१ रोजी गट विकास अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट व उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्राम पंचायत विभाग सोलापूर, यांना प्रत्येक्ष्य भेटून निवेदन दिलेला होता व आहे. या निवेदनातील नमूद प्रतेक मुद्यावर एक महिन्यात किवां १२ आठवड्यात सखोल चौकशी करून तक्रारदारास कळविणे कायदेने बंधन कारक असताना देखील चौकशी केली नाही. व तक्रारदारस कळविले नाही. या मध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता, गैर- कारभार, गैरव्यवहार, भ्रष्टाचार झाले असल्यामुळेच गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट यांनी संबधित ग्रामसेवक बरोबर मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण घेवाण करून त्यांच्याशी संगनमत करून चौकशी केली नाही. व शासनांनी घालून दिलेल्या नियम व अटीचा, आदेशाचा भंग आणि शासनाचे परीपत्रकाचे उल्लघन केलेला आहे. त्याच प्रमाणे शासकीय लोकसेवक यानात्याने, कर्तव्यनिष्ठ व कार्यदक्ष राहणे आवश्यक असतना ही कर्तव्यात कसूर केलेला आहे. आणि कर्तव्येची अंमलबजावणी करताना नियमाप्रमाणे काम, कालमर्यादा कामाचा दर्जा राखणे व शासकीय सेवा पुरवण्या मध्ये स्तर व जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. त्या सर्व नियमाचा व जबाबदारी चा जाणून बुजून संबधीत लोक सेवकांनी कर्तव्यात कसूर करून हेतुपुरस्पर विलंब व गैर वर्तन,गैरकारभार करण्यात सामील असल्याचे प्रथम दर्शनी सिध्द होत असल्याने. गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट यांनी शासनाच्या नियमा व अटीचे आदेशाचा,शासनाचे परिपत्रकाचे उल्लघन केल्या प्रकरणी लोकसेवकावर (शिस्त व अपील) अधिनियम अन्वये व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम अन्वये शिस्त भंगाची कारवाई करण्यासाठी दि.११/०४/२०२२ रोजी जिल्हा परिषद सोलापूर, पूनम गेट येथे लोकशाही मार्गाने सोमवारी ११ एप्रिल रोजी सकाळी ११ ते ४ या वेळेत उपोषणाला बसले होते. ग्रामपंचायत विभागाचे अधिकारी येऊन कारवाई करण्याची पत्र दिल्यानंतर उपोषणाला स्थगिती दिली. यावेळी उपोषण बसलेले सामाजिक कार्यकर्ते अशोक ढोणे यांना उपोषणाला स्थगिती मिळाल्यानंतर भाजपा सोलापूर जिल्हा कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष नितीन करजोळे , श्रीराम सेना सोलापूर जिल्हाध्यक्ष सिद्धाराम नंदरगी यांनी ज्युस दिले.

## सशक्त भारतासाठी निरोगी आरोग्य...

मात्र याकरीता राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यांनी आपले योगदान देवून आपआपल्या परिसरातील नागरिक निरोगी करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. या आरोग्य मेळाव्याच्या उदघाटन प्रसंगी निलंगा उपविभागीय अधिकारी शोभाताई जाधव, तहसिलदार गणेश जाधव, गटविकास अधिकारी अमोल ताकभाते, तालुका आरोग्य अधिक्षक दिलीप सोंदळे, जिल्हा संघटन सरचिटणीस तथा माजी सभापती संजय दोरवे, जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा भारतबाई साळुंके, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, शहराध्यक्ष ॲड.विरभद्र स्वामी, शिरूर अनंतपाळ तहसीलदार अतुल जटाळे, तालुका आरोग्य अधिकारी नारायण देशमुख, तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, ॲड.संभाजीराव पाटील, नगराध्यक्ष मायावती धुमाळे, गटविकास अधिकारी बळीराज चव्हाण, देवणी तहसिलदार सुरेश घोळवे, वैदयकीय अध्यक्ष निळकंठ सगर, तालुकाध्यक्ष काशिनाथ गरीबे, जि.प.सदस्य प्रशांत पाटील, पृथ्वीराज शिवशिवे, माजी सभापती शंकर पाटील तळेगांवकर, गटविकास अधिकारी महेश सुळे आदीसह वैदयकीय अधिकारी, कर्मचारी व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## नेरळ पोलिसांनी इफ्तार पार्टीचे ...

बांधवांनी एकत्रित बसुन या ईफ्तार पार्टीचा लाभ घेतला होता. त्यामुळे नेरळ पोलिसांचा या ईफ्तार पार्टीमधुन सामाजिक एकोप्याचा संदेश गेला आहे. तसेच नेरळ शहरात हिंदु मुस्लिम गुण्यागोविंदाने राहतात, तसेच गावात कुठलेही मतभेद नाहीत याचे पुन्हा एकदा दर्शन ईफ्तार पार्टीतुन समाजाला घडले आहे. नेरळ पोलिस ठाण्यात न भुतो न भविष्यती अशी ही ईफ्तार पार्टी पार पडली आहे. यावेळी नेरळ येथिल मुस्लिम बांधवांनी ईफ्तार पार्टी आयोजकांचे आभार मानले आहेत. ही ईफ्तार पार्टी यशस्वी पार पडणेसाठी नेरळचे पोलिस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर, पोलिस सहा निरीक्षक भालचंद्र, पीएसआय काळे, पोना समिर भोईर, पोलिस हवालदार मुनेश्वर, पोलिस हवालदार अमोल पाटील, पालवे यासंह सर्व पोलिस कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली होती.

## ‘उंबरा ओलांडताना’ कविता संग्रहाचे ...

स्त्रीवादी जाणिवांचा विचार मांडल आहे. अशी मांडणी करण्यात आली. कार्यक्रमास लातूर शहरातील मा. महापौर विक्रांत गोजमगुंडे, उस्मानाबाद जिल्ह्याचे जिल्हाअधिकारी मा. कौस्तुभ दिवेगावकर, डॉ. अजित जगताप, अतुल देऊळगावकर, डॉ. बी. आर. पाटील, श्रीमती सुमती जगताप, श्रीमती कुकडे मॅडम, डॉ. मुग्धा पोतदार, विनोद कुचेरिया इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पंचशील डावकर, परिसंवादाचे सूत्रसंचालन अमिता पैठणकर, तर कार्यक्रमाचे आभार अनिल जायभाये यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी सुपर्ण जगताप, राहुल लोंढे, राजश्री कांबळे, सुनील गायकवाड, सूर्वोदय बोईनवाड यांनी परिश्रम घेतले.

## तृतीयपंथीयांच्या सर्वांगीण विकासासाठी...

प्रकाश सोळंखी, शांतनु दीक्षित, चिरंजीव भट्टाचार्य, रामराव मुंडे, रश्मी रावळ यांनीही यावेळी तृतीयपंथीयाविषयक त्यांच्या कार्यक्षेत्रातील माहितीचे सादरीकरण केले.

## स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या..

संतोष पारडे, सागर सावळे, अजय सुर्यवंशी, संदिपन कदम, अजय कांबळे, नितीन गायकवाड, आशिष कांबळे, विजय कांबळे, राहुल कांबळे, आदिनाथ जाधव, सतीश ढवळे, किरण ढवळे यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## राजगडावर पर्यटकांवर मधमाशांचा हल्ला

पुणे : राजगडावर पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांवर मधमाशांनी हल्ला केल्याची घटना घडली आहे. अचानक झालेल्या या मधमाशांच्या हल्ल्याने एकच खळबळ उडाली आणि पर्यटकांची धावपळ सुरू झाली. या धावपळीत गडाच्या बुरुजावरुन एक महिला थेट दरीत कोसळल्याची माहिती समोर आली आहे. राजगड किल्ल्यावर काही पर्यटक शनिवारी पर्यटनासाठी गेले होते. याच दरम्यान मधमाशांनी पर्यटकांवर हल्ला केला. मधमाशा अंगावर आल्याने पर्यटकांची धावपळ सुरू झाली. यावेळी रोहिणी वराट यांचा पाय घसरला आणि त्या १०० फूट खोल दरीत कोसळल्या. शनिवारी दहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. पर्यटक महिला दरीत कोसळल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस घटनास्थळी दाखल झाले. यानंतर रेस्क्यू टीमच्या मदतीने या महिलेला बाहेर काढण्यात आले. त्यांना उपचारासाठी जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आलं. राजगड किल्लयाच्या सुवेळा माचीवर पर्यटक गेले असता त्यांच्यावर मधमाशांनी हल्ला केला. मधमाशांनी केलेल्या हल्लयात पर्यटक जखमी झाले आहेत. तर पाय घसरून दरीत कोसळल्याने रोहिणी वराट या महिलेच्या डोक्याला दुखापत झाली आहे. रोहिणी वराट यांना नसरापूर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

25 APRIL TO 01 MAY 2022 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 24/04/2022 4:40 PM Page 1



# 'मुळेगाव तांडा येथील ऑपरेशन परिवर्तन उपक्रम कौतुकास्पद'



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांडा येथे ग्रामीण पोलिसांनी राबवलेल्या ऑपरेशन परिवर्तनाच्या उपक्रमात सहभागी होऊन हे परिवर्तन कौतुकास्पद असून महाराष्ट्र पोलिसांचा सार्थ अभिमान असल्याचे यावेळी खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी हा अनोखा उपक्रम आयोजित केला होता. खा. सुप्रिया सुळे यांनी या उपक्रमाचे लोकसभेतही कौतुक केले होते या उपक्रमानुसार हातभट्टी दारू तयार करणाऱ्या महिलांच्या हातात शिलाई मशीन आले व त्यांचे जीवन बदलून गेले यासह त्यांच्यात विविध बदल या महिलांच्या जीवनात झाले आहेत ते स्वागतार्ह व कौतुकास्पद असल्याचेही यावेळी सुळे यांनी सांगितले. या उपक्रमातून त्यांनी एक प्रकारचे बळ देत पोलिसांचेही त्यांनी कौतुक केले. मुळेगाव तांडा येथील महिला हिरहिरीने विणकाम म्हणजेच बंजारा ड्रेस कोड व कापडी पिशवी या व्यवसायाकडे वळल्या आहेत. कालांतराने हाच व्यवसाय दुप्पट तिप्पट चौपट झाल्यानंतर आपण स्वतः मुख्यमंत्र्यांना घेऊन येऊन या महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करून त्यांना मोठ्या बाजारपेठ उपलब्ध करून देणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. कोणत्याही लोकप्रतिनिधींचा त्याच्या धोरणामुळे परिवर्तन होत असेल तर निश्चित ते आनंददायी असते.असे या उपक्रमाचे कौतुक करताना त्या म्हणाल्या जिथे जिथे चांगली कामे होतात त्याची आपण नोंद घेतली पाहिजे त्यांचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे असे त्या म्हणाल्या मला महाराष्ट्राच्या पोलिसांचा सार्थ अभिमान आहे. आपण कुठेही फिरताना अजिबात भीती वाटत नाही कारण राज्याचा पोलिस जबाबदार आहे.त्यांच्या तर्फे आज हा उपक्रम राबविला गेला आहे तो अतिशय कौतुकास्पद आहे व हा विषय गृह आणि टेक्सटाईल विभागाशी संबंधित आहे त्यामुळे केंद्रीय गृहमंत्र्यांना तसेच टेक्स्टाईल मंत्र्यांनाही या विषयी पत्र लिहिणार असून याविषयीची माहिती त्यांना देणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बळीराम काका साठे, राष्ट्रवादीचे युवा नेते उमेश पाटील,अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, पोलीस उपअधीक्षक सुर्यकांत पाटील, उपविभागीय पोलिस अधीक्षक अमोल भारती, ग्रामीण गुन्हे अन्वेषणचे सुहास जगताप, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे, सहाय्यक पोलीस अधीक्षक सत्यसाई कार्तिक, पोलीस निरीक्षक अरुण फुगे, तहसीलदार अमोल कुंभार, मंडलाधिकारी जगदेवाप्पा धनुरे, मुळेगाव तांडा चे सरपंच विजय राठोड, उमेद दक्षिण तालुका व्यवस्थापक शिवाजी वाघमारे, प्रदीप बंगाळे व मुळेगाव तांडा परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान मुळेगाव तांडा येथे उमेद अभियानाचे एकूण तीस गट आहेत त्यापैकी १८ गटाला पंधरा हजार प्रमाणे अनुदान दिले आहे. सोळा गटाला प्रत्येकी एक लाख प्रमाणे कर्जवाटप केले आहे. तीन गटाला व्यवसाय करण्यासाठी सीआयएफ निधी एक लाख ऐंशी हजार दिला आहे. व जोखीम प्रवर्ता निधी ७५००० हाही या बचत गटांना दिला आहे. स्टार्ट अप ऑफिस कामासाठी ५५००० निधी या बचत गटांना दिला आहे व उमेद अभियान तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष व दक्षिण सोलापूर कार्यालय बचत गटांना कोणत्याही निधीची कमतरता भासू देणार नाही. या निधीचा त्यांनी पुरेपूर उपयोग करून व्यवसाय वृद्धींगत करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे तालुका अभियान व्यवस्थापक शिवाजी वाघमारे यांनी सांगितले. तर मुळेगाव तांडा येथील महिलांनी विणकामातून तयार केलेला बंजारा ड्रेस कोड व कापडी पिशव्या साठी आपण सोलापूरच्या पोलिस ग्राउंड वरती मोठा मेळावा घेणार असून तेथे त्यांना व्यवसायासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणार असून त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करणार आहे, असे पोलीस अधीक्षक ग्रामीण तेजस्वी सातपुते यांनी सांगितले.

# महात्मा बसवेश्वर सिंहासनारूढ पुतळा परिसराची स्वच्छता



**लातूर/प्रतिनिधी**

येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालय समोरील जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या सिंहासनारूढ पुतळा परिसराची जगतज्योती सोमवार समूह, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या स्वयंसेवकांनी संपूर्ण स्वच्छता केली. यामध्ये सिंहासनारूढ पुतळ्या समोरील सर्व झाडांची स्वच्छता करून त्यांना आळे करणे व पाणी देणे शिवाय त्या ठिकाणी संपूर्ण परिसर हा सर्वांच्या सहकार्याने स्वच्छ करण्यात आला. या स्वच्छता अभियानानंतर महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याला महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे यांनी पुष्पहार अर्पण केला आणि सर्वांनी विनम्रपणे अभिवादन केले. यावेळी २५ एप्रिल ते ३ मे २०२२ या कालावधीमध्ये जगतज्योती महात्मा बसवेश्वर ९१७व्या जयंती उत्सव २०२२ तर्फे जागर समतेचा या कार्यक्रमांतर्गत निबंध स्पर्धा, भजन स्पर्धा, गायन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा आणि नृत्य स्पर्धेची माहिती देण्यात आली तसेच जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती दिनी ९१७ दिपांचा दीपोत्सव साजरा करण्याचे ठरविण्यात आले. यावेळी राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन प्रा.डॉ.बाळासाहेब गोडबोले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.शिवप्रसाद डोंगरे, डॉ.संजय गवई, प्रा.ओमप्रकाश झुरळे, बसवेश्वर हेंगणे, सुनील हेंगणे, बसवेश्वर रेकुलगे, चंद्रशेखर कत्ते, सुभाष गलगले, मनोज राघो, एडवोकेट सुरज विभुते, अरविंद वाडकर, योगेश कारंजे, सोमनाथ लुल्ले, डॉ.परमेश्वर कसगे, बसवराज आष्टुरे, राहुल जवळे, रितेश घाळे, बाळासाहेब महाजन, राजेंद्र शेटे, अक्षय आठवले, शुभम बिरादार, संतोष राठोड यांच्यासह राष्ट्रीय छात्र सेनेचे सर्व विद्यार्थी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यात्रेत मोबाईल चोरणाऱ्या आंतरराज्य टोळीला केले जेरबंद

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यात ग्रामीण परिसरातील आठवडा बाजार आणि यात्रेत मोबाईल चोरणाऱ्या आंतरराज्य टोळीला सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पकडून मोटरसायकलीसह २ लाख ५६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. राहुल पन्नालाल ठाकूर (२६) फेऱ्या उर्फ फिरोज फारूक मेहबूब शेख (३०) असे अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. हे दोघेजण सोलापूर ग्रामीण परिसरात आठवडा बाजार आणि यात्रेच्या गर्दीत घुसून लोकांचे मोबाईल चोरी करत होते. मोहोळ शहरातील मोबाईल चोरीच्या गुन्ह्याचा तपास करीत असताना संशयित एका मोटारसायकल वरून दोघेजण येत असताना त्यांना अडवून तपासणी केली असता त्यांच्याकडील मोटारसायकल चोरीचे आणि मोबाईल ही चोरीची असल्याचे आढळून आले. त्यांनी मोबाईल चोरल्याची



कबुली दिली त्यावरून त्यांच्याकडून मोटारसायकलीसह महागडे मोबाइल असा २ लाख ५६ हजार रुपयांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला. ही सदरची कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजेश गायकवाड, बिराजी पारेकर, श्रीकांत गायकवाड, महिला पोलीस हवालदार मोहिनी भोगे, हवालदार आबासाहेब मुंढे, विजयकुमार भरले, हरिदास पांढरे, सलीम बागवान , पोलीस नाईक रवी माने, सचिन गायकवाड, केशव पवार यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता दिनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न

**पालघर/प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रम ६ ते १६ एप्रिल दरम्यान जिल्ह्यामध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत साजरा करण्यात आला. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयामार्फत कार्यालयामध्ये स्वाधार योजनेच्या लाभार्थींना प्रतिनिधिक स्वरूपात धनादेशाचे वाटप करण्यात आले. पालघर बस स्थानक येथे पथनाट्याद्वारे सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांबाबत जनतेचे प्रबोधन करण्यात आले सहाय्यक आयुक्त कार्यालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. आंबेडकर नगर, तारापूर येथे मार्जिन मनी योजना व इतर राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यशवंतराव चाफेकर महाविद्यालय, टेंभोडे येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर



यांच्या १३१ व्या जयंती निमित्त संविधान जनजागृती कार्यक्रम सादर करण्यात आला. वेढी- मांजुर्ली, ता.पालघर येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले तसेच डॉ. आंबेडकरांनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याबद्दल व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. पंचाळी, ता.पालघर येथे बाबासाहेबांनी महिलांसाठी केलेल्या कार्याबद्दल माहिती देण्यासाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. आंबेडकरनगर नवली येथे ग्रामीण व शहरी भागातील अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्त्यामध्ये स्वच्छता कार्यक्रम करण्यात आला. अनु.जाती व नवबौद्ध वस्तीत लाभार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून कार्यक्रमाचा समरोप करण्यात आला.

# वाडा ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य मेळाव्याला नागरिकांचा प्रतिसाद



**वाडा/प्रतिनिधी**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने वाडा ग्रामीण रुग्णालयात शुक्रवारी (दि.२२) आयोजित केलेल्या आरोग्य मेळाव्याला नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला. या मेळाव्याचा तब्बल तीनशे पेक्षा जास्त नागरिकांनी लाभ घेत आरोग्य तपासणी करून घेतली. वाडा पंचायत समितीचे सभापती रघुनाथ माळी यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून उदघाटन करण्यात आले. या मेळाव्यात नेत्र तपासणी व नेत्रदान, बालरोग, अस्थिरोग, ह्रदयरोग क्षयरोग, रक्तदाब, ईसीजी, स्त्रीरोगतज्ज्ञ, अशा विविध आजारांवर तज्ञांकडून तपासणी करून औशोधोपचार देण्यात आले. तर आयुष्यमान कार्ड, हेल्थ आयडी, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनांची नोंदणी करण्यात आली असल्याची माहिती वैद्यकीय अधिक्षक डॉ.सुनिल भडांगे यांनी दिली. या प्रसंगी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संजय बोरपुल्ले, बालरोग तज्ञ सचिन पळसकर, डॉ.दिपक पांचाळ भक्तीवेदांत हॉस्पिटल, स्त्रीरोगतज्ञ डॉ.सुहास कदम, डॉ.तेजश्री पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# आरोग्य सेवा व शैक्षणिक व्यवस्थापन प्रणालीचा अभ्यास आवश्यक -अमित देशमुख

**मुंबई/प्रतिनिधी**

वैद्यकीय शिक्षण संशोधन विभागाच्या कार्यप्रणालीत सुलभता आणि एकसमानता आणण्यासाठी आरोग्य सेवा व शैक्षणिक व्यवस्थापन प्रणालीचा (एचएमआयएस) अभ्यास करण्यात यावा, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी सांगितले. आज मंत्रालयात आरोग्य सेवा व शैक्षणिक व्यवस्थापन प्रणाली (एचएमआयएस) याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी वैद्यकीय शिक्षण आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी एच.एम.आय.एस याबाबत सादरीकरण केले. या बैठकीला वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण आयुक्त वीरेंद्र सिंह, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, उपसचिव प्रकाश सुरवसे



उपस्थित होते. देशमुख म्हणाले, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि संलग्नित रुग्णालयांमध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करुन आंतरराष्ट्रीय दर्जाची वैद्यकीय माहिती निर्माण करणे आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सर्व शैक्षणिक बाबींमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर होणे ही गरज आहे. त्यामुळेच येत्या काळात या विभागासाठी आवश्यक सॉफ्टवेअरचे विश्लेषण, मॉड्युल्सची संख्या, वापर करण्याची सुलभता आणि एकसमानता या पर्यायांचा सांगोपांग विचार करुनच राज्यामध्ये सर्वकष अशी एकच एच.एम.आय.एस. कार्यप्रणाली विकसित होणे आवश्यक आहे. केंद्र शासनाने आयुष्यमान भारत डिजिटल मिशन ही योजना २७ सप्टेंबर २०२१ पासून संपूर्ण देशात कार्यान्वित केली आहे. या योजनेमध्ये आरोग्याशी संबंधित सर्व घटकांचा जसे, रुग्णालय, क्लिनिक्स, प्रयोगशाळा, फार्मसिज, रेडिओलॉजी सेंटर्स इत्यादीचा समावेश असणे आवश्यक आहे असे नमूद केले आहे. एच.एम.आय.एस कार्यप्रणालीचा वापर करताना वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील संस्थांमध्ये आवश्यक सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर, आवश्यक कुशल मनुष्यबळ यांची आवश्यकता असणार आहे. वैद्यकीय शिक्षण संचालनालयाने सी-डॅक (C-DC) यांच्याकडून रुग्णालय व्यवस्थापन माहिती प्रणालीचा प्रस्ताव मागितला असून याबाबतचा पूर्ण अभ्यास करणे आवश्यक असल्याचेही मंत्री देशमुख यांनी सांगितले.

# वाडा तालुक्यातील पाली येथे दिव्यांगांना व्हील चेअर व चादर वाटप



**वाडा/प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी व माणुसकीच्या जाणिवेतून गरजुंना दिशक्ती मुक्ताई ज्ञानप्रसारक मंडळ, मुंबई यांच्या वतीने शनिवारी (दि.२३) वाड्यातील पाली येथे एका कार्यक्रमा दरम्यान दोन दिव्यांगांना व्हील चेअरचे वाटप करण्यात आले. मुंबई स्थित सामजिक कार्यकर्ते सुरज कुलकर्णी यांचे सुपुत्र पार्थ यांच्या संकल्पनेतून गरजवंताना आवश्यक ते सहकार्य व मदत करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागातील गरजुंना अत्यावश्यक वस्तू वाटप करण्याचा मानस असल्याने शनिवारी पाली येथील रहिवाश्यांना चादर व मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते शिरीष मराठे, सुरज कुलकर्णी, मधुमती कुलकर्णी, पार्थ कुलकर्णी, सचिन शिंगडा, कमलाकर पाटील, विजय बिऱ्हाडे, कैलास पाटील आदी उपस्थित होते.

# सुकामेवा खाद्य पदार्थ घरफोडीत ४ आरोपींना नारपोली पोलिसांनी केली अटक, १७ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी तालुक्यातील वळगाव येथील प्रितेश कॉम्प्लेक्स या गोदाम संकुलात ७ एप्रिल रोजी युनिव्हर्सल कॉर्पोरेशन लि. कंपनीच्या गोदामांची शटर बनावट चावीने उघडून तब्बल २० लाख ९० हजार ९६ रुपयांची घरफोडी करीत ६०७०.५ लिटर ऑलिव्ह



ऑईल, सुकामेवा, मध, ओट्स, चोकोस्प्रीट, पीनट्स बटर, पस्ता पिझ्झा सॉस असा मुद्देमाल चोरी प्रकरणी नारपोली पोलिसांनी कोणताही पुरावा नसताना तांत्रिक तपासाच्या आधारे चार आरोपींच्या मुसक्या आवळण्यात यश मिळविले आहे. नारपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मदन बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पो निरी चेतन पाटील व त्यांच्या पथकातील सपोउप निरी धिवार, पोहवा सातपुते, पोना पाटील, सोनगिरे, जाधव, पोशि बंडगर, पोशि विजय ताठे यांनी सदर गुन्हयातील चोरीस गेलेले मालाचा व अज्ञात आरोपीतांचा तांत्रीकदृष्ट्या तपास करीत या गुन्हयात आरोपी सौरभ कमलकुमार त्रिपाठी, रा. काल्हेर, केशव नवसु पवार, रा. अंजुरफाटा, मेहबुब आलम कलीम मुल्ला खान रा.रोशनबाग या तिघांना ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली देत आपापसात संगनमत करून त्यांनी सदरचा माल हा मिररोड येथील अमरीश सुदामा जैस्वाल यास विक्री केल्याचे समजले. त्यानंतर या व्यापाऱ्यास १८ एप्रिल रोजी ताब्यात घेत एकूण चार आरोपींना अटक केली आहे. अमरीश सुदामा जैस्वाल याच्या ताब्यातून १७ लाख किमतीचे ४५७८ लीटरचे ऑलिव्ह ऑईल, सुकामेवा, मध, ओट्स, चोकोस्प्रीट, पीनट्स बटर, पस्ता पिझ्झा सॉस असा माल हस्तगत करण्यात आलेला आहे. या गुन्ह्याचा अफहिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चेतन पाटील हे करीत आहेत.

# अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या अध्यक्षपदी प्रा.डॉ.श्रीरंग खिल्लारे

**अहमदपूर/फिरोज शेख**







महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा अहमदपूर ची नुतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून या कार्यकारिणीच्या अध्यक्ष पदी प्रा. डॉ. श्रीरंग खिल्लारे, उपाध्यक्ष म्हणून डॉ. चंद्रकांत उगीले, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. जीवन गंगणे तर प्रधान सचिव म्हणून बाबासाहेब वाघमारे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे. कार्यकारिणी निवडी संदर्भातील बैठक शहरातील रविंद्रनाथ टागोर विद्यालयात पार पडली.

बैठकीची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन गीत सादर करून करण्यात आली. या बैठकीस मार्गदर्शक व निरीक्षक म्हणून राज्याचे प्रधान सचिव माधव बावगे, राज्याचे सरचिटणीस हरिदास तम्मेवार, लातूर जिल्हा कार्याध्यक्ष अनिल दरेकर उपस्थित होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. श्रीरंग खिल्लारे होते. या बैठकीत उपाध्यक्ष मच्छींद्र गोजमे, विविध उपक्रम कार्यवाह प्रा.डॉ. अनिल मुंडे, बुवाबाजी विरोधी संघर्ष कार्यवाह मनोहर पाटील, वैज्ञानिक जाणीवा प्रकल्प कार्यवाह भारत रोकडे, संस्कृतिक अभिव्यक्ति कार्यवाह प्रा. डॉ. रघुनाथ यादव,युवा सहभाग प्रभाकर तिडके, प्रशिक्षण विभाग संजय पवार, महिला सहभाग कार्यवाह श्रीमती मीनाक्षी तौर, जाती-अंत व जात पंचायतीला मूठमाती कार्यवाह नामदेव राठोड, अंनिस पत्रिका प्रा. भगवान आमलापुरे आदींच्या सर्वानुमते बिनविरोध निवडी करण्यात आल्या. यावेळी नियुक्त करण्यात आलेल्या नुतन कार्यकारिणीस सुनील खंडाळीकर शुभेच्छा देत उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन राज्य सरचिटणीस हरिदास तम्मेवार यांनी केले.

# सशक्त भारतासाठी निरोगी आरोग्य महत्वाचे -आ.संभाजी निलंगेकर

## निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी तालुक्यातील आरोग्य मेळाव्यांचे उद्घाटन




**निलंगा/प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सक्षम भारत घडत आहे. सक्षम भारतासाठीच सशक्त भारत व्हावा याकरीता निरोगी आरोग्य महत्वाचे आहे. ही बाब लक्षात घेवूनच केंद्र सरकारच्या वतीने तालुक्याच्या ठिकाणी आरोग्य मेळावा आयोजित करण्यात येत असुन या मेळाव्याच्या माध्यमातून प्रत्येकाची आरोग्य तपासणी होवून ज्यांना आवश्यकता आहे त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. याकरीता सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्यांनी योगदान दयावेत असे आवाहन आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले आहे. आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाच्या वतीने प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी आरोग्य मेळावे आयोजित करण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने निलंगा विधानसभा मतदारसंघा अंतर्गत निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी येथे आयोजित आरोग्य शिबीराचे उदघाटन आ.संभाजी पाटील निलंगेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी आ.निलंगेकर बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने समाजातील प्रत्येक घटकासाठी विविध योजना सुरू केलेल्या असुन प्रत्येक नागरिकांचे आरोग्य सदृढ राहावे याकरीता विविध उपक्रमही राबविले असल्याचे सांगून आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी निरोगी आरोग्यासाठी एक एक पाऊल पुढे टाकणे सुरू झालेले आहे. निरोगी आरोग्य असेल तरच सशक्त भारत घडणार आहे. त्यामुळेच प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले. कोरोना काळात सर्वांनीच आरोग्याकडे योग्यपणे लक्ष दिलेले होते. मात्र आता कोरोना ओसरत चालेला असुन पुन्हा आरोग्याकडे दुर्लक्ष होण्याचे प्रमाण वाढू लागलेले आहे. त्यामुळेच या आरोग्य मेळाव्याच्या माध्यमातून प्रत्येकांची तपासणी होणे आवश्यक असल्याचे आ.निलंगेकर यांनी स्पष्ट केले. केंद्र सरकारने याकरीता पुढाकार घेतलेला असुन प्रशासनही आपली जबाबदारी पार पाडत असल्याचे सांगून आता सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्यांनी आपली जबाबदारी ओळखून सतत आरोग्य मेळावे यशस्वी करण्यासाठी योगदान देणे गरजेचे असल्याचे आ.निलंगेकर यांनी यावेळेस स्पष्ट केले. प्रत्येक लोकप्रतिनिधीनी आपआपल्या कार्यक्षेत्रात प्रवास करून ज्यांना आरोग्याच्या समस्या आहेत. त्यांची यादी तयार करून त्या लोकांची तपासणी करून घेण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले. ज्यांची आरोग्य तपासणी झाल्यानंतर ज्यांना शस्त्रक्रियाची गरज आहे. त्यांच्या शस्त्रक्रिया स्थानिक रूग्णालयात नाही झाल्या तर त्या शस्त्रक्रिया लातूर पुणे किंवा मुंबई सारख्या ठिकाणी करून घेण्याची जबाबदारी आपली असल्याची ग्वाही आ.निलंगेकर यांनी यावेळी दिली. ...पान ६ वर

# नेरळ पोलिसांनी इफ्तार पार्टीचे आयोजन करुन दिला सामाजिक एकोप्याचा संदेश!



**कर्जत/धर्मानंद गायकवाड**

राज्यात मशिदीवरील भोंगे व हनुमान चालीसावरुन राज्यात राजकारण तापले असतानाच मात्र काल शुक्रवारी २२ रोजी नेरळ पोलिसांनी नेरळ पोलिस ठाण्यात ईफ्तार पार्टीचे आयोजन करुन समाजात सामाजिक एकोप्याचा संदेश दिला आहे. यावेळी या ईफ्तार पार्टीत अनेक मुस्लिम बांधवांनी सहभाग घेतला होता. या ईफ्तार पार्टीत नेरळ मधील हिंदुनीही मोठ्या संख्येने सहभाग घेवुन सा पार्टीचा लाभ घेतल्याचे दिसुन आले. त्यामुळे नेरळ पोलिसांचा या ईफ्तार पार्टीचे सर्वत्र कौतुक होत आहे. सध्या रमजानचा पवित्र महीना सुरु आहे. यावेळी मुस्लिम समाजाचा वतीने रोजा पाळला जात आहे. त्यामुळे ठिकठिकणी या निमित्त ईफ्तार पार्टीचे आयोजन होत असते. त्याच पाश्वभुमीवर काल सायंकाळी नेरळ पोलिस ठाण्यात नेरळचे कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी राजेंद्र तेंडुलकर यांचा मार्गदर्शनाखाली ईफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या ईफ्तार पार्टीत अनेक मुस्लिम समाजाचे अनेकांनी यांत सहभाग घेतला होता. या ईफ्तार पार्टीत नेरळ गावातील मुस्लिम बांधवांना रितशिर निमंत्रण पोलिसांचा वतीने देणेत आले होते, त्यामुळे या ईफ्तार पार्टीत शेकडो मुस्लिम बांधव उपस्थित राहीले होते. दरम्यान या ईफ्तार पार्टीत मुस्लिम बांधवांसाठी सफरचंद, द्राक्षे, खजुर, केळी, कांदा भजी, समोसे तसेच मिल्क ज्युस आदि ठेवण्यात आले होते. यावेळी विशेष म्हणजे येथे हिंदु आणि मुस्लिम ...पान ६ वर

# 'उंबरा ओलांडताना' कविता संग्रहाचे प्रकाशन व परिसंवाद संपन्न



**लातूर/प्रतिनिधी**

'उंबरा ओलांडताना' अरुणा दिवेगावकर लिखित कविता संग्रहाचे प्रकाशन व त्यावर आधारित परिसंवादाचे आयोजन लातूर येथील भालचंद्र ब्लड बँक येथे करण्यात आले होते. या प्रकाशन व परिसंवादासाठी महाराष्ट्रातील मान्यवर लेखक व कवी मा. बालाजी सुतार अंबाजोगाई, डॉ. प्रदीप आवटे पुणे, मा. नामदेव कोळी मुंबई, मा. पूजा भडांगे पुणे, अमिता पैठणकर केज तसेच हरिती प्रकाशनाचे दीपक कसाळे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्तविक दीपक कसाळे यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविकात कविता संग्रह प्रकाशित करण्याची भूमिका व हरिती प्रकाशन करत असलेला संवाद हस्तक्षेप आणि बदल याबद्दलची भूमिका मांडून हा कविता संग्रह आपणास आपण न बघतलेल्या व दुर्लक्षित असलेल्या ग्रामीण स्त्रियांच्या प्रश्न, आवाज याकडे सर्जनशील बघण्यास प्रेरित करतो असे सांगितले. त्यानंतर प्रियांका बोकील यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना कवयित्री अरुण दिवेगावकर यांच्या व्यक्तिमत्वातील विविध पैलू व लेखनातील महत्वाच्या जागा अधोरेखित करत लेखनकार्य आणि प्रत्यक्ष जीवनातील अरुणाताई यांचा सुरेख पट मांडला. त्यानंतर पुस्तकाचे प्रकाशन होऊन परिसंवाद झाला. त्यामध्ये स्त्री जाणीव, धर्म, संस्कृती आणि समकालीन परिस्थिती यामधील विविध अंतर्विरोध आणि विषमता उलगडत 'उंबरा ओलांडताना' या कविता संग्रहामधून 'स्व' पलीकडे जाऊन 'पर' दुसऱ्याचे दुःख प्रश्न, जगणं समजून घेणारी ही कविता आहे. तसेच कवितेने सहजपणे ग्रामीण स्त्रियांचे जगणं समजून घेताना वेगळ्या धाटणीचा ...पान ६ वर

# तृतीयपंथीयांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन प्रयत्नशील -सुमंत भांगे

**मुंबई/प्रतिनिधी**

तृतीयपंथीय घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी व या घटकाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामाजिक न्याय विभाग प्रयत्नशील असल्याचे मत सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे यांनी व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण सेंटर येथे तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी राज्य व केंद्रशासित प्रदेशांशी प्रादेशिक सल्ला मसलत करणे आणि स्थानिक प्रशासनाची संवेदनशीलता' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत सुमंत भांगे बोलत होते यावेळी समाजकल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, गुजरात राज्याचे सामाजिक न्याय विभागाचे संचालक प्रकाश सोळंखी, केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचे सहायक संचालक शांतनु दीक्षित, युएनडीपी संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाचे चिरंजीव भट्टाचार्य, निती आयोगाचे सदस्य रामराव मुंडे, गोवा राज्याच्या सामाजिक न्याय विभागाच्या रश्मी रावळ, समाज कल्याण विभागाचे



सहसचिव दिनेश डिंगळे, समाज कल्याण आयुक्त मुंबई शहर व उपनगर समाधान इंगळे व प्रसाद खैरनार, हमसफर या संस्थेच्या प्रिया शहा, समाजसेवा संस्थेच्या अनमोल जुहीली उपस्थित होते.

सुमंत भांगे म्हणाले, केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाने जारी केलेल्या २५ सप्टेंबर २०२० च्या अधिसूचनेद्वारे उभयलिंगी व्यक्ती (अधिकाराचे संरक्षण) नियमावली २०२० विहित केली आहे. त्यानुसार राज्यातील कायमस्वरूपी वास्तव्य असलेल्या तृतीयपंथीयांसाठी बीज भांडवल व व्याज सवलतीची स्वंयरोजगार योजना तसेच सर्व तृतीयपंथीयांना ओळखपत्रे देणे आणि शिधापत्रिका देण्याची विशेष मोहिमही राबविण्यात येणार आहे. टाळेबंदीच्या कालावधीत २१२१ तृतीयपंथीयांना औषधोपचार, किराणा, अन्नधान्ये, जीवनावश्यक वस्तू, मास्क, सॅनिटायझरचीही मदत करण्यात आली आहे. तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्यात आले आहे या मंडळामार्फत विविध योजनांचा लाभ मिळवून देवून त्यांचा आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. विभागीय स्तरावर तृतीयपंथीयांसाठी काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांचा समावेश करून तृतीयपंथीयांची नोंदणी करणे सुरू आहे. राज्यातील तृतीयपंथीयांचा सर्वांगीण विकास होवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा विभाग सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे, अशी माहिती यावेळी सचिव सुमंत भांगे यांनी दिली. समाजकल्याण आयुक्त डॉ. नारनवरे म्हणाले, तृतीयपंथीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्याचे काम देशात प्रगतीवर आहे. संविधानाने दिलेल्या अधिकारानुसार तृतीयपंथीयांना त्यांचे अधिकार मिळावेत यासाठी लवकरच राज्य शासनाच्यावतीने रोडमॅप तयार करण्यात येईल आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना आखण्यात येणार आहे. कम्युनिटी आणि शासन यामधील दुवा होणे गरजेचे आहे. त्यांचे जीवनमान, निवास व्यवस्था, आरोग्य आणि इतर समस्यांची गंभीरता या चर्चासत्रात कळाली, असल्याचे डॉ. नारनवरे यांनी सांगितले. ...पान ६ वर

# कारवाईची आश्वासन दिल्यानंतर अशोक ढोणे यांचे उपोषण मागे!

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या आंदोलन (पूनम) गेट समोर अशोक ढोणे यांनी एक दिवसीय उपोषण केले. उपोषणाला बसले असताना जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाचे अधिकारी येऊन कारवाई करण्याची पत्र दिल्यानंतर उपोषण स्थगिती करण्यात आली. कारवाई न झाल्यास विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषणाला बसणार असल्याचे सांगितले. सोलापूर जिल्हा परिषद अंतर्गत अक्कलकोट पंचायत समिती येथे आपल्या अधिपत्याखाली कर्तव्य बजावत असलेले गट विकास अधिकारी व उप मुख्यकार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग सोलापूर यांना निवेदन देऊन ही संबधीत लोक सेवकांनी कर्तव्यात कसूर करून हेतुपुरस्पर गैरकारभार करण्यात सामील असल्याचे सिद्ध होत असल्याने. चौकशी करण्यासाठी टाळटाळ करीत असल्या प्रकरणी गटविकस अधिकारी व विस्तार अधिकारी पंचायत



समिती अक्कलकोट यांच्यावर (शिस्त व अपील) अधिनियम अन्वये शिस्त भंगाची कारवाई करण्यासाठी ११ एप्रिल २०२२ रोजी जिल्हा परिषद सोलापूर, पूनम गेट येथे अशोक ढोणे उपोषणाला (वेळ ११ ते ४ वाजेपर्यत) बसले होते. जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाचे अधिकारी येऊन कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर उपोषणाला स्थगिती दिली आहे, तरी कारवाई न झाल्यास पुणे विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषणाला बसणार असल्याचे सांगितले. सोलापूर जिल्हा परिषद अंतर्गत अक्कलकोट पंचायत समिती येथे आपल्या अधिपत्याखाली कर्तव्य बजवत असलेले ग्रामसेवक ए.एम.नेलुरे साहेब यांची नियुक्तीच्यावेळी घोषित केलेले स्वग्राम वडगांव ता.द.सोलापूर असून महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.जीपब-२०९/प्र.क्र.२०/आस्था-१४, मत्रांलय मुंबई-३२ दि.२७ मे २००९ मधील परिशिष्ट-१, प्रकरण-१ नियम:-बदलीने नेमुणूक देताना पाळावयाच्या सूचना मधील उपकलम ७,८,९, अन्वये बेकायदेशीरित्या बदली केलेले आहेत. ए.एम.नेलुरे यांची सन २०१३ ते २०१८ बोरेगांव येथे नेमणूकीस असताना ग्राम निर्मल योजने अंतर्गत प्रतेक कुंटूबास शासनच्या निधीतून १००% शौचलय बांधून झाले.असे कागदपत्रे दाखून ग्राम निर्मलगाव ची पारितोषिक घेतले आहेत. प्रतेकक्षात मात्र २०% शौचलय बांधून झाले आहेत. स्थानिक नागरिकाची संपर्क साधून ग्रामपंचायतची चौकशी केल्यास शासनानी जनतेसाठी दिलेला निधीची मोठ्या प्रमाणात अपहार झालेला दिसून येईल. सन २०१३-२०१८ सालाची बोरेगांव ग्रामपंचायतची दप्तर तपासणी केल्यास मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. हे सिध्द होईल. ए.एम.नेलुरे साहेब यांची सन २०१३-२०१८ साली शासनाच्या योजनेतून बोरेगांव मध्ये गोरगरीब लोकांना घरकुल मंजूर असून त्या प्रमाणे बांधकामही ...पान ६ वर

# बोळींज येथे आरोग्य व विविध दाखल्यांचे शिबिर संपन्न



**विरार/प्रतिनिधी**

बहुजन विकास आघाडी, लायन्स क्लब ऑफ वसई भरारी, लायन्स क्लब ऑफ वसई तसेच लायन्स क्लब ऑफ विरार युनिटी यांच्या वतीने लायन भारती पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य आणि नेत्र चिकित्सा शिबिर तसेच आधार कार्ड, नवीन पॅनकार्ड, ज्येष्ठ नागरीक कार्ड, रेशनिंग कार्ड शिबिराचे २३ एप्रिल २०२२, सकाळी १० ते २ वाजता सुहास नेवाळकर ऑफिस दुकान नं. ५ सफल बिल्डिंग, चावरे संकुल, बोळेश्वरी रोड, बोळिंज नाका, विरार (प.) येथे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा अनेकांनी लाभ घेतला. सदर कार्यक्राचे प्रमुख पाहुणे म्हणून लायन डॉ. प्रशांत पाटील, माजी गव्हर्नर तर विशेष अतिथी लायन श्रद्धा मोरे, रिजियन चेअर पर्सन उपस्थित होते. त्याचबरोबर अजिव पाटील, नगरसेविका सुरेखा कुरकूरे, किरण ठाकूर, मा. नगरसेवक अजित नाईक, माजी नगरसेवक नितीन मुळे, मा.नगरसेविका ज्योती राऊत, फरझाना शेख, माजी नगरसेविका सिमा काळे, लायन ज्योती राऊत, लायन आफ्रिन शेख, लायन प्रेसीला वाझ, माजी ग्रा.प.सदस्य रविंद्र सावे, माजी ग्रा.प.सदस्य प्रदीप पंडया, किशोर पितले, सुहास नेवाळकर, सर्व चावरे संकुल सदस्य, तुषार व सचिन जाधव, सुलभा झामरी, संतोष पाटील, प्रशांत हजारे, नगरसेविका रिटा सरवैया आदी उपस्थित होते. तर लायन रंजना बा. म्हात्रे व लायन डॉ. अनिरुद्ध चव्हाण यांचे कार्यक्रमाला विशेष सहकार्य लाभले.

# भिवंडीत मुस्लिम धर्मीयांच्या पवित्र रमजान रोजानिमित्त सर्वधर्मीय इफ्तार पार्टीचे पोलिसांकडून भव्य आयोजन



**भिवंडी/प्रतिनिधी**

मुस्लिम धर्मीयांचा पवित्र रमजान महिना अर्थातच उपवासाचा महिना, या पवित्र अशा रमजान महिन्यात रोजे अर्थात उपवास केले जातात. मागील दोन वर्ष रमजान महिना हा आपल्या घरातच रोजा इफ्तार करू उपवास सोडावा लागत होता. सार्वजनिक ठिकाणी एकत्रित होण्याला मनाई होती. परंतु यंदा प्रथमच कोरोना संदर्भात लावण्यात आलेले सर्व निर्बंध उठविण्यात आल्यानंतर साजरा होत असलेल्या रमजान महिन्यात मुस्लिम समुदायात उत्साह द्विगुणित झालेला आहे. रमजान महिन्यात आयोजित केल्या जाणाऱ्या इफ्तार पार्टी परत एकदा आयोजित करण्यास सुरुवात झाली आहे. नुकताच शांतीनगर पोलीस ठाणे येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांनी पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण, उपमहापौर इमरान खान यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्वधर्मीय रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशांत ढोले, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष शोएब खान गुड्डू, समाजवादी पार्टी अध्यक्ष रियाज आजमी, एमआयएम शहर कार्याध्यक्ष शादाब उस्मानी यांसह नगरसेवक व सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप करून महामानवांना अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहरासह परिसरातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक पुस्तके वाटप करत वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन लातूरच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा फुले, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर असलेल्या शिव छत्रपती ग्रंथालय याठिकाणी अनेक गरीब, होतकरू विद्यार्थी अभ्यास करण्यासाठी येतात, या विद्यार्थ्यांना मदत करावी या उद्देशाने महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधत वायफळ खर्चाला फाटा देत वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे जिल्हाध्यक्ष अमोल बनसोडे यांनी या ठिकाणी अभ्यासासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना एकत्रित



करून त्यांना आवश्यक असणाऱ्या पुस्तकांची तसेच स्पर्धा परीक्षाच्या माध्यमातून यशस्वी झालेल्या विविध अधिकारी यांचे प्रेरणादायी पुस्तके ग्रंथालयात असावी अशी पुस्तके स्वखर्चाने खरेदी करत ती मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आली. गरजू विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके वाटप कार्यक्रम शिवछत्रपती ग्रंथालयात घेण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन लातूर शहर महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त मंजुषा गुरमे यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी वंचित बहुजन आघाडीचे विभागीय महासचिव रमेश गायकवाड, पक्षाचे नेते संतोष सूर्यवंशी, जिल्हाध्यक्ष जगदीश माळी, महिला जिल्हाध्यक्षा मंजुषा निंबाळकर, शहराध्यक्षा सुजाताताई अजनीकर, ग्रंथपाल अमित म्हेत्रे, युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष युवराज जोगी, जिल्हा महासचिव नितीन गायकवाड, सल्लागार प्रा. कल्याण कांबळे, माजी प्राचार्य डॉ. सिद्धार्थ सूर्यवंशी यांची उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपला महत्वपूर्ण वेळ फेसबुक वॉट्सप फेसबुक यासारख्या गोष्टीवर न घालता वेळेचे नियोजन करून यश संपादन करण्यासाठी अहोरात्र मेहनत करण्याची तयारी ठेवा असा सल्ला सहाय्यक आयुक्त मंजुषा गुरमे, पक्षाचे नेते रमेश गायकवाड, संतोष सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना दिला. प्रास्ताविक करताना कार्यक्रमाचे आयोजक अमोल बनसोडे यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या विचार, आचारांची आज समाजाला गरज आहे, त्यांचे विचार आत्मसात करून प्रत्येकांनी यशस्वी जीवनाचा मार्ग स्वीकारावा असे आवाहन केले. यावेळी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांनी आवश्यक असलेली पुस्तके मोफत मिळाल्याने समाधान व्यक्त करून आयोजकांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शहराध्यक्ष मनोज लोंढे, ...पान ६ वर